मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

भू.प्रवास ४० सन १८८९

ले. सिताराम रामचंद्र गाईकवाड

पु.नांव- विजापूरवर्णन

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

# विजापूर वर्णन.

(भू प्रवास)

स्थळप्रत

परचुरे, पुराणिक आणि मंडळी,
बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई नं. ४

# विजापूरवर्णन.

त एवामी बाणास्तदपि हरलब्धं धनुरिदम् ॥
स एवाहं पार्थः प्रमथितसुरारातिनिचयः ॥
इमास्तास्ता गोप्यो हरिचरणचित्तैकशरणाः ॥
ह्रियन्ते गोपालैर्विधिरपि बलीयान्न तु नरः ॥ १ ॥

हें पुस्तक

सीताराम रामचंद्र गाईकवाड

यांनीं तयार केलें

तें

वासुदेव गणेश जोशी,
चित्रशाळेचे म्यानेजर,

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

(सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

पुणें, "आर्यभूषण" छापखान्यांत छापिलें.

१८८९

किंमत ॥ रुपया.

# प्रस्तावना.

ज्यांस थोडाबहुत विद्येचा संस्कार झाला आहे, व ज्यांस इतिहासांची फार अभिरुचि आहे, अशा लोकांस ह्या पुरातन व इतिहासप्रसिद्ध शहराचें पूर्वींचें वैभव कसें होतें, व हल्लीं त्याची निकृष्टावस्था कशी झाली आहे, हें समजण्याची फारच उत्कंठा असते, हें कोणीही कबूल करील. ही त्यांची इच्छा पूर्ण होण्याच्या साधनांचा विचार पाहतां तीं साधनेंही दिवसेंदिवस दुर्मिळ होत चाललीं आहेत. एखादा नवखा ह्या अपरिचित शहरीं आला असतां, येथील हरएक गोष्ट समजण्याची त्यास फार जिज्ञासा उत्पन्न होते, व हें काय आहे? हें कोणी कशाकरितां बांधिलें? अमक्या ठिकाणास अमुक नांव कां पडलें? असे प्रश्न तो तेथल्या लोकांस विचारूं लागतो. ह्या शहरांतील लोकांस ह्या राजधानीचें पूर्वींचें वैभव क्वचितच माहित असल्यामुळें वाटेल तशी दंतकथा वरील गृहस्थास ते सांगतात. विजापुरांतील ज्या हल्लीं प्रसिद्ध इमारती गोळघुमज व इब्राहिम रोजा वगैरे आहेत, त्यांचे रक्षक नोकर प्रेक्षकांस ह्या इमारतींस आज सातशें वर्षें झालीं ह्मणून सांगतात. हें किती संभवनीय आहे, हें जिज्ञासु वाचक जाणतीलच. असो. ही एक दंतकथा झाली! परंतु मुसलमान ग्रंथकारांनीं तरी खरा मजकूर आपल्या ग्रंथांत गोंविला आहे काय? विजापुरांत एक दोन हस्तलिखित ग्रंथ मुसलमान गृ-

हस्थांपाशीं आहेत. त्या दोनही ग्रंथांचा एकांत एक मेळ जमत नाहीं. ह्या मुसलमानी ग्रंथांविषयीं एका इंग्रजी* ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं ' मुसलमान लोक जो वृत्तांत देतात तो वास्तविक गोष्टी गाळून, व विपरीत अर्थ करून लिहिलेला असतो, व मराठ्यांचा एक अणुमात्र दोष असला तर तेवढाच धरून त्यास ते अतिशय फुगवून दाखवितात. शिवाय त्यांची लिहिण्याची सरणी तर खरोखर दोषास्पद आहे. त्यांच्या कल्पना संभवनीय नसून केवळ ओढून ताणून आणलेल्या असतात. जाडे जाडे शब्द घालून त्यांची भाषा कानाला गोड लागेल अशी केलेली असते; व त्यांच्या शब्दांची जुळणी प्रासयुक्त असते यामुळें जिज्ञासु व रसिक वाचकांस त्यांच्या लिहिण्याचा वीट येतो.' ज्या महापराक्रमी शिवाजीनें अफझलखान नामक त्यांच्या शूर सरदारास ठार मारिलें त्याविषयीं विजापुरांतील बखरींत भरपूर मजकूर सांपडत नाहीं ! अली आदिलशहा दुसरा ह्याच्या पन्हाळ्यावरील स्वारींत त्याचा पराजय झाला असून तो विजयी झाला ह्मणून लिहिलें आहे. हें किती खरें आहे, हें ह्या पुस्तकावरून वाचकांच्या ध्यानीं सहज येईल. एवढें मात्र खरें कीं, ह्या इतिहासकारांनीं सन व तारीख वगैरेची माहिती खरी दिली असून, पुष्कळ ठिकाणीं ग्रंथ तारखांनीं व सनांनीं भरून टाकिले आहेत, व हे सर्व हिजरी आहेत. असो. वरील गोष्टींत मुसलमानी इतिहासकारांसच दोष देतां येत नाहीं; कारण कोणीही गृहस्थ आपल्या देशाचा इतिहास लिहूं लागला असतां सर्वच गोष्टींत त्याचें घोडें पुढें असतें.

*Waring's History of the Marathas.



विजापुरांत पूर्वी कांहीं इनामदारांजवळ बादशाही ग्रंथ होते. ते ग्रंथ आपले दीर्घ उद्योगी साहेब लोक जेव्हां जेव्हां विजापुर पहाण्यास गेले, तेव्हां तेव्हां त्यांनीं आपल्या नेहमीच्या वर्तनक्रमाप्रमाणें शें शें, दोन दोनशें रुपये देऊन ते ग्रंथ विकत घेतले. आपले प्रसिद्ध इतिहासकार ग्रान्ट डफसाहेब यांनीं तर पुष्कळच ग्रंथांची खरेदी केली, असें तेथील जुने लोक सांगतात ! त्याचप्रमाणें बादशाही नानातऱ्हेचीं चिनई, चांदीचीं वगैरे ज्यांवर कारागिरांनीं आपलें कौशल्य खर्चण्यास कमी पडूं दिले नाहीं, अशीं नामी नामी भांडीं परदेशीय लोकांनीं त्यांस आपले देश दाखविले ! हल्लीं विजापुरांस अशा मासल्याचें सामान कांहींच कोणाजवळ राहिलें नाहीं !

हें शहर पहाण्याकरितां आजपर्यंत पुष्कळ श्रीमंत व युरोपियन गृहस्थ गेले, त्यांतील कित्येकांनीं केवळ उदार बुद्धीनें ह्या शहराची माहिती थोडक्यांत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली; पण त्यांचें तेथें वास्तव्य थोडें असल्यामुळें हवी तशी माहिती त्यांस मिळवितां आली नाहीं. दुसरें ह्या शहरांत कानडी भाषा फारकरून बोलतात यामुळें त्यांस पूसतपास करूनही इमारती वगैरेची पूर्ण हकिकत देतां आली नाहीं. एकंदरींत त्यांस ह्या नांवाजलेल्या शहराचें साद्यंत वर्तमान देण्यास फारच अडचणी आल्या. हें सर्व मनांत आणून विजापुरांत अनायासें तीन चार महिने रहाण्यास सांपडलें, यामुळें तेथील इनामदार वगैरेचीं दफ्तरें धुंडून जेवढी योग्य माहिती सांपडली तेवढीच घेतली. शिवाय **हफीज महंमद अल्ला वल्लद शेख साहेब बागी रोजीनदार साकीन** नामक वयोवृद्ध व

फार हुशार गृहस्थ आहेत, त्यांनीं अब्दुल हुसेन तारीखदार यांनीं केलेला फारशी विजापूरची इतिहास होता त्याचें उर्दूंत भाषांतर केलें आहे. ह्या ग्रंथानें मला पुष्कळ मदत दिली ह्मणून मी त्यांचा फारच आभारी आहें. ह्या ग्रंथाशिवाय इंग्रजी व मराठी ग्रंथ पुष्कळ हुडकून जी जी ह्मणून मनोरंजक माहिती सांपडली तिचा समावेश यांत केला आहे. इमारतींचें मोजमाप मी स्वतांच घेतलें आहे. प्रथमावृत्तींत विजापूरशहराचा नकाशा जोडण्याबद्दल वचन दिलें होतें त्याप्रमाणें ह्या आवृत्तींत जोडला आहे.

ह्या पुस्तकाबद्दल संस्थानिक, थोर व विद्वान् वगैरे गृहस्थांस उदार आश्रयाविषयीं विनंतिपत्रें पाठविलीं, त्यांपैकीं कांहींकांनीं बहुमान करून योग्य आश्रय दिला त्यांचा, व माझ्या ज्या ज्या मित्रांनीं ह्या पुस्तकाविषयीं श्रम घेतले आहेत त्या सर्वांचा मी फार आभारी आहें. ह्याप्रमाणेंच ह्या ग्रंथांत गुणदोष सांपडल्यास सदरील गृहस्थ व विद्वान् मला क्षमा करून या प्रकारचेच उद्योग करण्यास पुढेंमागें मला उत्तेजन देतील असें त्यांपाशीं माझें मागणें आहे.

ग्रंथकर्ता.

---

ईश रूपाहि केवळे ।

# विजापूरवर्णन.

## भाग १ ला.

### ( बादशाह. )

## सुलतान युसफ आदिलशाह.

### ( राज्याचा संस्थापक. )

इ० स० १४८७—१५१९.

ज्या महापुरुषाच्या पुण्याईच्या भक्कम पायावर पुढील एवढें अफाट वैभव रचलें गेलें कीं ज्याचें वर्णन इतिहासांत अजरामर राहील, किंबहुना हीं आमची लेखणी चालविण्यासही जो कारणीभूत आहे, तो हा वरील भाग्यशाली पुरुष होय. ह्यानें प्रथमतः गादी कशी संपादन केली व एवढें अफाट वैभव कसें मिळविलें ह्याचें मूळ कथन इतकें कांहीं चमत्कारिक आहे, कीं तें वाचून वाचकांस सहजीं आश्चर्य वाटणार आहे.

यूरोपखंडांतील कान्स्टंटिनोपलच्या (कुस्तुनतानिया) सुलतान मुराद नामक बादशाहाचा हा द्वितीय पुत्र. तेव्हां अर्थात् पुढेंमागें तेथील गादीचा उपभोक्ता असावयाचाच. पण विजापूरच्या गादीवर त्याचें देहावसान व्हावयाचें असा ईश्वरी संकेत होता. यास का-

रण असें झालें कीं, इ० स० १४५० यावर्षी सुलतान मुराद हा मृत्यु पावला. त्यावेळीं त्यास हा आमचा इतिहासकारणी व महंमद असे दोन पुत्र होते. त्यांत महंमद हा वडील असल्यामुळें रीतीप्रमाणें तोच गादीवर बसला. तरी युसुफ हा फारच सुंदर असून गुणसंपन्नही होता यामुळें वडील भावाचें त्यावर अत्यंत प्रेम असे. परंतु हें दरबारांतील कित्येक विघ्नसंतोषी, विषयी व पाजी लोकांस न साहून त्यांनीं युसफाविरुद्ध पुष्कळ खोटानाटा व बनावट मजकूर बादशाह सुलतान महंमद याजपाशीं सांगितला. आणि 'याच्या जन्मग्रहावरून पुढेंमागें हा आपणास पदभ्रष्ट करील असें त्याच्या डोक्यांत भरवून दिलें. यामुळें महंमदाचें युसफावरील प्रेम इतकें उडालें कीं, त्यानें त्यास देहान्तप्रायश्चित्त देण्याचें ठरविलें. पुढें हें वर्तमान राजमातेस कळतांच तिनें महंमदाची समजूत घालून युसफास स्वाधीन करून घेतलें आणि तुझ्या इच्छेप्रमाणें शिक्षा देतें असें सांगितलें.

नंतर कांहीं दिवसांनीं अलाउद्दीन नांवाचा कोणी गुलामांचा व्यापारी सहजीं कान्स्टंटिनोपल येथें उतरला असतां, त्यास या राजमातेनें गुप्तपणें बोलावून नेलें, आणि ही सर्व हकीकत सांगून आपल्या मुलाच्या तोंडवळ्याचा एक गुलाम त्याच्याजवळ बदला मागितला व ही बातमी कोठें फुटूं देऊं नये ह्मणून त्याची विनवणी केली. व्यापारी हा भला माणूस होता, त्यानें लागलींच युसफाशीं सदृश असा एक गुलाम तिचे स्वाधीन केला, आणि मोठ्या संकटानें युसफास संभाळण्याचें कबूल केलें. परंतु किती केलें तरी पोटचा गोळाच तो! युसफास त्याचे स्वाधीन करतांना तिला जें दुःख झालें असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि तिनें गुलामव्यापाऱ्यास अपार द्रव्य देऊन त्याचें लालनपालन चांगल्याप्रकारें करण्याविषयीं त्याजवळून वचन घेतलें.



या वेळीं युसफ हा नुकता सात वर्षांचा बच्चा होता. तरी बांधा सुदृढ असून राजलक्ष्मीचें तेज अंगावर असल्यामुळें तो १२–१४ वर्षांचे वयाचा दिसत असे. अलाउद्दीन यानें त्याच रात्रीं शहर सोडून आपला मार्ग धरिला, व इकडे या राजमातेनें आपल्या विक्रीत पुत्रास ठार मारून 'तुझ्या भावाचा शेवट लाविला' असें महंमदास कळविलें. तें ऐकून बादशाह व त्याचे मूर्ख दरबारी लोक यांस फार आनंद झाला आणि आपल्या कृत्याची त्यांस मोठी धन्यता वाटली. व त्यांनीं लागलींच त्या युसफनाममात्रधारी गुलामाचा मुसलमानी धर्माप्रमाणें अंत्यसंस्कार उरकून त्यास कबरेंत घातलें.

इकडे युसफ हा त्या गुलामव्यापाऱ्याबरोबर त्याच्या सावे गांवीं पोंचला. युसफाचा तो मनोहर बांधा व त्याचे उत्तम प्रकारचे गुण पाहून अलाउद्दिनाचें त्यावर फारच प्रेम जडलें, व त्यास पुत्र नसल्यामुळें तो युसफास पुत्राप्रमाणें मानूं लागला. पुढें जसजसें हें राजबीज वाढत चाललें तसतसें त्याच्या अंगीं सौंदर्य व तेज अधिकाधिक चमकूं लागलें व हा कोणी राजपिंड असावा असें लोक ह्मणूं लागले यामुळें सौदागरास एक नवीन चिंता उत्पन्न झाली कीं न जाणों कदाचित् आपणावर एखादें अरिष्ट ओढवेल!

पुढें एके दिवशीं युसफाचे स्वप्नांत एक फकीर येऊन त्यानें सांगितलें कीं, 'तूं हिंदुस्थानांत जावें, ह्मणजे तेथें राज्यपद पावशील.' हें स्वप्न त्यानें त्या व्यापाऱ्यास सांगितलें. तें ऐकून व्यापाऱ्यास फार आनंद झाला व उशीर न लावितां कांहीं व्यापारोपयोगी जिनसा बरोबर घेऊन उभयतांनीं हिंदुस्थानाकडे जाण्यास जहाजांत पाय ठेविला. नंतर थोड्याच दिवसांनीं ते दाभोळ बंदरात येऊन उतरले.

या वेळीं महाराष्ट्र देशाचें राज्य ब्राह्मणी घराण्याकडे असून महंमदशाह ब्राह्मणी गादीवर होता. त्यानें निरनिराळ्या बंदरांवर प्रजेचें संरक्षण करण्याकरितां व वसूल घेण्याकरितां वजीर नेमले होते, त्यांपैकीं दाभोळ व दुसरीं चार बंदरें अशा पांच बंदरांची वजिरी खाजेजवान नामक शूर सरदाराकडे होती. 'उत्तम प्रकारचें स्वरूप हीं मुकी शिफारस आहे.' या वाक्याची सत्यता जगांत नेहमीं दृष्टीस पडते. युसफास पाहतांक्षणींच त्याच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होऊन त्यानें त्यास हुजुरास पाठवून बादशहाची भेट करविली. त्या मनोहर मूर्तीस पाहून बादशाह संतुष्ट होऊन त्यानें लागलींच युसफास आपले जवळ चोपदाराची असामी दिली.

महंमदशाह ब्राह्मणी यास कुस्त्यांचा फार नाद असे. त्याचेजवळ एकापेक्षां एक असे ७०० पैलवान रतीब खाऊन पडले होते. एके दिवशीं अड्ड्यावर या पैलवानांच्या कुस्त्या चालल्या होत्या. नित्याचे सांप्रदायाप्रमाणें अमीर उमराव वगैरे जाडीं जाडीं धेंडें हा तमाशा पाहण्यास जमलींच होतीं व बादशाहाबरोबर हा युसफ चोपदारही होता. मोठमोठे गलेलठ्ठ जेठी मंडळांत टकरा व कुस्त्या करूं लागले. त्या समयीं युसफासही वीरश्रीचें स्फुरण चढून त्यानें त्या पैलवानांशीं कुस्ती खेळण्याची परवानगी विचारिली. त्याची विनंती ऐकून बादशाहास आश्चर्य वाटलें. तरी त्यानें परवानगी दिली. मग लागलींच युसफानें जे रोज चरव्याच्या चरव्या दूध रिचविणारे, जे हलवा मिठाई वगैरे मसालेदार मेव्याचे गोळेच्या गोळे गटागट गिळणारे, जे बादशाहाच्या मर्जीतले, जे लांब लांब बाता झोंकणारे अशा पैलवानांसही तेव्हांच चीत करून सोडिलें. ह्या विजयामुळें प्रेक्षक मंडळास फारच आश्चर्य वाटून त्यांनीं युसफाचा जयजयकार केला व बादशाहानें संतुष्ट होऊन तेथल्या तेथें पांच गांवांची



सनद व सरदारीचीं वस्त्रें त्यास दिलीं. याप्रमाणें जो युसफ थोडे वेळापूर्वी चोपदाराची काठी वागविणारा होता तो लागलींच एक बडा जहागीरदार व सरदार बनला. व येथूनच त्याचे अभ्युदयास आरंभ झाला.

नंतर थोड्याच दिवसांनीं यानें आपल्या आंगचे शौर्य, हुषारी व राज्यकारस्थानपटुत्व वगैरे गुणांच्या प्रभावानें या समारास ब्राह्मणी राज्यांत जी बंडाळी व बेबंदशाही माजली होती तिचा समूळ नाश करून टाकिला. याप्रमाणें दिवसेंदिवस ह्याच्या आंगच्या उत्तम गुणांवरून बादशाहाची त्यावर फारच कृपा होत गेली व त्यास 'मजलीसरफी व मलिक उल् शेरीक' असे किताब मिळत गेले. ह्या पराक्रमी पुरुषानें ब्राह्मणी राज्याच्या बंदोबस्ताकरितां पुष्कळ किल्ले बांधिले. बेदरचा अपुरता बांधलेला किल्ला ह्यानें पुरा केला. अहंमदनगरचा किल्ला (१४६८) सोलापूरचा किल्ला (१४७८) बेळगांवचा किल्ला (१४८१) परंडेचा किल्ला (१४८२) व मिरजेचा (१४८३).

महंमदशाह ब्राह्मणी हा फार विषयी, आळशी व घमंडानंदन होता, यामुळें राज्यकारभारांत त्याचें फारच दुर्लक्ष असे. व अशा या त्याच्या वर्तनानें राज्यांत पूर्ववत् बंडाळी माजून कोणी कोणास जुमानीनातसें झालें. ह्मणून इ० स० १४७८ च्या सुमारास यानें आपल्या राज्याचे गोंवळकोंडें, अहंमदनगर, विजापूर, बेदर व वऱ्हाड असे पांच विभाग पाडून त्यांवर बंदोबस्ताकरितां पांच सुभेदार नेमिले. त्यांपैकीं विजापूरच्या सुभ्यावर युसफ यास नेमिलें. परंतु पुढें हेच सुभेदार बळावत गेल्यामुळें महंमदशाहाचें कांहीं चालेनासें झालें व अशाच गडबडींत शेवटीं इ० स० १४८७ ह्या वर्षी त्यास मृत्यूनें गांठिलें.

---

१ ह्यास मूर्तुजाबाद असें ह्मणत.

नंतर महंमदशाहाचे पश्चात् हे पांच सुभेदार स्वतंत्र होऊन ते पांच वेगळाले बादशाहा[१] बनून राहिले. पैकीं युसफ यानें विजापूर येथें आदिलशाही या नांवानें स्वतंत्र 'तक्त स्थापन करून तो आपणास सुलतान युसफ आदिलशाह असें ह्मणवूं लागला. नंतर हळू हळू आज हा प्रांत घे—उद्यां त्यावर स्वारीकर—परवां तिसऱ्याला खंडणी माग असें करितां करितां या पराक्रमी पुरुषानें अफाट सैन्य व अगणित द्रव्य गोळा करून बहुतेक मुलुख पादाक्रांत करून आपल्या नांवाचा झेंडा रोंविला. या वेळीं याचे जवळ ९,७०० स्वार, १४,२११ पायदळ व ३७ हत्ती इतकें लष्कर होतें.

ह्या बादशाहास इमारती बांधण्याचा विशेष नाद नव्हता; तथापि इ० स० १५०८ या वर्षी आर किल्ल्याभोंवतालचा मातीचा अजस्र तट व मक्कामशीद, १५०९ या वर्षी उपली बुरुजावजळ असलेला इदगा व १५११ या वर्षी फरुक महाल ऊर्फ चिनी महाल हीं कामें याचेच हातून झालीं आहेत शिवाय विजापुरांत पुढें लिहिलेले बाजार यानें वसविले होते:—मुरादखान बाजार, मरकुंधे बाजार, रुमेखान बाजार, दौलत बाजार, ठाणें बुजरूक बाजार, नागनान बाजार, पेठखान बाजार, उमारक बाजार, पाले बाजार व फरिदखान बाजार.

हा बादशाह इ० स० १५१९ या वर्षी मृत्यु पावला. सांप्रत याची कबर विजापुरापासून ३० मैलांवर गोगी येथें आहे. मरणकाळीं यास इस्माइल म्हणून एकच पुत्र होता. तो याचे मागून गादीवर बसला.

---

१ न्यायी बादशाह. हेंच नांव शेवटपर्यंत याचे घराण्यास चालत होतें.



## सुलतान इस्माइल आदिलशाह.

इ० स० १५१९—१५३१.

बाप मरण पावला त्या वेळीं इस्माइल अल्पवयी होता ह्मणून राज्याचा सर्व कारभार पूर्वीचा सुनीमतानुयायी[१] दिवाण कमालखान लेहेरी हा पाहत असे. माजी सुलतान शियामतानुयायी असल्यामुळें दरबारांत बहुतेक त्याच मताच्या लोकांचा भरणा होता त्यांस ह्या पालकाच्या ताब्यांत सर्व राज्यसत्रें आल्यामुळें अजीबात फाटा बसला. इतकेंच नाहीं, तर हा राजपुत्र मोठा झाल्यावर आपल्या बापाचें शियामत न स्वीकारितां कालगत्या सुनीमत स्वीकारील अशी त्यास आशा होती व त्याकरितां एव्हांपासून त्याचे प्रयत्नही चालू होते. परंतु इस्माइल हा जेव्हां वयांत आला तेव्हां त्याचे हे सर्व मनोरथ वृथा झाले. यामुळें त्यानें आपल्या अधिकारावर लाथ मारून आपल्या पक्षाचे लोकांनिशीं किल्ल्यास एकदम वेढा दिला. त्या वेळीं राज्याची बहुतेक गठडी वळण्याचीच पाळी आली होती, परंतु हा प्रसंग इस्माइलच्या आईनें मोठ्या शर्तीनें बचाविला. ती लागलींच पुरुषाचा वेष घेऊन किल्ल्याबाहेर आली आणि कित्येक तासपर्यंत मोठ्या शौर्यानें लढून तिनें वेढा घालणाऱ्या बंडखोरांची अगदीं दाणादाण उडवून दिली, व कमालखान यास कैद करून शेवटीं त्याचा शिरच्छेद केला. आणि या कामीं जे त्यास साथीदार मिळाले होते त्यांस योग्य शिक्षा देऊन आस-

---

१ मुसलमान लोकांत सुनी व शिया असे दोन पंथ आहेत. पैकीं सुनीमतानुयायी हे महंमद पैगंबर यास अधिक मान देतात व शियामतानुयायी हे हजरतअली (पैगंबरचा जांवई) यास अधिक मान देतात.

दखान नामक सरदारास मुख्य वजीर नेमलें. यामुळें बहुतेक बिघडलें. पुढें इस्माइल हा वयांत आल्यावरून गादीवर बसला होता हें वर दर्शविलेंच आहे. त्यानें प्रथमतः सुन्नीमतानुयायी लोकांस दरबारांतून पिटाळून लाविलें आणि बापाच्या वेळचे जुने अनुभविक शियामतानुयायी लोकांस पूर्ववत् त्यांचीं त्यांचीं कामें देऊन सर्वत्र शियामत प्रसृत केलें. या त्याच्या शहाणपणाच्या व्यवस्थेनें लवकरच दरबारांतील सर्व अव्यवस्था नाहींशी होऊन राज्याचा गाडा पुढें बरेच दिवस सुयंत्र चालला होता. परंतु पुढें कांहीं वर्षें लोटलीं नाहींत तोंच इ० स० १५३१ या वर्षी मुद्गल व जमखिंडी इकडे बंड उठलें, त्याच्या बंदोबस्ताकरितां हा गेला असतां लढाईंत एकाएकीं गोळी लागून त्यास अकालीं मृत्यूनें गांठिलें[१].

हा बादशाह फार विषयी व चैनी असे. तथापि याचें केवळ प्रजेकडे दुर्लक्ष नसे. यानें कमालखान, तुनागर, बराखऊद वगैरे बाजार बसविले आणि मुद्गलचा किल्ला व विजापूरच्या किल्ल्यांतील चंपामहाल[२] बांधिला. ह्याचे जवळ १,०४,००० पायदळ, ११६ हत्ती वगैरे फार मोठें लष्कर होतें.

---

## सुलतान मलू आदिलशाह.

इ० स० १५३१—१५३२.

इस्माइल आदिलशाह मरण पावला त्यावेळीं त्यास मलू, अबदुल्ला व इब्राहिम असे तीन पुत्र होते. पैकीं मलू हा सर्वांत वडील असल्यामुळें तोच बापाचे मागून गादीवर बसला. परंतु पुढें

---

१ याची कबर गोगी येथें पित्याचे कबरे शेजारीं आहे.

२ सांप्रत हा महाल नामशेष मात्र राहिला आहे.



लवकरच याच्या अंगच्या ज्ञानावरून यास पुढें राज्य चालवितां येणार नाहीं असें कारभारी लोकांस वाटल्यावरून त्यांनीं मलू यास पदभ्रष्ट करून त्याचा धाकटा भाऊ इब्राहिम यास गादीवर बसविलें.

यानें अवघें सहा महिने राज्य केलें. यामुळें याच्या कारकीर्दींत विशेष कांहीं घडलें नाहीं.

---

## सुलतान इब्राहिम आदिलशाह.

इ० स० १५३३—१५५९.

सुलतान मलू पदभ्रष्ट झाल्यावरून हा गादीवर बसला असें वर सांगितलेंच आहे. तथापि ह्यासच गादीवर बसविण्याचें विशेष कारण ह्याच्या अंगचे गुण सांगत होते. हा गादीवर बसून कांहीं वर्षें झालीं नाहींत तोंच पोर्तुगीज लोकांनीं विजापूरच्या राज्यांतील समुद्र कांठचे प्रदेशांत फारच बंडाळी मांडिली व गोंव्यापासून थेट बाणकोटापर्यंत व इकडे मिरजेपर्यंत बहुतेक खेडींपाडीं जाळून उध्वस्त केलीं. ह्यामुळें प्रजा धायमाय मोकलून रडूं लागली; कोणाजवळ फिर्याद करण्यास जागा राहिली नाहीं; आणि 'बळी तो कानपिळी' हाच न्याय सर्वत्र झाला.

ह्या बंडाव्याचें मुख्य कारण इब्राहिम याचा दुसरा बंधु अबदुल्ला यानें पोर्तुगीज लोकांचा आश्रय धरिला होता आणि पोर्तुगीज लोकांनीं त्यास गादीवर बसविण्याचेंही कबूल केलें होतें. परंतु इब्राहिम हा मोठा धूर्त व मसलती असल्यामुळें त्यानें लागलीच शिकंदरखान नामक एका शूर सरदारास पुष्कळ सैन्यानिशीं त्यावर पाठविलें, व जाहिदखान (आसदखानाचा भाऊ) नांवाच्या दुसऱ्या एका मुत्सद्यास पोर्तुगालच्या राजा-

कडे आपला मुखत्यार म्हणून बोलणें करण्यास पाठविलें. जाहिरखान यानें लागलीच गोंवें येथील पोर्तुगीज गव्हरनरास त्याच्या राजाकडून 'तुम्हांस अशा भानगडींत पडण्याचें कारण नाहीं' असें खरमरीत पत्र आणून लाविलें. यामुळें ही सर्व धुमाळी नाहींशी होऊन अबदुल्ला यास मुकाट्यानें पूर्ववत् गोंव्यांतच चुरमुरे खात बसावें लागलें.

आसदखानाच्या बंधूनें मोठी कामगिरी बजाविली यामुळें या बंधुद्वयावर बादशाहाची मोठी मेहेरबानी असे. व त्याचें सूचक आसदखानाच्या मुलीशीं त्यानें आपलें लग्न लावून घेतलें. इतकेंच नाहीं, तर तिच्यापासून जो पुत्र होईल तो आपल्यामागें गादीचा वारस समजावा असाही ठराव केला. व पुढें मागें घोटाळा उत्पन्न होऊं नये म्हणून पहिले राणीपासून झालेला मुलगा अली यास मिरजेस तुरुंगांत ठेविलें.

याच वेळीं ऐनलमुल्क नामक पदरच्या सरदारानें निमकहरामी करून विजापुरावर चाल केली होती, परंतु त्याचें कांहीं एक न चालतां शेवटीं तो प्राणास मात्र मुकला. हें संपतें आहे तोंच जमखिंडीकरानें अंमळ मुंडी हालविण्याचा प्रयत्न चालविला होता पण आसदखानाचा पुत्र खाजाकमाल यानें त्याची धुळधाण उडवून देऊन त्याचें शीर कापून हुजुरास पाठविलें.

यानंतर मात्र विशेष दंगाधोपा झाला नाहीं. यामुळें इब्राहिम यास प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष लावण्यास फुरसत सांपडली.

हा बादशाहा सुनीमतानुयायी होता, तरी आपला पंथ स्वीकारण्याविषयीं कोणावरही याची बिलकुल सक्ती नव्हती. ज्याला जो आवडेल त्यानें तो पंथ स्वीकारावा. ज्याप्रमाणें धर्मसंबंधानें

१ यांची कबर हल्लीं विजापुरांत आहे.



न्यूनाधिकभाव नव्हता त्याचप्रमाणें जातीविषयींही भेदभाव त्यानें ठेविला नाहीं. कोणी कोणत्याही जातीचा असो त्याचे योग्यतेप्रमाणें त्यास हुद्याचीं कामें मिळत. यांतही विशेषतः मराठे लोकांवर त्याचा फारच विश्वास बसला आणि त्यांस मोठमोठ्या जबाबदारीचीं कामें मिळूं लागलीं. सरकारी दफ्तरचें लिहिणें पूर्वीपासून फार्शी भाषेंत ठेवण्याचा प्रघात होता तेणेंकरून लोकांची फार गैरसोय होते असें वाटल्यावरून तें मराठींत ठेवावें असा यानें ठराव केला; व राज्यप्रकरणीं महत्वाचे लेख जरी फार्शी भाषेंत होत असत तथापि त्यांचा तर्जुमा मराठींत ठेवण्याची चाल पाडली. अशा ह्या फेरफारानें विजापूरचे दरबारांत ब्राह्मणांचें महत्व बरेंच वाढलें व त्यांस वतनें वगैरे मिळालीं. तीं अजून त्यांच्या वंशजांकडे चालत आहेत. मागील तीन सुलतानांच्या वेळीं लष्करांत मोठमोठे कामावर बहुधा इराण, तुर्कस्थान वगैरे अन्य देशांतून लोक आणून भरिले होते त्यांच्या ऐवजीं यानें इकडीलच पराक्रमी लोकांची योजना केली. पाटीलकुळकर्णी पूर्वीं मुसलमान होते ते हिंदु ठेविले.

ह्याच्या कारकीर्दींत मुख्यत्वें पुढें लिहिलेले मराठे सरदार विशेष उदयास आले:—चंद्रराव मोरे, रावनाईक निंबाळकर

१. या उदयास आलेल्या सरदारांची मूळ हकीकत आमच्या एका मित्रानें मुद्दाम आमचे वाचकांकरितां पाठविली आहे ती खालीलप्रमाणें:—

चंद्रराव मोरे.—यांची मूळ हकिकत अशी आहे कीं, पूर्वी कर्नाटकांत 'मोरे' या आडनांवाचा एक नाईक होता; त्यास युसफ आदिलशाह यानें मराठ्यांची मोठी फौज देऊन निरा आणि वारणा या दोन नद्यांमधील प्रदेश जिंकावयाकरितां पाठविलें होतें त्यावेळीं त्या

ऊर्फ फलटणराव, घाडगे, राव माने, घोरपडे, ड.ळे व सावंत-

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

मुलखांत शिरके ह्मणून कोणी बलिष्ठ मराठा सरदार होता त्यास जिंकून यानें तो मुलूख विजापूरच्या राज्यास सामील करून दिला. यामुळें युसुफ आदिलशाह खुष होऊन त्यानें त्यास 'चंद्रराव' असा किताब देऊन जावली परगण्याचा राजा केलें. हें नांव त्याच्या वंशजांस पुढें सात पिढ्यांपर्यंत चालत होतें.

फलटणराव (फलटण नाईक) निंबाळकर.—यांचें पूर्वीचें उपनांव पवार. यांचा मूळपुरुष 'निंबाळीक' गांवीं रहात असे. यास हल्लीं निंबलुक असें ह्मणतात. हें कूळ मराठ्यांत फार पुरातनचें आहे. यांचे मूळ पुरुषाकडे फलटण परगण्याचे देशमुखीचा कांहीं भाग होता. त्यांनीं आपले नांवांत कांहीं बदलणूक न करितां पहिलें नाईक हेंच कायम ठेविलें. त्यांच्या कुळांतील गंगोजी नाईक (ज्यास जगपाळ असेंही ह्मणत) ह्मणून कोणी वस्ताद पुरुष असे, त्याची बहीण मालोजी भोंसल्यास बायको केली होती.

घाडगे—हे माण परगण्याचे देशमुख. यांचें राहणें खटावप्रांतीं असे. ब्राह्मणी राजांच्या अमदानींत यांस मनसबदार केलें होतें. पुढें यांनीं विजापूरकरांच्या राज्यांत मोठी कामागिरी बजाविली, ह्मणून इ० स० १६३७ मध्यें सुलतान महंमद आदिलशाह यानें त्यांस 'झुंझारराव' असा किताब दिला.

रावमाने—हे म्हसवडचे देशमुख. विजापूरच्या दरबारीं शिलेदारीचीं कामें करून हे विख्यात झाले.

घोरपडे—यांचें मूळचें उपनांव भोंसले. यांच्या मूळ पुरुषानें कोंकणांतील एका तासलेल्या गडावर (ज्यावर चढण्यास बिलकुल आधार नाहीं अशा साफ व तुळतुळीत दगडांनीं बांधलेल्या किल्ल्यावर) घोरपडीच्या साह्यानें प्रवेश करून तो गड काबीज केला होता म्हणून त्यांस घोरपडे हा किताब मिळाला. विजापूरचे राज्याच्या अमदानींत यांजकडे देशमुखी असे.



बहादर. यांशिवाय धुमाळ, जाधव, रणदिवे, थोरात, मोहिते वगैरे सरदारांचीही मानमान्यता कमी होती असें नाहीं.

ह्या बादशाहांचे पदरीं आसदखान, शिकंदरखान, मोहिबखान, इब्राहीमखान, हुसेनखान, किशवरखान, व दामाजीराव असे सात वजीर होते.

युसफ आदिलशहानें आर किल्ल्यास घातलेला मातीचा तट यानें दोहोंबाजूंनीं दगडी बांधून काढिला; व त्याच वर्षी इब्राहिमपूर वसविलें. आर किल्ल्यांत यानें सोन्ळाखांबी महाल बांधला होता तो हल्लीं जमीनदोस्त आहे. इ० स० १५४८ ह्यावर्षी मशीद जहामे बांधिली. ही जाफरखायपीर यांचे घुमजापाशीं आहे.

यानें शहरांत—फत्तेजमा बाजार, कारंजी बाजार, सफा बाजार, जगती बाजार, रौ बाजार, रंगीमशीद बाजार, शिकारखान बाजार वगैरे कित्येक बाजार बसविले होते. ह्याचे जवळ २३,९५० पायदळ, २९,३५० स्वार व ४५० हत्ती असें लष्कर होतें.

हा बादशाह इ० स० १५५९ मध्यें मरण पावला. याचें शव विजापुरांतून गोगी येथें नेऊन कबरेंत घातलें.

यास वडील राणीपासून अली ह्मणून एक पुत्र होता, व धा-

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

डफळे—हे जत परगण्याचे देशमुख. डफळापूर येथील पाटीलकीही यांजकडेसच होती. ह्मणून विजापूरकर यांस डफळे म्हणूं लागले. यांचें मूळचें उपनांव चव्हाण. विजापूरचे दरबारांत यांजकडे मनसबदारीचा अधिकार असे.

सावंत बहादर—हे पूर्वापार वाडीचे देशमुख. गोंवें येथें पोर्तुगीज लोकांबरोबर लढाई करण्याचे कामीं यांनीं चांगली मदत केली ह्मणून यांस बहादर हें पद जोडलें.

कटे राणीपासून (असदखानाचे मुलीपासून) तमासाहेब, इस्मायल व अहंमद असे तीन पुत्र होते. तथापि पूर्वी ठराव केल्याप्रमाणें अंतकाळीं धाकटे राणीच्या वडील मुलास गादीवर बसवावें असें सांगून त्यानें प्राण सोडिला.

---

## सुलतान अली आदिलशाह.

इ० स० १५५५—१५७८.

ह्यास बापानें मिरज येथें कैदेंत ठेविलें होतें परंतु ती स्थिति ह्यास पूर्णपणें अनुभवावयाची नव्हती. कारण असदखान[1] हा फार शहाणा व दूरदर्शी वजीर होता. त्यानें आपल्या नातवांचे आणि अलीचे ग्रह पाहिले त्यांत अली हाच राज्यपदास योग्य आहे असें त्यास दिसून आल्यावरून आपले वडील नातवास गादीवर बसविण्याविषयीं बादशाहाची आज्ञा होती तरी त्यानें अली यासच मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें. व कदाचित आपले नातु बंड करितील म्हणून त्यांचे डोळे काढिले. हें त्याचें कृत्य पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें व सर्व मुसलमान प्रजा त्याची तारीफ करूं लागली. कारण आपला नातु गादीवर बसविला असतां राज्याचीं सर्व सूत्रें त्याचे हातीं असावयाचीं. तथापि पुढील गोष्टीवर धोरण ठेवून न्याय्य तेंच त्यानें केलें. परंतु पुढें ह्या त्याच्या शहाणपणाचा उपयोग झाला नाहीं. बापाच्या आंगीं जेवढे ह्मणून सद्गुण होते तेवढे अलीच्या आंगीं दुर्गुण होते. यामुळें हा कैदेंतच मरण पावला असता तर बरें झालें असतें असें सर्वांस वाटूं लागलें.

---

१ हा बेळगांव येथें १०५ वर्षांचा होऊन मरण पावला. याची कबर हल्लीं तेथें प्रसिद्ध आहे.



बापाचे पश्चात् यानें शिया मताचा स्वीकार केला व बापाच्या वेळचे जेवढे म्हणून शहाणे लोक दरबारांत होते त्यांस दूर करून शिया मताभिमानी जरी मूर्ख असले तरी त्यांस मोठमोठीं जबाबदारीचीं कामें सांगितलीं. हिंदु लोकांस तर अजीबातच फांटा बसला. एकंदरींत धर्मसंबंधानें त्यानें प्रजेवर फारच सक्ति चालविली. तुर्कस्थान, इराण वगैरे अन्य मुलखांतील लोक मात्र सैन्यांत ठेवावे असा हुकूम केला. दफ्तरचें लिहिणें जें पूर्वी मराठी भाषेंत चालत असे तें पुन्हां फार्शी भाषेंत ठेवावें असा ठराव केला. तात्पर्य काय कीं, बापानें जे जे ह्मणून शहाणपणानें फेरफार केले त्या सर्वांचीं तोंडें यानें पश्चिमेकडे फिरविलीं. यामुळें प्रजेंत नाखुषी उत्पन्न होऊन जिकडे तिकडे बंडाळी माजली.

धर्मसंबंधाचें तर यास फारच वेड होतें. कर्नाटकांत विजयानगर येथें हिंदूचें फार वर्षांपासून चालत आलेलें राज्य होतें तें ह्याच्या डोळ्यांत सलूं लागलें. आणि याकरितां त्यानें निजामशाही व बरीदशाही बादशहास आपल्या मदतीस बोलावून इ० स० १५६१ या वर्षी तेथील गरीब हिंदु राजावर धाल केली त्यां वेळीं तेथें रामराजा राज्य करीत होता. त्यानेंही पुष्कळ मराठे सरदार मदतीस बोलावून कडेकोट तयारी केली. ह्या दोन सैन्यांचें तुंबळ युद्ध तालीकोटनजीक कृष्णातटाकीं झालें त्यांत मुसलमानांचें सैन्य हिंदूंच्या हजारपट असल्यामुळें हिंदूंनीं जरी पराक्रम केले तरी मुसलमानांपुढें त्यांचें कांहीं चालेना. मुसलमान लोक दीनदीन करीत हिंदूंच्या शिरांचे ढीग घालीत चालले व शेवटीं मुसलमान लोक विजयी होऊन त्यांनीं रामराजास कैद केलें. आणि नंतर त्याच्या राजधानीचा विध्वंस करून सर्व हिंदूंचीं देवालयें धुळीस मिळविलीं. जिकडे तिकडे ओलीं

रोटी विकण्यास हुकूम झाला. शेवटीं त्या शरण आलेल्या हिं
राजाची त्यांस किमपिही दया न येतां त्यांनीं त्याचें शीर का
पून विजापुरांत किल्ल्याच्या तटावर नेऊन लाविलें.[1]

ह्यावेळीं धर्मच्छल व स्त्रीहेलना वगैरे जुलमांच्या योगानें मुस
लमानांनीं हिंदूंस किती जर्जर केलें होतें याचें वर्णन करतांन
देखील अंगावर कांटा उभा राहतो. ह्या प्रकारच्या मुसलमानां
च्या परमावधि जुलुमांविषयींचीं प्रमाणें पुष्कळ ग्रंथांतून सांपड
तात. तथापि विश्वगुणादर्श नांवाच्या काव्यांत पुढीलप्रमाणें वर्ण
केलें आहे; या पेक्षां ज्यास्त वर्णन करण्याची बहुधा गरज नाहीं

अवनावतीतपवनाश्वशोभिनो ।
भवनागशायिभवनाभिमर्दिनः ॥
सवनादिकर्मलवनायदीक्षिता ।
यवनाश्चरन्तिभुवनाविभीषणाः ॥

अर्थः—वायुपेक्षांही त्वरित गति आहे ज्यांची अशा अश्वांनीं
शोभायमान, आणि शंकर व विष्णु यांचीं भवनें अर्थात देवालयें
यांस जमीनदोस्त करणारे, तसेंच यज्ञयागादिकांच्या उच्छेदा
च्या कामाकरितांच दीक्षा घेतली आहे ज्यांनीं, असे जे यवन
ते भुवनाला भयप्रद होत्साते भारतवर्षीय पृथ्वीवर फिरत आहेत

असो, ह्याचवर्षी ह्यानें मुद्गल, धारवाड व बंकापूर हीं घेतलीं
आणि बंकापूरचा व दुसरे पुष्कळ किल्ले बांधिले. पुढें इ० स०
१५७० त अली आणि निझाम यांनीं मिळून गोंवें व चौल ह्यांवर

१ हें शीर पुढें कैक वर्षें किल्ल्याच्या वेशीवर होतें तें पुढें सातारकर महाराजांनीं तेथून काढून ताजबावडींत टाकून दिलें असें विजापुरांतील लोक सांगतात.



स्वारी केली. परंतु तींत त्यांचे प्रयत्न सफल न होतां मुठींत नाक घेऊन मागें फिरावें लागलें.

निझामाचें व अलीचें फारच सख्य होतें, ह्मणून निझामानें आपली कन्या जी चांदबीबी ती अली आदिलशाहास इ० स० १५६५ या वर्षी दिली. हिच्या नांवाची चांदबावडी म्हणून एक विहीर विजापुरांत प्रसिद्ध आहे.

या बादशाहास इमारती बांधण्याचा फार नाद असे. यानें किल्ल्यांत गगनमहाल, सब्जेमहाल व हव्यामहाल, असे महाल बांधिले. शिवाय चिंचडी मशीद जामा मशीद (हिला हल्लीं जुम्मा मशीद ह्मणतात), मोहरमांत पंजे बसविण्याकरितां आशीरखाना, तसेंच विजापूर शहराभोंवतालचा अजस्त्र तट आणि आर किल्ल्यास शाहाबुरुज व महाबुरुज ह्मणून जे भव्य बुरुज आहेत ते ह्यानेंच बांधिले. हीं सर्व कामें त्यानें हिंदुस्थानांतून व लांबलांबून हुशार गवंडी व कारागीर आणून त्यांजकडून करविलीं होतीं.

पुढें लिहिलेले बाजार ह्याचे कारकीर्दीत वसले:—शापूर पेठ, जामामशीद बाजार, शाहाअबुतुराब बाजार, शिकंदरखान बाजार, हैदरखान बाजार व दलेरखान बाजार.

ह्यानें एका प्रकारच्या मंत्रयुक्त मोहोरा छापिल्या होत्या. तशा प्रकारच्या मोहोरा हल्लीं कित्येकांजवळ आहेत. भूतबाधा वगैरे झाल्यास ही मोहोर धुऊन तिचें पाणी पाजिलें असतां तात्काळ गुण येतो ह्मणून सांगतात.

हा बादशाह इ० स० १५७८ ह्यावर्षी ठार मारला गेला. ह्यास इब्राहीम व इस्मायल असे दोन पुत्र होते. पैकीं इब्राहीम हा त्याचे मागून गादीवर बसला.

१. पैकीं दुसरे दोन हल्लीं जमीनदोस्त आहेत.

# सुलतान इब्राहीम आदिलशाह जगद्गुरु.

## ( छोटा इब्राहीम. )

इ० स० १५७८—१६२६.

इब्राहीम यास लहानपणीं विद्येचें उत्कृष्ट शिक्षण मिळालें होतें, व जात्याही त्यास विद्येची फार आवड होती. ह्मणून गादीवर बसल्यानंतर त्यानें आपल्या बापाच्या वेळचे जे अक्षरशत्रु पंडित (?) होते त्यांस विसांवा घेण्यास लावून खऱ्या विद्वानांस चांगला आश्रय दिला, आणि बहुतेक गोष्टींत आपल्या आजाचा कित्ता गिरविला, तेणेंकरून देशांत शांतता होती.

---

१. ह्यास जगद्गुरु म्हणूं लागण्याचें कारण मुसलमान इतिहासकारांनीं फार चमत्कारिक दिलें आहे.—एके दिवशीं रात्रीं इब्राहीम आदिलशाह आपल्या सात मजली माडीवरील एका मजल्यांत प्रियेसह शयन करीत असतां, कोणी मनुष्य अंतरिक्षमार्गानें त्या माडीवरून जात होता, त्यानें हें सुस्वर गायन ऐकिलें तेव्हां तो गायनामृत प्राशनाविषयीं अगदीं लुब्ध होऊन जाऊन त्या माडीवर उतरला. तेथें आल्यावर कांहीं वेळानें बादशहाचा तो सुस्वर व ते आलाप ऐकून तो आनंदसागरांत इतका गढून गेला कीं, गायन ऐकतां ऐकतां त्यास तेथेंच निद्रा लागली. गायन आटपल्यावर बादशाह सहज वरील माडीवर गेला तों कोणी मनुष्य निद्रिस्त असून त्याचे तोंडाबाहेर जवळच एक गुटिका व अंगा शेजारीं एक कावड पडली आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां हा कोण व येथें कसा आला याचें बादशाहास आश्चर्य वाटलें व याचा शोध युक्तीनें लाविला पाहिजे असें मनांत आणून त्यानें त्या मनुष्यास तसेंच निद्रिस्त ठेवून त्याच्या जवळील गुटिका मात्र हळूच उचलून घेऊन आपण महालांत निघून गेला. कांहीं वेळानें हे गायनानें बेशुद्ध झालेले गृहस्थ जागे होऊन इकडे



ह्या बादशाहास गाण्याचा फारच छंद होता. इतका कीं,

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

तिकडे पाहतात तों कावड असून गुटिकाच तेवढी काय झाली म्हणून आसपास शोधून पाहूं लागले. परंतु शेवटीं गुटिका खरोखरच नाहींशी झाली असें जेव्हां कळलें तेव्हां त्यांनीं आपल्या रूदनरूपी गायनास आरंभ केला. परंतु अशा प्रकारचें गायन तेथील पहारेकऱ्यांनीं कधींच ऐकिलें नसल्यामुळें, त्यांनीं लागलाच शोध करून ह्या गायकास बादशाहापुढें नेलें. बादशाहानें, त्याला तूं येथें येण्याचें व असें होण्याचें कारण काय म्हणून विचारिलें. तेव्हां तो सांगू लागला कीं, हे भूपते, मी काशीक्षेत्रस्थ एका तपस्व्याचा शिष्य असून माझा नित्यक्रम गुरूंनीं मंत्रून दिलेली गुटिका तोंडांत धरून रात्रीं काशीहून रामेश्वरास जावें व तेथील उदक घेऊन प्रातःकाळीं परत काशीस येऊन त्या उदकानें गुरूजींनीं रोज स्नान करावें. याप्रमाणें आज या मार्गानें जात असतां ह्या माडीवरील सुस्वर गायन ऐकून भूलोकींच्या क्षणैक सुखास भुलून गेलों, आणि तसाच गायन ऐकतां ऐकतां निद्रावश झालों. जागा होऊन पाहतों तों गुटिकाच तेवढा नाहींशी झाली आहे असें पाहून रुदन करूं लागलों. कांकीं, गुरुजी प्रातःकाळीं वाट पहात बसतील व कदाचित् लवकर न आल्यामुळें शाप देतील. तथापि माझ्या अपराधाची क्षमा असावी.—हें त्याचें निरपराध व नम्रतायुक्त भाषण ऐकून बादशाहास दया आली, व त्यानें ती गुटिकाच त्याचे स्वाधीन केली. ती घेऊन तो शिष्य आपल्या नित्यक्रमाप्रमाणें परत काशीस जाऊन पोंचला. तेव्हां इतका अवधी लागण्याचें कारण गुरुजींनीं विचारिल्यावरून त्यानें सर्व वृत्तांत निवेदन केला. तेव्हां गुरुजींनीं तें सर्व ऐकून घेऊन संतोषित अंतःकरणानें त्याच शिष्याबरोबर बादशाहास ‘ जगद्गुरु ’ असा किताब पाठविला. व संकटसमयीं माझें स्मरण करीत जा असेंही कळविलें. त्या दिवसापासून बादशाहानें हा साधुप्रसाद जाणून आपल्या नांवापुढें ‘ जगद्गुरु ’ असें पद जोडलें, व सर्व लोक त्यास ‘ इब्राहीम आदिलशाह जगद्गुरु ’ असें ह्मणूं लागले.

त्यानें तत्प्रीत्यर्थ नवरोजपूर ह्मणून गांवही वसविला होता. विजापूरचा हा बादशाह मोठा गवय्या आहे, अशी कीर्ति सर्व हिंदुस्थानभर पसरल्यामुळें दूरदूरच्या प्रदेशांतूनही गाण्याचे शौकी केवळ याचें गाणें ऐकण्याकरितां येत असत. याच्या गायनासंबंधानें आणखी एक विशेष गोष्ट अशी सांगतात कीं त्याचा गाण्याचा लौकिक ऐकून दिल्लीचा बादशाह अकबर हा दिल्लीहून गुप्तवेषानें आला होता. आणि याच कारणानें आदिलशाहीचें अफाट वैभव पाहून त्यानें इ० स० १५९९ या वर्षी विजापूरकरांच्या राज्यांत शिरून त्यानें त्यांचे बरेच मुलुख काबीज केले. आणि शेवटीं विजापूरकरांस मोंगलाशीं गुप्त तह करून वाटेस लावणें भाग पडलें. यापूर्वी विजापूरकरांचा मोंगलांशीं अर्थाअर्थी संबंध नव्हता.

असो. ह्या बादशाहास गायनाचा जसा छंद होता तसा इमारती बांधण्याचाही शोक असे. आणि हें त्याच्या इब्राहीमरोझा ह्या अनुपम इमारतीवरून व त्यानें बांधिलेल्या नवरस महाल, नारी महाल, आनंद महाल, सातमजली माडी व उपलीबुरुजाजवळील छोटा आसार ह्या इमारतींवरून स्पष्ट होत आहे.

एकंदरींत हा बादशाह हौसी व विलासी होता. नौरस ह्मणून असाच एक शब्द ह्यास काय आवडला होता कोण जाणे! त्यानें आपल्या राणीस नौरस, महालास नौरस, गांव वसविलें त्यास नौरस, इतिहास करविला त्यास नौरसनामा अशा नांवांची गर्दीच करून सोडली होती. तथापि इतका जरी तो गायनप्रिय व विलासी होता तरी त्यानें कांहींच पराक्रम केला नाहीं असें नाहीं; इ० स० १५८२ ह्या वर्षी गुजराथ, अहंमदनगर वगैरे प्रांत घेतले व इ० स० १६१७ त बेदरचा किल्ला यानें काबीज केला. शिवाय आपले पराक्रमानुरूप याचेजवळ १,०४,००० पायदळ, ९२,५०० घोडेस्वार आणि ३,०५० हत्ती एवढें अफाट सैन्यही होतें.[१]

१ ह्याविषयीं सविस्तर माहिती पुढें एका स्वतंत्र लेखांत दिली आहे.



हा बादशाह इ० सन १६२६ या वर्षी मृत्यु पावला. ह्यास चार बायका असून त्यांपासून महंमद व सुलेमान असे दोन पुत्र होते. पैकीं तिसरी बायको जी ताजसुलताना हिचा पुत्र महंमद हा पुढें गादीवर बसला.

---

## सुलतान महंमद आदिलशाह.

### इ० स० १६२६—१६५७.

बाप मरण पावला त्यावेळीं ह्याचें वय पंधरा सोळा वर्षांचें होतें. तथापि राज्य चालविण्यापुरतें याचे अंगीं ज्ञान आलें होतें. ह्यानें मराठ्यांस मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या, व मुरार पंडित ह्मणून एक फार हुशार व प्रामाणिक ब्राह्मण होता त्यास आपला वजीर (मुख्य प्रधान) नेमिलें. या वजिराच्या साहाय्यानें छत्रपति शिवाजी महाराज यांचे वडील शहाजी भोंसले यांस विजापूरच्या राज्यांत मनसबदारीची जागा मिळाली होती.

हा गादीवर बसून कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच विजापूरकरांचा मोंगल लोकांशीं बराच वैरभाव उत्पन्न झाला. ह्याचें कारण असें झालें कीं, मागील सुलतानाचे वेळीं विजापूरकरांच्या मोंगल लोकांशीं झालेल्या गुप्त तहांत 'निजामशाहीचे मुलुख घेण्यास विजापूरकरांनीं मोंगलांस मदत करावी व त्याबद्दल मोंगलांनीं त्यांस सोलापूर व कोंकणांतील कांहीं गांव द्यावे, असें ठरलें होतें त्यावर यानें पाणी सोडून त्यांचे मसलतीशिवाय निजामशाहीचे कांहीं किल्ले काबीज केले. शिवाय

इतकें करूनही ते काबीज केलेले किल्ले व 'मलेकामैदान'[1] तोफ विजापुरास आणिली ती द्यावी अशी मोंगलांनीं मागणी केली असतां, त्याकडेही सुलतानमहंमद यानें कानाडोळा केला. यामुळें शाहाजाहान बादशाहास फार संताप आला, आणि त्या दिवसापासून मोंगलांनीं विजापूरच्या राज्याचें समूळ वाटोळें करण्याचें मनावर घेतलें.

पुढें लवकरच मोंगलांचें मोठें सैन्य दक्षिणेंत येऊन उतरलें. त्यांनीं कर्नाटकांतील बहुतेक खेडीं उद्ध्वस्त केलीं, व एकसारखीं दोन वर्षेपर्यंत विजापूरकरांच्या राज्यांत धुमाळी मांडिली. शेवटीं सुलतानमहंमद यास मोंगलांशीं मुकाट्यानें तह करणें भाग पडलें. व त्या तहांत सालिना वीस लक्ष होन विजापूरकरांनीं मोंगलास देण्याचें ठरलें.

यानंतर ह्मणजे इ० स० १६५१ या वर्षीं सुलतान महंमद यानें गोवळकोंड्याच्या (कुतुबशाही) बादशाहाची मुलगी आपणास बायको करून घेतली. यामुळें ह्या दोन राज्यांतही कांहीं तंटाभांडण न राहून तीं निजधामास जाईपर्यंत एकोप्यानें वागत असत.

ह्या बादशाहाची मुसलमान इतिहासकार फार तारीफ करितात. परंतु हा योद्धा नसून आयत्या पिठावर रेघा ओढणारा होता. हा फकीर वगैरे लोकांचा पोशिंदा होता येवढें मात्र खरें. व त्यामुळेंच त्यास दरवेश पादशाह असें ह्मणत. काजी खतीब, सदर मुफती, बांगी वगैरे लोकांस यानें जाहागिरी करून दिल्या, व त्या अजूनही त्यांच्या वंशजांकडे चालत आहेत. पण बिकट मोहिमेवर बहुधा वजिराशींच प्रसंग पडत असत.

१ हिचें वर्णन पुढें एका स्वतंत्र लेखांत दिलें आहे.

२ हिलाच पुढें 'बडी सायबीण' असें ह्मणत असत.



हा शहराबाहेर अवघे पांच कोशही गेला नाहीं. शहरांतल्या शहरांत राहून यानें आपलें बहुतेक आयुष्य विलासांत व इमारती बांधण्यांत घालविलें. बोळघुमंज ह्मणून जी प्रसिद्ध इमारत पाहणारास अगदीं थक्क करून सोडते ती बांधण्यास ह्यानेंच आरंभ करून याचेच कारकीर्दींत तिचें काम पुरें झालें. शिवाय आसार महाल, अर्धा बेगमचा अपुर्ता घुमज हाशीमपीरचा घुमज ह्या इमारती व शहरच्या दक्षिणेस असलेला बेगम तलाव[1] हीं कामेंही याचींच आहेत.

याच्या कारकीर्दींत दौलतपूर व पादशाहापूर हे गांव आणि महंमदशाहा बाजार, इसलाखा बाजार व अबदुल शेख बाजार असे बाजार वसले.

हा बादशाह फार विषयी व चैनी होता असें वर थोडेंसें दर्शविलेंच आहे. ह्यानें नाना तऱ्हेच्या विषयोपभोगाच्या सर्व कांहीं चिजा शहरांत उत्पन्न केल्या होत्या. नवरोजचा सण व आपला जन्म दिवस अशा सणांचे प्रसंगीं हा मोठा उत्सव करीत असे. तेवेळेस मखमली बैठका व रेशमी आणि किनखापी पडदे यांहींकरून सुशोभित अशा चिनी महालाच्या किंवा आनंद महालाच्या दिवाणखान्यांत बादशाहाची स्वारी बसत असे, सभोंवते रत्नखचित शिरपेंच लाविलेले मानकरी उभे असत; राजवाड्यापुढें माणकांनीं व पाचांनीं जडित पिंपळवर्णें बांधिलेले हत्ती व त्यांच्या मागून मोत्यांच्या कलग्या लावलेले घोडे व त्यांवर बसलेले भरगची पोषाकांचे स्वार यांच्या रांगा चालत; बादशाह द्रव्याच्या तुळा करून गरिबांस वांटी, आणि

१ हा तलाव ह्यानें इ० स० १६५४ या वर्षीं आपली प्रियराणी सुलतानबेगम हिच्या नांवानें बांधिला असून हल्लीं सर्व शहरांत याचेंच पाणी खेळत आहे.

सोन्यारुप्याचे केलेले बदाम व दुसरीं फळें आपल्या हातानें उधळीत असे, असें सांगतात. ह्या बादशाहाच्या कारकीर्दींत विजापूर शहर फारच वैभवास चढलें होतें. ह्याचें सत्यता एका फ्रान्स देशांतील प्रवाशानें आपल्या ग्रंथांत वर्णन केली आहे.*

असो. ह्या सर्व वैभवास तो इ० स १६५६ या वर्षी अंतरला. यास एका हबशी स्त्रीपासून अल्ली ह्मणून एकच पुत्र होता व तोच याचे मागून गादीवर बसला.

---

## सुलतान अली आदिलशाह.

### ( छोटा अली )

इ० स० १६५६–१६७२.

हा गादीवर बसला त्यावेळीं याचें वय १९ वर्षांचें होतें. ह्या वेळीं विजापूरच्या खजिन्यांत फार पैसा होता त्याप्रमाणेंच अफाट सैन्य असून ताब्यांत पुष्कळ सुपीक मुलुखही होता. हें सर्व जर ह्यानें चांगल्या रीतीनें चालविलें असतें तर असे कि

* According to the French traveller Mandelslo, who visited India in 1638 and 1639 Bijapur was one of the greatest cities in the whole Asia more than five leagues or fifteen miles round, enclosed with a high stone wall, a broad ditch and many outworks provided with 1000 pieces of brass and iron cannon. Among the kings artillery was one great piece of brass the ball which weighed eight hundredweights and the charge of which was 4500 pounds of fine powder.

*Gazetteer* (587.)



तींक औरंगजेब ह्याच्या पुढें लटपटून राहिले असते. परंतु ह्मटलें आहेना, " चक्रवत् परिवर्तंते दुःखानिच सुखानिच." तेव्हां एखादा राष्ट्राचा स्वामी असो अथवा सामान्य मनुष्य असो, त्याच्यामागें दुःख व सुख हीं केव्हांना केव्हां लागलेलींच आहेत. त्याप्रमाणेंच हा गादीवर बसल्यापासून याचे मागें विघ्नें कशीं एकामागून एक तयार होतीं.

मागील बादशाहाचे वेळीं विजापूरकरांनीं मोंगलांस प्रतिवर्षी २० लक्ष होन करभार देण्याचें कबूल केलें होतें असें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां अर्थात् तेव्हांपासून विजापूरचें राज्य हें दिल्लीच्या वर्चस्वाखालीं केवळ मांडलिकाप्रमाणें होतें. इतकेंच नाहीं, तर विजापूरच्या दरबारांत दिल्लीचे बादशाहाचे परवानगीवांचून कोणतीही महत्वाची गोष्ट घडत नसे. त्याप्रमाणें अली हा गादीवर बसणार ही गोष्ट मोंगलांचे मसलती शिवाय झाली, ह्यामुळें शाहाजाहान बादशाहास फार राग आला; आणि प्रत्यक्ष न दाखवितां त्यानें लोकांकडून अशी अफवा उठविली कीं, " माजी सुलतानाचा हा खरा वारस नव्हे; दासीपुत्र आहे. याकरितां दिल्लीपति सार्वभौम बादशाहानीं गादीचा खरा वारस कोणता तो ठरवून मग ह्या गादीवर बसवावें." आणि ह्याप्रमाणें प्रजेची कुरकुर मोडण्याचा घाट दाखवून हा गादीवर बसला त्याच वर्षी औरंगजेब हा अफाट सैन्यभार घेऊन विजापूरचें राज्य पादाक्रांत करावें म्हणून दक्षिणेंत उतरला.

हें वर्तमान विजापूरकरांस समजतांच त्यांनींही आपलेकडून कडेकोट तयारी चालविली. विजापूरकरांचा मुख्य सेनापति खानमहंमद ह्मणून होता, त्यास निंबाळकर, घाडगे, घोरपडे इत्यादि मराठे सरदार आपआपल्या फौजेनिशीं येऊन मिळाले.

औरंगजेब ह्यानें विजापुरावर हल्ला करण्याचा निश्चय केला व

विजापूरच्या आसपास उभय पक्षांकडील योध्यांच्या तरवारीही चमकूं लागल्या. पुढें लवकरच कर्नाटकांत बेदरचा[1] किल्ला फारच बळकट होता तो मोगलांनीं एका दिवसांत काबीज केला. त्यास आकस्मिक कारण असें झालें कीं, तेथील किल्ल्यांतील दारूच्या मुख्य कोठारास एकाएकीं आग लागून कोट उडाला. मग काय विचारतां, अनायासेंच मोंगलांचें सैन्य आंत शिरून त्यांनीं किल्ल्याच्या रक्षकांची कत्तल उडविली, व एका क्षणांत किल्ला हस्तगत करून घेतला. ह्या जयामुळें औरंगजेबास हर्षवायु होऊन, ' आतां विजापूर घेण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं असें समजून तो एकदम विजापुरावर चालून आला.

औरंगजेबाचें विजापूरकरापुढें कांहीं चाललें नसतें ; व त्याच्या एकदोन टोळ्यांचा विजापूरकरांनीं अगदीं पाडावही केला होता ; परंतु विजापूरकरांच्या सैन्याचा मुख्य जो खानमहंमद

१ बेदरचा किल्ला एका दिवसांत काबीज केल्याबद्दल औरंगजेब यास मोठा हर्ष होऊन त्यानें खालील मतलबाचें शिवाजीस मुद्दाम खासगी पत्र लिहिलें होतें.

" The fort of Beder which is accounted impregnable and which is the key to the conquest of the Deccan and Carnatic has been captured by me in one day, both fort and town, which was scarcely to have been expected without one year's fighting"—Original letter from Aurangzeb to Siwajee—( Grant Duff Vol' 1 P. 115. )

"जो बेदरचा किल्ला ह्मणजे दक्षिण व कर्नाटक येथील राजाचें केवळ नाकच, व जो घेण्याकरितां मला सतत वर्षभर लढावें लागलें असतें, तो मी एका दिवसांत काबीज केला."'—( ग्रांट डफचा इतिहास भाग १ ला पान ११५ )



तो निमकहरामी करून निर्लज्जपणें औरंगजेबास जाऊन मिळाला, यामुळें विजापूर शहर हस्तगत करण्यास औरंगजेबास फारसें कठीण गेलें नाहीं हें सांगणें नकोच. शिवाय दुसरें कारण असें झालें कीं, शहरांतील लोकही अव्यवस्थित होते.

विजापुरांतील शहरवासी जनांचा असा परिपाठ असे कीं,—लढाई वगैरेची कोठें कांहीं गडबड दिसूं लागली कीं, शेतांतील धान्य आणून पेवांमधून छपवून टाकावें व शहरांतील मुख्य मुख्य विहिरींचें व खंदकांतील पाणी नाहींसें करून टाकावें ह्मणजे शत्रूंस दाणा वैरणीची आपोआप तूट पडून त्यांनीं आपला मार्ग सुधारावा. परंतु ह्या वेळीं मात्र असें घडून आलें नाहीं ; कारण लोक अगदीं बेसावध होते व शहर शत्रूंच्या हस्तगत होईल असें त्यांस वाटत नव्हतें. औरंगजेब ह्यानें शहरांत एकदम शिरून जिकडे तिकडे दाणादाण करून दिली. प्रथम शहरचे रक्षक होते त्यांनीं बराच दम धरिला, परंतु मोंगलांच्या अफाट सैन्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. यामुळें अल्पवयी सुलतान व राज्याची व्यवस्था पाहणारी त्याची सावत्र आई बडी सायबीण हीं अगदीं घाबरून गेलीं, व त्यांनीं औरंगजेबास एक कोट रुपये रोख व आणखी मागेल तें देण्याचें कबूल केलें. त्यास हें रुचेल कसें ? त्यास विजापूरच्या राज्याचें समूळ वाटोळें करावयाचें होतें ! पण काय चमत्कार पहा कीं, त्यावेळीं तसा योगायोगच आला नव्हता, ह्मणून औरंगजेबाचे विचार जागच्या जागीं राहिले. औरंगजेब इकडे अशा गर्दींत आहे तोंच बापाची प्रकृति फार बिघडल्याचें पाहून त्याची प्रिय बहीण[1] जी रोशनार हिजकडून

१ 'रोशनार' ही औरंगजेबाची बहीण होती असें आम्हांस मिळालेल्या माहितीवरून व खालील इंग्रजी उताऱ्यावरून दिसून

( पुढें चालू. )

त्यास गुप्तपणें लिहून आलें कीं, "असशील तसें निघून यावें." यामुळें त्यानें घटकेचा विलंब न लावितां मुक्काम्यानें दिल्लीचा मार्ग धरिला. कारण बापाचे मागें त्यास गादी मिळावयाची होती. ह्यामुळें ह्या वेळीं विजापुरावर धाड कोसळली होती तिची ईश्वरानें खैरच केली ह्मणावयाचें !

---

(मागील पृष्ठावरून.)

येतें. परंतु हल्लीं नुकत्याच शोधपूर्वक लिहून छापून प्रसिद्ध झालेल्य 'छत्रपति संभाजी महाराज' नांवाचे पुस्तकांत 'रोशनार' ही औरंगजेबाची मुलगी होती असें त्याच्या कर्त्यानें पदोपदीं ह्मटलें आहे:—

"औरंगजेबाची कन्या रोशनार हिच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून कोणत्या तरी युक्तीनें तिला फसवून वश करावी याविषयीं तो [संभाजी] मसलती करूं लागला." (पान १०९)

ग्रांटडफ साहेब आपल्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या ११५ व्या पानांत ह्मणतात:—

"This circumstance was the supposed mortal illness of the emperor, news of which at this important moment reached Aurangzebe having been privately despatched by *his sister Roshanara Begum*" (Grant Duff, Vol. 1 page 155.)

"औरंगजेब ईकडे विजापूरचें राज्य पाळथें घालण्याच्या अगदीं गर्दींत आहे. परंतु असा कांहीं त्या वेळचा ऋणानुबंध होता कीं इतक्यांतच त्याची (औरंगजेबाची) बहीण रोशनार बेगम हिजकडून शाहाजाहान बादशाहाच्या जिवावरील दुखण्याचें गुप्त वर्तमान त्यास आलें."

याचप्रमाणें इ० स० १८१२ या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या आलेक्झांडर डो साहेबांच्या हिंदुस्थानाच्या इतिहासांत ते ह्मणतात:—

(पुढें चालू.)



परंतु हें एक अरिष्ट टळलें ह्मणून विजापूरकरांस स्वस्थता मिळाली असें नाहीं. शिवाजी हा पूर्वीपासूनच त्यांचे मार्गे हात धुवून लागलेलाच होता. त्यानें रसद चालूं देऊं नये; आपल्या फौजेंत मणाची धारण, तर त्यांच्या लष्करांत शेराची धारण ठेवावी; मराठी फौज किती आहे याचा त्यांस अदमास लागूं न देतां त्यांचे फौजेपासून पंचवीस तीस कोसांचे अंतरानें राहून त्यांचेवर वरचेवर छापे घालावे व त्यांचे फौजेस चैन पडूं देऊं नये; त्यांचीं ठाणीं व त्यांजकडे वहिवाटींत असलेले मुलूख यांतील लोकांनीं आपणांशीं लक्ष ठेवून वागावें ह्मणून त्यांस भीति घालावी; आपली फौज ज्या मुलुखांत जाईल तेथील लोकांनीं व जमेदारांनीं खंडणी देऊन तिचा बचाव केला पाहिजे ह्मणून सक्ति चालवावी; असा क्रम आरंभिला होता.

विजापुरांत रोज खबर जात असे कीं, "शिवाजी हा गडा-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

Aurangzeb's physicians advised him to avoid, by an expedition to Cashmera the heat of the ensuing season, and his favourite sister Rochinara, whose counsels he generally followed, being very desirous of visiting that delightful country, persuaded him to prepare for his progress (History of Hindoostan by Alexander Dow "1812" (P. 322.)

"ह्या ग्रीष्मऋतूंत आपण काश्मिरास जावें अशाविषयीं औरंगजेबास त्याच्या शरीरसंरक्षकांनीं मत दिलें, आणि मतास त्याची (औरंगजेबाची) प्रिय बहीण रोशनार हिचेंही पूर्ण अनुमोदन होतें. इतकेंच नाहीं, तर रोशनार ही त्या तयारीसही लागली."

यावरून संभाजी कर्त्याची ही केवळ नजरचूक असून ती एका ठिकाणची चूक सर्व पुस्तकास भोंवली कीं काय नकळे !

मागें गड घेत चालला आहे, व दिवसानुदिवस तो बळावत चालला आहे. त्यानें अकस्मात यावें व बक मच्छ उचलून नेतो तसा अचुक घाला घालावा; शिपाईगिरीची शर्त करावी; प्रसंग पडल्यास माघारें पळून जावें; त्याचे लोक खाण्यापिण्याची दरकार बाळगीत नाहींत; पाऊस, ऊन, थंडी व अंधारी कांहीं न पाहतां घोड्यावरच हरभरे व भाकरी, चटणी, कांदे खाऊन धांवतात; त्यांस कसें जिंकावें? त्याची फौज एका मुलुखांत आली ह्मणून जों त्याजवर जावें, तों त्यानें दुसरीकडे जाऊन ठाणीं घ्यावीं; हा आदमी नव्हे, तर भुतखाना आहे." तेव्हां शिवाजी हा एक त्यांस रोगच जडलेला होता ह्मणावयाचें. परंतु तो दिवसेंदिवस बळावत चाललेला पाहून त्यांस मोठी दहशत पडली, आणि त्यानीं प्रथम शिवाजीस लालूच दाखवून व धमकी देऊन पाहिलें, पण सर्व व्यर्थ गेलें. नंतर आपल्या चिरंजीवाचें बंड मोडावें ह्मणून शाहाजी कर्नाटकांत असतां त्यास पत्र लिहिलें. परंतु 'तुह्मांस मन मानेल त्याप्रमाणें करावें—माझें तो ऐकणार नाहीं' असें शाहाजीचें उत्तर मिळाल्यामुळें त्यांनीं शिवाजीस शरण आणण्याकरितां ह्मणून बाजी घोरपडे याचे मार्फत शाहाजीस विश्वासघातानें धरवून आणून भिंतींत कोंडून ठेवलें. पण शिवाजी कसला युक्तिवान! त्यानें शाहाजाहान बादशाहाची कृपा संपादून त्याजकडून आपल्या बापाची सुटका करविली.

त्यानंतर ह्मणजे इ० स० १६५९ या वर्षीं शिवाजीचें पारिपत्य करण्याचें ठरून अली आदिलशाह ह्यानें शहरांतील सर्व बडया बडया लोकांचा दरबार भरविला व पैजेचे विडे मांडिले. परंतु शिवाजीवर जाण्यास कोणी धजेना. शेवटीं अफझुलखान नांमें एका श्रेष्ठ प्रतीच्या सरदारानें बादशाहापुढें लांब लांब मि-



थ्या बाता झोंकून शिवाजीवर १२,००० लोकांची टोळी जात होती तिचें अधिपत्य आपण होऊन स्वीकारिलें.

ही फौज कृष्णानदीचे कांठीं वांईपर्यंत येऊन दाखल झाली. नंतर अफझुलखानानें तेथूनच प्रतापगडावर आपला कारकून शिवाजीकडे पाठवून त्यास कळविलें कीं, शरण याल तर तुमचे अपराधांची क्षमा होऊन पुढें अधिक कल्याण होईल. शिवाय 'आपली गांठ घेणें आहे, करितां भेटीची कशी काय व्यवस्था करावयाची' हेंही कळवावें ह्मणून कारकुनाबरोबर विचारण्यास सांगितलें होतें. कारकुनानें खानांचा निरोप सांगितल्यावर शिवाजीनें भेटण्याचें कबूल केलें, परंतु अफझुलखानाचें सैन्य किल्ल्याचे पायथ्याशीं उतरूं देणार नाहीं व पुष्कळ लवाजमा घेऊन भेटीस येऊं देणार नाहीं असें सांगण्यास सांगितलें. अखेरीस भेटीचा निश्चय होऊन तयारीस आरंभ झाला.

शिवाजीनें इतकी कडेकोट तयारी चालविली कीं जसें कांहीं जिवावर अति दुर्घट अरिष्ट येऊन पोहोंचलें आहे! सदोदित भयंकर प्रसंगांचा यास अनुभव असे तरी या वेळीं साधारणतः मनाला जें स्थैर्य असावें तेंही शिवाजीचे अंगीं नव्हतें. त्यानें ब्राह्मणास पुष्कळ दानधर्म केला, व ईश्वरानें या प्रसंगांतून पार पाडावें म्हणून एक ब्राम्हण गयेस व एक काशीस पाठविला. तसेंच त्यानें न जाणो काय संकट येणार आहे या शंकेनें नेहमींचा पोषाख न करितां प्रसंगानुरूप तजवीज ठेविली होती त्याच्या आईनें त्यास पोटाशीं धरून 'तूं मनांत काय आणिलें आहेस तें टाकून दे, अशी विनवणीही केली. या त्याच्या सर्व कृतीवरून त्यास अतिशय धास्ती पडली आहे असें दिसत होतें तथापि आपला कपटी हेतु सिद्धीस जाण्यास जी जी म्हणून सावधगिरी पाहिजे होती तींत त्यानें किमपीही कमी पडूं दिलें

नाहीं. भेटीच्या तंबूजवळ छापा घालण्याकरितां गुप्तपणें लोक दडवून ठेविले होते. तसेंच ऐन मार्‍याचे जागीं त्यानें आपली फौज बसविली व शत्रूंचे तळाकडे तोफांचा मोर्चा लावून ठेविला होता.

अफझुलखानास त्याच्या मित्रमंडळीनें या सैतानाच्या भेटीस जाऊं नये ह्मणून पुष्कळ सांगितलें, परंतु त्यानें त्यांचें सांगण्यास न जुमानतां तो शिवाजीचे भेटीस आला. प्रतापगडावर जाण्याचा रस्ता उंचसखल व अगदीं संकुचित असल्यामुळें त्याला हत्तीवरून उतरणें भाग पडलें. नंतर तेथून त्यानें शिवाजीस कळविलें कीं, तुम्हींच भेटीकरितां खालीं यावें. परंतु 'असें होणें नाहीं, म्हणून शिवाजीचा निरोप आल्यावरून अफझुलखानानें मूळारंभीं बेत केल्याप्रमाणें किल्ल्यावर जाण्याचा निश्चय केला. अफझुलखान भेटीस आला हें पाहून शिवाजीनें घाईघाईनें आपल्या मित्रमंडळीचा निरोप घेऊन मोठ्या गहिंवरानें संभाजीस त्यांचे पदरांत घातलें आणि तो खानाचे भेटीस आला. नंतर या देशाच्या चालीप्रमाणें उभयतांनीं हात पुढें करून एकमेकांस आलिंगन दिलें. इतक्यांत असें झालें कीं, अफझुलखान हा शरीरानें सदृढ असल्यामुळें त्यानें एका हातानें शिवाजीस गच्च धरून पूर्वसंकेतानुरूप शस्त्रप्रहार करण्याचा प्रयत्न चालविला, परंतु शिवाजी किती वस्ताद ! खानास वाटलें असेल कीं काय तो मीच ! त्यानें सावधगिरी करून चिलखत घातलें होतें यामुळें या प्रसंगीं त्याचा जीव बचावला. त्यानें लागलीच अफझुलखानाची मिठी सोडविली व त्याच्या पोटांत वाघनखें खुपसून, तरवारीनें त्याचा छेद केला.

खान साहेबांची ही दशा पाहून त्यांचा कारकून पुढें सरसावला, परंतु शिवाजीनें धार्मिकपणाचें विलक्षण सोंग घेऊन 'तूं



ब्राह्मण आहेस या करितां ब्रह्महत्येचें पातक माझे हातून घडणें नाहीं ' असें सांगून त्याच्या वीरश्रीस जागचे जागींच बसविलें. तेव्हां असा सर्वोपरी मोड झालेला पाहतांच खान साहेबांचें सैन्य धांवून आलें. पण अखेरीस त्यांचीही तीच स्थिति होऊन राहिलेले लोकांस पळतां पळतां मारामार पडली. तरी पण शिवाजीनें त्यांस सोडिलें नाहीं. त्यानें त्यांचे मागोमाग लागून सर्वांस पकडून आणलें व त्यांची भीति नाहींशी करून त्यांस आपले सैन्यांत नोकरीस ठेविलें. यामुळें तर या अफझुलखानाचे मोहिमेचा असा शेवट झाला कीं, त्याचें सैन्यापैकीं प्रथमच निसटून गेलेल्या एका ब्राम्हणाशिवाय विजापुरीं ही खबर नेण्यास कोणी शिलक राहिलें नाहीं. व शिवाजीसही अनायासेंच त्यांची सर्व युद्धसामुग्री सांपडली.

यानंतर चौथे दिवशीं जासुदाकरवीं हें वर्तमान विजापुरीं जातांच अली आदिलशाह व बडीसायबीण यांनीं फारच शोक केला. पादशहजादीनें तर तीन दिवस अन्न घेतलें नाहीं. तसेंच मोठमोठे वजीर व सर्व लष्कर हवालदील होऊन गेलें; आणि खुदानें मुसलमानांची पातशाही मराठ्यांस दिली असें वाटतें असें सर्व ह्मणूं लागले.

नंतर पुढें थोड्याच दिवसांनीं ह्मणजे इ० स० १६६० या वर्षी अफझुलखानाचा मुलगा फजल महंमद हा, आपल्या बापाचा घात केल्याबद्दल सूड उगविण्याकरितां शिवाजीवर चालून गेला, परंतु त्याला मुठींत नाक धेऊन परत यावें लागलें. यामुळें अली आदिलशाह यास फार त्वेष येऊन त्याचेच पुढील वर्षी शिवाजीचे पारिपत्याकरितां स्वतः स्वारी निघाली. तिचाही परिणाम याप्रमाणेंच झाल्याकारणानें, अगदीं निराश होऊन मुख्य वजीर इब्राहीमखान यास बरोबर घेऊन इ० स० १६६२ त

बडी साथबीण मक्केस चालती झाली. यापूर्वी बडी सायबीण हीच राज्याची अंतर्गत सर्व व्यवस्था पहात असे.

यानंतर मात्र विजापुरकरांनीं अगदीं हात टेंकले. परंतु त्यास स्वस्थ बसूं देतो कोण? औरंगजेबास ह्या वेळीं कसें स्फुरण चढलें होतें! त्यानें इ० स० १६६५ या वर्षी जयसिंग नामक सरदाराबरोबर मोठें सैन्य देऊन विजापुरावर पाठविलें. व मदतीकरितां, पूर्वी कबूल केलें असल्यामुळें, शिवाजीसही पत्र पाठविलें. तेव्हां अर्थात् हीं दोन्हीं सैन्यें एकत्र झाल्यावर (तरी शिवाजीनें १००० स्वार व ८००० पायदळच बरोबर घेतलें होतें) विजापुरकरांची दुःस्थिति काय विचारावयाची आहे? मंगळवेढें येथें उभयपक्षांची गांठ पडून मोठेंच तुंबळ युद्ध झालें. ह्या युद्धांत शिवाजीनें तर आपला विलक्षण पराक्रम दाखवून उभय पक्षांकडून आपणास 'शाबास शाबास!' म्हणवून घेतलें. विजापूरकरांकडील मराठे सरदार यांनींही आपल्या शूरत्वाचे कामीं कांहीं कमी पडूं दिलें नाहीं, पण शिवाजीचे युक्तीपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

पुढें सतत एक वर्षपर्यंत जयसिंग हा विजापूरच्या आसपास होताच. परंतु मग मात्र अन्नपाण्यामुळें त्याच्या सैन्याचे फार हाल होऊं लागले म्हणून त्यास दिल्लीचा मार्गच सुधारावा लागला. तथापि तो गेला म्हणून झालें नाहीं; मोंगल सैन्याचीं पेवेंच्या पेवें येऊन विजापूरच्या राज्यांत उतरत होतीं, व ह्यामुळें शेवटीं त्यांच्या जाचापासून मुक्त होण्याकरितां अली आदिलशाह यानें त्यांच्याशीं आग्रा येथें तह केला. त्या तहांत सालिना १, ८०, ००० होन मोंगलास विजापूरकरांनीं द्यावे असें ठरलें

शिवाजीनें आपला नाश करण्याचे कामीं मोंगलांस मदत



केली हें पाहून अलीआदिलशहाची तळपायाची आग मस्तकास गेली होती. म्हणून त्यानें हा तह झाल्यानंतर विजापुरीं येऊन आपला पराक्रमी सरदार जवंदरखान यास इ० स० १६७३ सालीं पन्हाळा काबीज करण्याकरितां पाठविलें पण तेथें त्याची मुळींच डाळ न शिजल्यामुळें त्यास परत यावें लागलें. तेव्हां जवंदरखानानें शिवाजीपासून लांच घेतल्याचा त्यावर दोष ठेवून अली आदिलशाह यानें एकदम त्यास तोफेच्या तोंडीं दिलें आणि आपण स्वतः पन्हाळा घेण्याकरितां निघाला. परंतु, पन्हाळा तर हातीं लागला[1] नाहींच, मात्र निरुपायास्तव उलट तीन लक्ष रुपये सालिना देत जाऊं असा शिवाजीशीं मोठ्या संकटानें गुप्त तह करावा लागला.

यानंतर मात्र विजापूरचें राज्य अगदीं टेंकीस आलें. लढा-

---

१ "सन १६७३—पन्हाळा किल्ला ह्याउपर शिवाजीपासून विजापूरकरांचे हातीं लागला नाहीं. त्यांनीं तो परत घेण्याकरितां पुढें केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. एका जुन्या दफ्तरांत ह्या पन्हाळे प्रकरणास उद्देशून शिवाजीवर केलेली कविता सांपडली आहे ती येणेंप्रमाणें:--

## पराक्रम—किल्ले पन्हाळा.

होतों पन्हाळ्यावरि मी शिवाजी। चक्रावतीची डरडार भाजी।
आतां पुढें कोण धजेल पाहों। मी भोंसला कां डगलाचि राहों॥ १॥
फौजेंत मालमूकंद गजेंद चाले। शोभे निशाण भगवें गज फार डोले॥
दैत्येंद्र कां राजगडास येना। मी आपुला पर्वत त्यासि देना॥ २॥
भावें भजावें मज मोंगलांनीं। भविष्य सांगे तुळजा भवानी॥
समुद्र याचें जळ मोजवेना। मध्यान्हिचा भास्कर पाहवेना॥
मुष्टींत वैश्वानर बांधवेना। ऐसा शिवाजी नृप जिंकवेना॥ ३॥

(शिवछत्रपतीचें चरित्र पृष्ट ६२.)

ईचे प्रसंग वरचेवर आल्यामुळें खजिन्यांतील द्रव्य कमी झालें व जमिनीचा साराही वेळच्या वेळीं येईना यामुळें शिपाई वगैरे लोकांच्या पगाराची बाकी वाढत चालली; व हळूहळू दरबारांतील लोकही नाकें मुरडूं लागले. यामुळें अली आदिलशाह जरी शूर होता, तथापि त्याचें काळीज फाटून जाऊन याच वर्षी ह्मणजे इ० स० १६७३ त त्यानें बिछाना धरिला, व तेव्हांपासून तो परलोक यात्रेचीच तयारी करण्यास लागला.

ह्या बादशाहास शिकंदर ह्मणून एक चार वर्षांचा पुत्र व शहरबानो नांवाची एक अकराबारा वर्षांची कन्या अशीं दोनच अपत्यें होतीं. मरणकाळीं ह्यानें अबदुल करीम, खोवासखान, अबदुल महंमद, बहिलोलखान व मुझफरखान ह्यांस गादीचे पंच नेमून ह्या दोन्ही लेंकरांस त्यांचे पदरांत घातलें, व ह्यांचा सर्व प्रकारें सांभाळ करणें तुमचेकडे आहे असें सांगून प्राण सोडिला.

हा बादशाहा शूर होता, तथापि एवढा अवजड राज्यशकट चालविण्याची याचे अंगीं धूर्तता नव्हती. ह्यानें इ० स० १६६३ या वर्षी आपला घुमेज बांधण्यास प्रारंभ केला होता, परंतु त्याचें काम पुरें झालें नाहीं. हा किल्ल्याचे बाहेर उत्तरेस असून त्यास अलीरोझा असें ह्मणतात व त्यांतच हल्लीं त्यांची कबर आहे. ह्या

१ हल्लीं 'बुक आफ् बांबे' म्हणून जें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें पुस्तक आहे, त्यांत ही कबर व हा दर्गाही इब्राहीम आदिलशाह पहिला याचीं आहेत असें त्याच्या कर्त्यांचें ह्मणणें आहे:—

There ( Bijapur ) is a great mausleum half finished that was to have surpassed the Dome now surpasses the dome of mohomed as much as that Dome now sur-

( पुढें चालू. )



अपुर्त्या कामाचाच भव्य व नाजूकपणा पाहून कोणासही सभा-

( मागील पृष्ठावरून )

passes all other buildings. But, when the first stone was raised its author and intended occupant *Ibrahim Adilsha* 1 was cut off by assassination. The workmen threw away his tools and the coolies his last basketful of earth into the ditch and now there remains something like the ruins of Melrose Abbey, with this difference, that the rest on which the arch is built, stone and not wood as in our modern times, remain inside the arch.

( Book of Bombay by James Douglas " Tombs " )

"विजापूर येथें हल्लीं जें एक अपुर्तें असलेलें मोठें कबरस्थान दृष्टीस पडतें त्याचें काम इतकें कांहीं सुरेख आहे कीं, त्याच्या तेवढ्याच अपुर्त्या असलेल्या कामावरून, सुलतान महंमद आदिलशाह ह्यानें बांधिलेली बोळघुमज म्हणून जी इमारत आज विजापुरांतील सर्व इमारतींस मागें टाकीत आहे तिलाही ह्यानें खचीत मागें टाकिलें असतें असें वाटतें. परंतु ह्या इमारतीचें वरील काम बांधण्याकरितां पहिलाच दगड वर उचलतात तोंच तिचा जनक व तिच्यांत वास्तव्य करूं इच्छिणारा ' जो इब्राहीम आदिलशाह पहिला ' हा यमसदनीं गेल्याचें ऐकून कारागीर लोकांचीं हत्यारें गळून पडलीं व त्यावर काम करणाऱ्या मजूर लोकांनीं आपल्या हातांतील मालमसाल्याचीं टोपलीं खालीं टाकून दिलीं. यामुळें पुढें हें काम तसेंच अपुर्तें राहून हल्लीं त्याकडे पाहिलें असतां मेलबोर्नआबे येथील पडापड झालेल्या इमारतींची आठवण होते. मात्र या कबरस्थानास ज्या कमानी आहेत त्यांस वळण देतांना आंतल्या बाजूस लांकडाचा उपयोग केलेला नसून त्यांच्या दगडांच एकदम तसें वळण दिलेलें आहे." ( जेम्स डगलासकृत बुक आफ बांबे यांतील थडग्यांचें वर्णन ).

( पुढें चालू. )

बाग झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या घुमजाशिवाय इ० स० १६५९ ह्या वर्षी अलीमहाल व १६६२ त किल्ल्यांतील आरसे महाल हे ह्या बादशहानेंच बांधिले. आणि १६६२ या वर्षी त्यानें शहरांतील शाहापेठ वसविली.

---

## सुलतान शिकंदर आदिलशाह.

### इ० स० १६७३-१६८६.

### ( विजापूर बादशाहीचा शेवट. )

जातमेवान्तकोन्ताय जराचान्वेति देहिनम् ॥
अनुषक्ता द्वयनैते भावाःस्थावरजंगमाः ॥

असें भगवद्वचनच आहे, कीं–वस्तु निर्माण मात्र झाली पुरे कीं

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

परंतु साहेबमजकुरांस विजापुरांतील कोणी बिनमाहितगारानें ही केवळ थाप मारलेली असावी असें आमच्या माहितीवरून व खालील विरोधावरून दिसून येतें.

Beautifully carved tracery is also to be seen in the great Durga and Cloister surrounding the grave of *Ibrahim Adilshaw* 1, king of Bijapur, at *Gogi* in the *Surapur Taluka*. ( Geological survey of India Vol. XII Page 266. )

"सुरापूर तालुक्यांत 'गोगी' येथील जंगी कबरस्थानांत जी 'इब्राहीम आदिलशाह पहिला' याची कबर आहे तिचें सर्व काम फार सुंदर आहे." ( जिऑलॉजिकल सर्वे आफ् इंडिआ भाग १२ पान २६६. )

१ याची सत्यता आम्हीं बुक आफ् बांबेचा जो मागील पानांत उतारा दिला आहे त्यावरून कळून येणार आहे.

२ हा शाहापेठेंत असून हल्लीं यास 'याकुबखानाचा महाल' असें म्हणतात.



तिच्याच मागोमाग जरा व नाश हीं उभीं असतात. जगांतील एकंदर स्थावर जंगम पदार्थांपैकीं कोणीही ह्मणजे त्यांच्या तडाक्यांतून सुटलेला आहे असें नाहीं; सर्व स्थावर जंगम पदार्थ त्यांजकडून बांधलेले आहेत. त्या अर्थी आमची विजापूरबादशाही ह्या नियमांतून कशी सुटेल? तिजकडूनही ह्या भगवद्वचनास ह्या बादशाहाच्या कारकीर्दीतच मान मिळावयाचा होता. कारण जन्म, स्थिति आणि लय यांपैकीं पहिल्या दोहोंचीं कार्यें शेवटास जाऊन तिसऱ्यानेंही मागील बादशाहाचे कारकीर्दीपासूनच आपला बहुतेक अंमल बसविला होता; तेव्हां त्याचें पर्यवसान होण्याची अर्थात् ही जागाच आहे.

सुलतान अली आदिलशाहाचे कारकीर्दीच्या शेवटीं राज्याची कशी स्थिति झाली होती हें त्या वेळीं दर्शविलेंच आहे. परंतु त्याचे मागें तशा स्थितींतही आतां शिकंदर हें चार वर्षांचें पोर सांपडल्यामुळें तर अनायासेंच त्या स्थितीचें प्राबल्य होत चाललें. राज्यांत सर्वत्र कलह माजले व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहींसा झाला; जे महान् पराक्रमीही पूर्वी राजास भिऊन त्याच्या ओंजळीनें पाणी पीत होते ते ह्या वेळीं राज्यकारभारांत ढवळाढवळ करून आपल्या धन्यास उलट गोष्टी सांगूं लागले; यामुळें राज्यांत परक्यांचा पाय शिरून त्यांचा व्यापारही चालूं लागला. तेव्हां अर्थात् अशा वेळीं शिवाजीनें तरी स्थीर कां असावें? त्याच्याही घशाचें भोंक मोठें होत चाललें.

अशी ही दुर्दिन स्थिति पाहून खोवासखान नामक राजपुत्राच्या मुख्य पालकानें थोडासा शहाणपणा करण्याचा विचार केला होता. त्यानें मोंगल लोकांशीं गुप्त बोलणें चालविलें होतें कीं, दिल्लीच्या सार्वभौम बादशाही अंमलाखालीं हें राज्य घेऊन

राजकन्यां शहरबानो ही आपलें मुलास करावी. परंतु त्याचा हा घाटत असलेला विचार अबदुल करीमप्रभृति चौकडीस कळतांच त्यांस हें न रुचून त्यांनीं खोवासखानाची आपल्या कुंडांत आहुती घेतली. तेव्हां अर्थात् औरंगजेबाशीं घाटत असलेले विचार जागच्या जागीं राहिले, आणि औरंगजेबाच्या जिभेस रुचि दाखवून ठेविल्यामुळें इ० स० १६७९ या वर्षीं त्यानें आपला दिल्लीरखान नामें सरदार दक्षिणेंत पाठविला.

दिल्लीरखान दक्षिणेंत येऊन दाखल होतांच त्यानें एकदम विजापुरावर चाल करून शहरास वेढा दिला, आणि राजकन्या शहरबानो हीस जर मुकाट्यानें आमचे स्वाधीन कराल व शिवाजीशीं पत्रव्यवहार ठेवणार नाहीं तर वेढा उठवितों असें राजपालकांशीं त्यानें बोलणें लाविलें. परंतु त्यांतील पहिलें कलम अत्यंत दुर्घट होतें. कारण राजकन्या शहरबानो ही फारच सुंदर असून तशीच सद्गुणी व सर्व कलेंतहीं निपुण होती. यामुळें अबदुल करीमप्रभृति पालकांचा व एकंदर शहरवासी जनांचा सर्व जीव तिच्यावर होता. ह्मणून ‘ आह्मी आपल्या जिवाची आहुति देऊं परंतु या राजकन्येस तुमचे स्वाधीन होऊं देणार नाहीं’ असें त्यांनीं निखालस त्यास सांगून पाठविलें.

हा हट्टाचा निरोप ऐकून दिल्लीरखानाचें पित्त खवळून गेलें; पण करतो काय ? शहर व किल्ला हस्तगत झाल्याशिवाय राजकन्या हातीं लागणें कठीण ! यामुळें त्यास तसाच वेढा घालून बसणें भाग पडलें. परंतु सुदैवानें ही त्याची काळजी लवकरच दूर झाली. पादशाहाजादी ही फार दूरदृष्टीची होती. तिनें आपल्या एकट्याकरितां सर्व राज्याचा व आपल्या प्रिय बंधूचा नाश होणार असें पाहिलें, आणि एकेदिवशीं एकटीच पुरुषाचा वेष घेऊन ती दिल्लीरखानाच्या तळावर गेली. तेव्हां अर्थात् हें स्त्रीरत्न घरीं चालत आल्यावर दिल्लीरखानानें त्याचा बहुमान केला व



लागलींच योग्य इतमामासह अवरंगाबादेस त्याची रवानगी करून दिली. तथापि एवढ्यानें दिल्लीरखानाचें समाधान झालें नाहीं. त्यानें कृतघ्नपणें इकडे वेढा तसाच राहूं दिला.

दुसरे दिवशीं हें वर्तमान जनानखान्यांत व शहरांत समजतांच सर्वत्र शोकाचे पर्वत ढासळले. नंतर मसाऊदखान नामक एका वजिरानें एकंदर कच्च्या हकीकतीचें शिवाजीस पत्र लिहिलें. तें पाहून शिवाजी फार कष्टी झाला, व ज्याच्या बळावर मी इतका वाढलों त्यांनीं आज आपणास असें लिहिलें आहे त्याअर्थीं त्यांस आपण मुक्त करणें हें आपलें कर्तव्य आहे असें जाणून त्याच पावलीं (रात्रीचे दहा वाजून गेले होते तरी) दोन हजार घोडेस्वार घेऊन तो शूर शिपाई पन्हाळ्यावरून उतरला; व लवकरच विजापूरच्या आसपास सुमारें २४ कोसांच्या टप्प्यावर येऊन थडकला. तेथून दिल्लीरखानाच्या सैन्याची चौकशी करितां, त्यापाशीं रोहिले, अरब वगैरे पुष्कळ सैन्य आहे असें समजल्यावर त्यानें आपल्या छोट्या टोळीनिशीं त्यांशीं सामना करण्याचें रहित करून आपली कावेबाजी विद्या आरंभिली. त्यानें प्रथम मोंगलांचे मुलखांत शिरून इकडून तिकडून गोंधळ घातला आणि नंतर अशा हुलकावण्या देतां देतां औरंगाबादेवर मोर्चा फिरविला. तेथें औरंगजेबाचा मुलगा मोअज्जीम हा होता, परंतु त्याचें शिवाजीपुढें कांहीं चाललें नाहीं. शिवाजीनें खुशाल तीन दिवस शहर लुटून पिरांचीं स्थानें व हिंदु देवालयें ह्यांवांचून कांहींएक राहूं दिलें नाहीं.

---

१ असें सांगतात कीं, पिरांचीं स्थानें, हिंदु देवालयें व स्त्रिया यांस शिवाजी कधींही बोट लावीत नसे. स्त्रियांच्या संबंधानें तर त्यास इतका अभिमान होता कीं, त्यांच्यावर कोणी शस्त्र उचलिलें असतां त्यांचेकरितां तो वेळेनुसार आपला प्राणही खर्ची घाली. कल्याणचे लढाईंत अशीच एक निराश्रित व सुंदर यवनी त्यास सांपडली असतां तिला त्यानें तिच्या भ्रताराकडे पाठविली होती.

शिवाजी इकडे अशा या गडबडींत आहे, इतक्यांत मसाऊदखानाचें त्यास दुसरें पत्र येऊन पोंचलें कीं, 'होईल तितकी त्वरा करून आमचें संरक्षण करावें'. यामुळें आणखी विशेष धामधूम न करितां त्यास तेथून परत निघावें लागलें. परंतु परत येतांना मार्गांतच आपला पुत्र संभाजी हा दिलीरखानास येऊन मिळाल्याची दुष्ट खबर त्यास समजल्यावरून त्याचे हातपाय गळाले आणि तो त्याच पावलीं पन्हाळ्याकडे वळला. तथापि मसाऊदखानाचे मदतीकरितां लागलींच तेथून त्यानें आपला शूर सरदार हंबीरराव मोहिता याजबरोबर मोठी फौज देऊन पाठविलें.

हंबीररावाची फौज दाखल होतांच तिनें प्रथमतः भोंवतालचा बहुतेक मुलुख उजाड करून टाकिला. यामुळें दिलीरखानाचे सैन्यास दाणावैरणीची फार पंचाईत पडूं लागून त्यास तेथून मुकाट्यानें दातीं तृण धरून पळ काढावा लागला. तेव्हां अर्थात् लवकरच जिकडे तिकडे स्वस्थता झाली व ह्या सर्व मदतीबद्दल विजापूरकरांनीं कोपाल व बल्लारी यांच्या दरम्यानचा मुलुखही शिवाजीस दिला. इतकें सगळें झालें तरी जिच्याकरितां एवढा कलह माजला होता ती पादशाहजादी आपल्या देशास, भावास, आणि आपल्या थोर अंतःकरणास अंतरली ती अंतरलीच! मोगलांनीं तिला दिल्लीचा मार्ग दाखविलाच होता, परंतु पुढें लवकरच त्यांनीं औरंगजेबाचा दुसरा मुलगा अजीम ह्याशीं तिचें मोठ्या कडाक्यानें लग्न लावून घेतलें.

ह्या सर्व घडामोडी नंतर विजापूरकरांस बहुधा भीति राहिली नव्हती. तथापि कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच इ० स० १६८० त त्यांच्या दुर्दैवानें शिवाजीस मृत्यूनें गांठिलें. ह्यामुळें औरंगजेबास अनायासेंच शिवाजीची दहशत नाहींशी होऊन त्यानें



आपलें पूर्वस्वरूप विजापूरकरांस दाखविण्याचा आरंभ केला. व पुढें लवकरच म्हणजे इ० स० १६८५ ह्या वर्षीं त्यानें आपला पुत्र अजीम ह्यास मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणेंत पाठविलें.

अजीमशाह दक्षिणेंत आल्याबरोबर त्यानें एकदम विजापूरशहरास वेढा दिला, व त्याचे मागोमाग मजलदरमजल करीत औरंगजेबही दक्षिणेंत येऊन उतरला. परंतु ह्या वर्षी विजापूरचे राज्यांत पाऊस फार कमी पडल्यामुळें धान्याची टंचाई उडाली होती, आणि अजीमशाहाची धाड लवकरच येणार हें समजण्यापूर्वींच विजापूरकरांनीं सर्व धान्य किल्ल्यांत नेऊन सांठविलें होतें, या दोन्ही कारणांनीं अजीमशाहाचे सैन्यांत धान्याची कमताई पडूं लागली व वेढा काढून घ्यावा लागतो कीं काय अशी त्यास पंचाईत पडली. यामुळें अशाच स्थितींत जर तो कांहीं वेळ असता तर विजापूरकरांनीं तेव्हांच मोंगल सैन्यास धुडकावून लावण्याचा रंग आणला होता. परंतु अशा संधीस अजीमशाहाची पट्टराणी जानीबेगम हिनें हौद्यांत बसून "वीरहो, पाय मागें काढूं नका! मीही तुमच्याबरोबर लढण्यास उद्युक्त झालें आहें! मग तुह्मीं तर पुरुषच आहां! लढा, मरा किंवा मारा! पण दिल्लीच्या सार्वभौम राजास काळोखी आणूं नका!!" अशा प्रकारचें प्रोत्साहनप्रेरित भाषण करून सर्वांस धीर आणला व लवकरच औरंगजेबाकडून गाजीउद्दीन नामक सरदाराबरोबर अहंमदनगराहून २०,००० दाण्याचे बैल येऊन पोंचले, यामुळें मोगल सैन्य बचावलें. नंतर औरंगजेबही सोलापुराहून लागलाच विजापुरास येऊन दाखल झाला ह्यामुळें तर त्यास चांगलाच धीर आला.

एवढें मोठें सैन्य एकत्र झालें तरी कांहीं दिवसपर्यंत औरंगजेबासही स्वस्थ वेढा घालूनच बसावें लागलें. कारण विजापूर

शहरचा तट म्हणजे हलका सलका नव्हता; त्याचा घेर ९ मैल असून अतिशय रुंद होता, ह्यामुळें शहरांत शिरकाव होण्यास त्यास मार्ग नव्हता. परंतु पुढें लवकरच त्याच्या सुदैवानें शहरांत शिरकाव होण्यास व आपले पुढील हेतु साधण्यास त्यास बिलकुल खटपट करावी लागली नाहीं. कारण अजीमशाहाची धाड येण्यापूर्वी विजापूरकरांनीं जो किल्ल्यांत धान्यांचा सांठा करून ठेविला होता तो संपल्यामुळें व बाहेरून पुरवठा होण्यास मार्ग नसल्यामुळें त्यांचे सैन्यांतील शिपाई वगैरे लोक अन्नान्न करून पटापट मरूं लागले. यामुळें आतां आपला निभाव लागणें कठीण असें समजून राजपुत्र शिकंदर हा स्वतः औरंगजेबाच्या तळावर जाऊन आपल्या सर्वस्वासुद्धां त्याच्या स्वाधीन झाला!! ही वेळ तारीख ४ माहे जिल्काद सन हिजरी १०९७ रोजीं दिवसां १० घटकेची होती.

शिकंदर स्वाधीन होतांच औरंगजेबाचे लोक दीन दीन करीत शहरांत शिरले. त्यावेळीं जी स्थिति झाली असेल तिची कल्पना वाचकांनींच करावी. कारण ती स्थिति जरी कोणी प्रत्यक्ष अनुभविली नाहीं, तरी आदिलशाहीच्या ऐन भरभराटीची स्थिति येथपर्यंत जी आम्ही थोडथोडी वर्णिली आहे तिच्याशीं हिचें साम्य घालतांना व दुःख दर्शवितांना आमची लेखणी दम धरणार नाहीं.

आदिलशाही ज्यावेळीं ऐन भरभराटींत होती त्यावेळीं एकादे सणावाराचे दिवशीं बादशाहाची स्वारी शहरांत निघाली असतां सर्व शहर कसें इंद्रभुवनाप्रमाणें शृंगारिलेलें दिसे. जागजागीं गुड्या उभारलेल्या व तोरणें बांधिलेलीं असत. शहरांतील सर्व

१ म्हणजे तारीख १५ माहे आक्टोबर सन १६८६. [ग्रांट डफचा इतिहास भाग १ ला पान २४५.]



मार्गांवर चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत व त्यांजवर चित्रविचित्र रांगोळ्या काढिलेल्या असत. शहरभर चिराकदान करीत व नगरवासी स्त्रिया उत्तम वस्त्रालंकार लेवून पंचारती घेऊन आपआपल्या वाड्याच्या दुमजल्या तिमजल्यावर उभ्या असत व स्वारीचा थाट व शोभा डोळे भरून पाहण्याकरितां मार्गावर सर्व आबालवृद्ध प्रजा लोटली असे. बादशाहाची स्वारी ज्या ज्या मार्गावरून जाई त्या त्या मार्गावर नागरिक लोक जयजयकारप्रदर्शक सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत, त्यानेंच सर्व रस्ता भरून जात असे. नंतर बादशाहाची स्वारी आर किल्ल्यांत परत शिरतांच सलामीच्या तोफांच्या आवाजानें सर्व शहर दणाणून जाई. परंतु हल्लीं त्याच आदिलशाही राजधानींत सर्व शहरभर मोगल सैन्य पसरलेलें असून तिचा स्वामी जो बादशाह शिकंदर आदिलशाह तो कोठें दृष्टीस पडेना! यामुळें ज्या राजधानींत पूर्वी मोठ्या आनंदानें उत्सव व्हावयाचा तेथें सर्वत्र आक्रोश व हाहाःकार यांनीं ग्रस्त करून सोडलें होतें. ज्या रस्त्यांवर पूर्वी चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत असत तेथें रक्ताचा सडा पडला होता, व जागोजाग योद्ध्यांचीं छिन्नविच्छिन्न झालेलीं शिरें पडलेलीं असून त्यांवरून औरंगजेबाचा असंख्य सैन्यभार पर्वा न करितां तुडवीत चालला होता. औरंगजेबाचे लोकांनीं क्रोधानें शहरांतील मोठमोठे वाडे जमीनदोस्त करून टाकले व मन मानेल तीं अनन्वित कृत्यें केलीं!!

यानंतर औरंगजेब एक वर्षपर्यंत शहराबाहेर खुशाल आनंदमग्न राहून आदिलशाही घराण्याचा खजिना व असंख्य मौल्यवान् व उंची जवाहीर यांचीं उंटांच्या उंटें भरून घेऊन दिल्लीस चालता झाला. हें असें करण्याचें त्याचे मनांत नव्हतें पण ह्या वेळीं (१६८९) सालीं पटकीचा आजार सुरू होऊन एक लक्ष लोक मृत्यूच्या तोंडीं पडले. ह्या भीतीनें त्यानें शहर सोडलें.

इकडे शिकंदर हा औरंगजेबाचे स्वाधीन झाल्यापासून त्यानें त्यास औरंगाबाद येथें कैदेंत ठेविलें होतें, व तेथें तो पुढें चौदा[1] वर्षें कैदेंत होता. नंतर इ०स० १७०० ह्यावर्षी औरंगजेबानें खरबुजांतून विष पाठविलें व तुझी काय इच्छा आहे ह्मणून त्यास विचारिलें. तेव्हां ह्यांतील हेतु त्याच्या डोळ्यांपुढें उभा राहून, त्यानें 'माझें शव, विजापूर येथें पालेबाजारांत माझा गुरु शहानशी मुल्ला याची कबर आहे त्याचे पायापाशीं गाडावें[2]' असें सांगून तें खरबुज खाऊन प्राण सोडला ! !

हाय हाय ! ज्या पराक्रमी पुरुषानें आदिलशाहीचें तक्त स्थापिलें त्याच्या तक्ताचा व विशेषतः वंशवृक्षाचा अशा प्रकारें शेवट व्हावा काय? ज्या शिकंदरास मी राज्याचे गाडे हांकीन, आपल्या पूर्वजांप्रमाणें तक्ताचा उपभोग घेईन, आपलें आयुष्य मोठ्या चैनींत घालवीन, असें करीन—तसें करीन वगैरे आशा

---

१ शिकंदर हा औरंगाबाद येथें फक्त तीन वर्षें कैदेंत होता असें ग्रांट डफ साहेब आपल्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या २४५ व्या पृष्ठांत म्हणतात.

The young Prince Sikander Adilsha was kept a close prisoner in the Moghul Camp for *three years*. when he died suddenly not without suspicion of having been poisened by Aurungzeb." ( History of Hindustan by Grant Duff Vol. 1 Page 245. )

परंतु हें त्यांचें लिहिणें केवळ चुकीचें आहे असें आम्हांस दोन तीन फारशी ग्रंथांवरून जी माहिती मिळाली आहे त्यावरून दिसून येतें.

२ ह्यानें सांगितल्याप्रमाणे ह्याचें शव पालेबाजारांत गुरूच्या पायापाशीं गाडिलें आहे, परंतु ती कबर केवळ साधारण मनुष्याच्या कबरेप्रमाणें दिसते.



होती त्याच हतभाग्याला भर आठरावींचे सुमारास कारागृहवास भोगावा लागला ! व शेवटीं दुसऱ्याच्या आज्ञेनें स्वहस्तें विष खाऊन मरावें लागलें ! !

असो. अशाप्रकारें शिकंदर हा औरंगजेबाचे स्वाधीन झाल्या दिवसापासून आदिलशाहीचा सूर्य मावळला तो मावळलाच ! व विजापूर या नांवाचा एवढा दरारा, एवढी थोरवी, एवढा लौकिक होता तेंच विजापूर तेव्हां पासून हा काळपर्यंत सांधीस पडून भयाण व उदास बनून राहिलें आहे ! !

# विजापूरवर्णन.

भाग २ रा.

इमारती वगैरे.

प्रकरण १ लें.

## आर किल्ला व त्यांतील इमारती वगैरे.

हा आदिलशाही किल्ला शहराच्या मध्यभागीं आहे. तटाच्या आंत १६०० एकर जमीन गुंतली आहे. हा युसफ आदिलशाह यानें इ० स० १५०८ या वर्षी केवळ मातीचे ढिगारे घालून ओबडधोबड बांधिला होता. नंतर इब्राहीम आदिलशाह (पहिला) यानें याचे बाहेरून दुहेरी तट व खंदक चांगल्या तासलेल्या दगडांनीं बांधून काढिला. सांप्रत सरकारानें हा तट व खंदक बहुतेक भुईसपाट करून टाकिला आहे. मात्र पश्चिमेकडील व दक्षिणेकडील थोडा भाग व पूर्वेकडील बराच भाग अद्यापि अवशिष्ट आहे. ह्या खंदकाच्या काठीं नारसिंहाचें जाज्वल्य स्थान फार पुरातनचें आहे, त्याचें वर्णन पुढें एका स्वतंत्र लेखांत दिलेंच आहे. ह्या खंदकांतून शहराबाहेरील खंदकांत पाणी जाण्यास जागजागीं चोर नळ केले आहेत. पूर्वी लढाईच्या प्रसंगीं शत्रूस पाण्याचा तोटा पाडण्याच्या हेतूनें खंदकांतील पाणी ह्या चोरनळांनीं नाहींसें करीत असत, व ह्याप्रमाणें औरंगजेबानें विजापुरावर स्वारी केली त्यावेळीं केलें होतें असें सांगतात.

---

१ अर्क (सूर्य) ह्या शब्दाचा अपभ्रंश झाला असावा.



ह्या किल्ल्यास आंत जाण्याकरितां पूर्वी कोणकोणत्या वेशी होत्या हें सांप्रत तट छिन्नविच्छिन्न झाल्यामुळें नीटसें समजत नाहीं; तथापि जुम्मा मशिदीकडून आंत येण्यास लागणारी वेस, आसार महालाच्या पिछवडीस व चिडडी मशिदीखालून जाणारा रस्ता, आणि पश्चिमेस फातमा सुलतान ऊर्फ मलिकेप जहां इच्या मशिदीकडून येणारा रस्ता इतके मात्र सांप्रत दृष्टीस पडतात. शिवाय, किल्ल्यांत असणाऱ्या सर्व इमारतींचीं तोंडें उत्तरेस दिसतात तेव्हां भली भक्कम व सुंदर अशी एक वेस त्या बाजूस असावी असें अनुमान काढितां येतें. हा उत्तरेचा भाग हल्लीं सरकारानें सपाट करून टाकल्यामुळें तेथें पूर्वी खंदक होता कीं बुरूज होते कीं काय होतें याचा मागमूसही राहिला नाहीं.

आतां आपण जुम्मा मशिदीकडून येणारे वेशीनें आंत शिरूं. ही वेस (दरवाजा) तेरा फूट रुंद असून त्याच मानानें उंच असल्यामुळें भव्य दिसते. तिचे माथ्यावर या टोंकापासून त्या टोंकापर्यंत अशी एक जंगी शिला ठेविलेली असून तीवर फार्शीत कांहीं कुराणांतील वाक्यें लिहिलीं आहेत. दरवाज्यांतून आंत गेल्यावर ज्या देवड्या लागतात त्यांच्या खांबांची धर्ती हिंदूंच्या देवालयांतील खांबांप्रमाणें आहे, आणि कित्येक ठिकाणीं तर गणपति रावण वगैरे मूर्तिही खोदलेल्या आहेत. यावरून एखादा हिंदुदेवालयाचा फडशा पाडून हें सामान त्यांनीं उपयोगीं लाविलें असावें असें दिसतें. एवढें कशास? राजपुताना रेलवेनें अबूपर्वतानजीक चंद्रावळ येथील बांधलेला पूल अशाच मूर्तींचा आहे, व कित्येकांची रेलवेकरितां फोडून खडीही केली आहे. मग रावणानें नवग्रह उशाखालीं ठेवून देव बंदींत घातले होते याचें कशाला नवल वाटावयास पाहिजे!

असो. किल्ल्यांत आदिलशाही राजांच्या ज्या कांहीं इमारती सध्यां अवशिष्ट आहेत त्या पुढील प्रमाणें.

चिनी महाल ऊर्फ फरोख महाल—हा सुलतान युसफ आदिलशाहा यानें इ० स० १५११ या वर्षी बांधिला. ह्या महालांत चिनांतील तऱ्हेतऱ्हेच्या वस्तूंचा संग्रह केला होता ह्मणून हें नांव त्यास पडलें आहे. ही इमारत आकारानें फारच मोठी आहे. हिचें काम अगदीं साधें असून मोठमोठ्या शिळांनीं हिच्या भिंती वरपर्यंत बांधीत नेल्या आहेत. हिच्या खालच्या बाजूस जो दिवाणखाना आहे, तो १०० फूट लांब व ३२ फूट रुंद आहे. परंतु एवढ्या दिवाणखान्याचें छत निराधार असूनही पंचमहाभूतादिकांच्या तडाक्यांतून कसें वांचलें याचें आश्चर्य वाटतें. येथेंच आदिलशाही घराण्याचें तक्त होतें. कालानुरोधानें व धर्मानुरोधानें या महालाची स्थिति हल्लीं कांहीं निराळी आहे. पण त्यास उपाय काय?—ह्या महालाच्या पूर्वेस व पश्चिमेस गच्चा असून त्यांवर जाण्यास दक्षिणेच्या बाजूनें सुंदर दगडी जिने आहेत. ह्या महालाच्या सभोंवार मोठें कुसूं आहे व त्याच्या भिंतींत शिपाई वगैरे लोकांस राहण्याकरितां सोईवार खोल्या केल्या आहेत. विजापूर जिल्हा झाल्यावर बहुतेक कचेऱ्या ह्या महालांत ठेवण्याचा सरकारचा विचार आहे व अर्थात् ह्या खोल्यांचा उपयोग रेकार्डकडे होणार!

सात मजली माडी—ही इमारत इ० स० १५८२ या वर्षी इब्राहिम जगद्गुरु या गवई बादशाहानें केवळ हवेच्या शोकाखातर बांधिली होती. हिला सात मजली माडी असें ह्मणतात खरें, परंतु हल्लीं हिचे पांचच मजले अवशिष्ट दिसतात. ह्मणून पाहणारास घोटाळ्यांत पडण्याचा संभव आहे. वरील मजल्यांची पडापडी झाली आहे. ही इमारत साधारण मेहतर महाला एवढी नसून हिचें काम सारें चुनेगची आहे, व त्यावर ठिकाठिकाणीं चित्रविचित्र नकशी रेखिली आहे. प्रत्येक मजल्यावर सुंदर



दगडी कारंजीं आहेत. ह्या माडीवर रात्रीचे अक्करा वाजून गेले ह्मणजे जिकडे तिकडे टपोर चांदणें पडे व वायु मंद वाहूं लागून झाडांचीं पानें स्थिर होत. कारंजांस हजारों तोट्या लावीत असल्यामुळें वसंतऋतुंत वर्षाकाळाचा भास होई. जवळच्या खंदकांतील पाणी मंद वाहत असल्यामुळें त्याचा हळू हळू शब्द होत असे, व खंदकांतील पाण्यांत आकाशाचें प्रतिबिंब पडून खालीं व वर अशा दोन आकाशांचा भास होई. आणि त्यांत ह्या सात मजल्यांवरील दैदीप्यमान दिव्यांच्या प्रकाशानें ही माडी प्रदीप्त झाल्यामुळें हिचें प्रतिबिंब पाण्यांत पडून जलाशयांतील आकाशासही अशीच दुसरी माडी लटकली आहे कीं काय असें वाटे. आणि अशा रमणीय स्थानीं गायनकलेंत निपुण असे इब्राहीम बादशाहा आपल्या सुंदरमहाल नामक पट्टराणीच्या कंठांत हात घालून आनंदनिमग्न झाले असतां सुस्वर आलाप काढीत असत, तेणेंकरून त्या प्रियेचें मन चंचल होऊन तिनें कंठास मिठी मारावी, व बादशाहाचें शरीरही पुलकांकित होत असावें. माडीचे समंतात राहणारे सरदार लोक यद्यपि लढाईवरून थकून भागून आल्यामुळें निद्रावश होण्याच्या बेतास आले असत तरी बादशाहाचे हे कर्णमधुर आलाप गुदगुल्यो करूं लागले ह्मणजे वेड्यासारखें खाशी खाशी करीत त्यांनीं राहावें.—असें सांगतात. पण याचा अनुभव कोणासही नाहीं त्याअर्थी त्या वेळचें वैभव लक्षांत आणून केवळ कल्पनेवर मेळ बसविला पाहिजे.

ह्या माडीवर उत्तरेच्या जिन्यानें जाऊं लागलें असतां, जसजसें वर जावें तसतसा उष्ण वायु अंगास संताप देतो. मजल्यांवरील नकशीदार कारंजीं अगदीं विद्रूप होऊन तीं हल्लीं केवळ स्मशानवत् भासतात. पक्ष्यांनीं जिकडे तिकडे सुंदर कोनाडे आपल्या विष्ठेनें भरून ठेविले आहेत. इमारतीच्या बाजूंच्या

भिंती अगदीं जीर्ण झाल्या आहेत यामुळें एकादी आपणावर कोसळेल कीं काय अशी भीति पोटांत येते. अगदीं वरच्या मजल्यावर गेलें असतां जागोजाग निवडुंग माजल्यामुळें भयानक देखावा दिसतो, व तेथून आसमंतात्भागीं पहावें तों जिकडे तिकडे पडके वाडे व लांबपर्यंत मशिदीच मशिदी यांचाही भयंकर सीन दिसतो.*

आनंद महाल—हा महाल सुलतान इब्राहीम आदिलशाहा ह्यानें इ० स १५९० यावर्षीं बांधिला. ह्या बादशाहास गाण्याचा फार शोक होता व त्याकरितांच त्यानें ही इमारत बांधिली. ही किल्ल्याच्या मध्यभागीं आहे. इच्या उत्तरेस आरसेमहाल व अदालत महाल आणि पश्चिमेस सोनेरी महाल व गगनमहाल याप्रमाणें आहेत. ही इमारत खरोखर पाहण्यालायक आहे, व तीस आनंदमहाल हें नांव यथार्थ शोभतें. हिच्या दर्शनी बाजूस महिरपदार अशा तीन कमानी आहेत. पैकीं मधली फार भव्य दिसते. पूर्वी ह्यांवर चितार्‍यांनीं नानातर्‍हेचीं चित्रें काढिलीं होतीं, पण तीं आतां छिन्नभिन्न झालीं आहेत. ह्या इमारतीस चार मजले आहेत, पैकीं एक मजला जमिनींत तळघराप्रमाणें आहे. वरील मजल्यावर गेलें असतां आरबी भाषेंतील गोष्टी आणि लंडन व पारीस-रहस्य या पुस्तकांतून ज्या राजमंदिरांचें वर्णन केलें आहे, त्यांची आठवण होते. जिकडे पहावें तिकडे चोरवाटा, भिंतींतून ठिकठिकाणीं कोनाडे, महि-

* असें सांगतात कीं, हिच्या तळमजल्यावरील भिंतीवर सुलतान महंमद व त्याची रंभावती नामक राख या आशकमाशुकांची तसबीर काढली होती ती नुकत्या गेलेल्या दुष्काळापर्यंत होती. परंतु दुष्काळांत येथें अन्नसत्र वसलें होतें त्यावेळीं धुरानें हीं नष्ट झाली.



रपदार खोल्या, त्यांचे ढंगणें पण सुबकसे दरवाजे, लहान लहान चोर खोल्या, ज्यांतून एकच मनुष्यास बाहेर निघतां येईल अशा तर्‍हेचे निरनिराळ्या ठिकाणीं उतरण्यास मजेदार व खांबास गुंडाळित गेलेले मार्ग. कोठें चुनेगची खोल्यांतून पलंग ठेवण्यास सुंदर चौथरे; कोठें बहिर्दिशेस, कोठें लघुशंकेस, जाण्याकरितां सोईवार व योग्य ठिकाणीं खोल्या, कोठें उंच सखल जागा, कोठें महिपरदार खिडक्या—त्यांतून पाहिलें असतां दूरवर नजर पोंचावी.—कोठें भिंतींत लोडासारख्या जागा, असें एक कीं काय काय, ह्मणून लिहावें! आलेल्या मार्गानें परत जावें ह्मटलें तर तो मार्ग न मिळतां मनुष्य भलतीकडेसच जातो. एखाद्या खोलींत एक अगडबंब आडवी भिंतच हजर करून पुढें उभी राहिलेली असते! दुसर्‍या खोलीच्या दरवाजांतून पहावें तों ऐसपैस दिवाणखाना दिसतो! याप्रमाणें चालणारांची जी कांहीं त्रेधा उडून जाते व जो कांहीं ब्रह्मघोटाळा होऊन जातो तो कांहीं पुसूंच नये. ह्या इमारतीचें छत लांकडी नसून निवळ चुन्याचें आहे, व तें आजतागाईत जसेंच्या तसेंच आहे. सांप्रत या इमारतीची सरकारानें दुरुस्ती चालविली आहे; कारण येथें भावी जिल्हाधिपतींची योजना होणार आहे असें ऐकतों. पण ही इमारत अशी कांहीं विलक्षण बांधिलेली आहे कीं, एका मूनलाईटनें सर्व हॉलभर जसा चांदण्यासारखा प्रकाश पाडतां येतो तशी युक्ति येथें साधावयाची नाहीं. अरुंद खोल्यांतून व चोरवाटांतून निरनिराळे [illegible] दिवेच लाविल्याशिवाय निभाव लागावयाचा नाहीं. तेव्हां अर्थात् दिव्यांचें एक्स्ट्रा सँक्शन् पाहिजे! मुसलमान लोकांत गोष्याचें महत्व फार असतें त्याकरितां ह्या इमारतीची अशी रचना केलेली असावी.

अदालत महाल—किल्ल्याबाहेरील हल्लींचा आसार महाल मोडून सुलतान महंमद यानें हा महाल इ० स० १६३२ यावर्षी किल्ल्यांत बांधिला. ही इमारत घुमटाळी असून फार मोठीही नाहीं. पूर्वी तळमजल्यावर कैदी लोक ठेवण्याकरितां भिंतीस आरपार भोकें पाडून कैदखाने केले होते, परंतु हल्लीं साक्षी देण्यास एक मात्र हजर राहिला आहे. ह्या इमारतीचे जिने मुंबईच्या हायकोर्टांतील बड्या जिन्याप्रमाणें गोलाकार आहेत ते मात्र अजून जसेच्या तसेच असून उदारबुद्धीनें प्रेक्षकांस उड्या मारीत जाऊं देतात. वर जातांक्षणींच एक बडा दिवाणखाना लागतो. यावरील चुन्याच्या छतास हवा येण्याकरितां बरींच मोठीं छिद्रें ठेवलीं आहेत. दिवाणखान्याच्या मागील बाजूस मुनशी व काजी लोकांकरितां विश्रांतिस्थळें केलीं आहेत. ह्या अदालतींत बारीकसारीक गुन्ह्यांचा निकाल होत असे; आणि महत्वाच्या प्रकरणांचा निकाल मुख्य तक्ताच्यापुढें म्हणजे चिनीमहालांत होत असे. या महालाचीही सरकारानें दुरुस्ती चालविली आहे.

आरसे महाल—हा इ० स० १६६२ यावर्षी छोटा अली यानें बांधिला. हा बादशाहा फार विषयी होता व ह्यास ३०० औरती होत्या; त्यांच्या सुखोपभोगाकरितां हें शयनमंदिर ह्मणून त्यानें बांधिलें होतें. ह्या महालाची पूर्वीची स्थिति अवर्णनीय होती असें सांगतात. पूर्वेच्या गच्चीवर पिठासारखें शुभ्र चांदणें पडे; खिडक्यांतूनही चंद्राचे कोमळ किरण पलंगापर्यंत प्रवेश करीत; तेणेंकरून 'जालेषु जालेषु करं प्रसार्य। सौधान्विशन्मत्तीव चंद्रः' ॥ अशी शंका येई. महालाच्या वरच्या बाजूस भरजरी किनखापाचें छत दिलें असे, त्यावर दिव्यांचा उजेड पडून त्यावरील भरजरी बूट लखलख चमकूं लागत यामुळें



हे हिरेच चमकत आहेत असें वाटे. जिकडे तिकडे भिंतींत आरसेच्या आरसेच बसवून टाकल्यामुळें हजारों खोल्या व हजारों पलंग दिसत. या द्वारानें आंत जावें ह्मणून जाऊं लागावें तों एखाद्या आरशावर धडाडून डोकें आपटायाचें. एकंदरींत या देखतभुलीचे पायीं मनुष्य कितीवेळ घोंटाळत राही याचा नियम नसे. खालीं सतरंज्या पसरून त्यांवर मखमालीचे मृदु गालिचे टाकलेले असत. त्यांवर सुलतान अली आदिलशाहा याच्या ३०० राण्या नूपुरांचा झुणझुण झणत्कार करीत यावयाच्या. महालाच्या मध्यभागीं एक सुंदर मंचक असून त्याच्या सर्व पायांस सिंह कोरले होते. कारागिराच्या कुशलपणामुळें ते हुबेहूब सिंहच भासत व ते आपला स्वामी व स्वामिनी मंचकावर शयन करीत असतां कोणी दुष्टानें घात करूं नये ह्मणून चोहोंकडून केवळ पाहारा करीत आहेत असें वाटे. पलंगावर तीन हात उंचीचा बिछाना असून त्यावर तऱ्हेतऱ्हेचे रंगीबेरंगी पलंगपोस अंथरले असत. असो; तोच बिचारा छोटा अली आपल्या समोरच्या पडक्या घुमटांत स्वस्थ झोंप घेत पडला आहे, व हा आरसेमहाल त्याच्या फार दिवसांच्या वियोगामुळें उदासीन होऊन बसला आहे.

गगन महाल—हा सुलतान अली आदिलशाहा (बडा) ह्यानें इ० स० १५५९ यावर्षी बांधिला. आदिलशाही सर्व इमारतींत ही इमारत उंच असून फार भव्य आहे. हिला मजले वगैरे कांहीं नाहींत असें वाचून आमचे वाचक कदाचित् बुचकळ्यांत पडतील, व गगनमहाल या शब्दाच्या अवयवार्थाकडे अंमळ रागानें पाहतील; पण त्यास आमचा इलाज नाहीं. ही इमारत आपल्या नांवाप्रमाणें उंचही होती, परंतु सुलतान महंमदच्या कारकीर्दींत इ० स० १६४८ यावर्षी ही बहुतेक जळून गेल्यामुळें

सांप्रत या रूपानें आपण पाहतों आहों. हिला उत्तरेच्या बाजूस दर्शनी अशा तीन कमानी आहेत. त्यांपैकीं मधल्या कमानीची रुंदी ६१ फूट असून उंचीही त्याच मानानें आहे. ह्या कमानीचा विशाळपणा पाहून मोठमोठाले इंजिनियरही तोंडास हात लावतात. कारण अशा प्रकारच्या कमानी फार झालें तर ६० फूट रुंदीच्या रेलवेच्या पुलांस देखील क्वचितच बांधितात. पण त्यांची उंची इतकी नसते. दुसरें असें कीं, इमारतीचा बहुतेक भाग जळून गेल्यामुळें ह्या तिन्ही कमानी इमारतीपासून अगदीं अलग अशा फक्त उभ्या असून अजून त्यांस भंग कसा तो माहीत नाहीं. इमारतींवर जाण्यास दक्षिण बाजूनें एक मार्ग होता, परंतु सांप्रत तो पडलेला आहे. ह्या इमारतीस लांकडी सामान होतें नव्हतें तें चटसारें लोकांनीं लुबाडून नेलें असें ह्मणतात, व त्यामुळें ही इमारत जागोजाग छिन्नभिन्न झाली आहे.

सोनेरी महाल—ही इमारत लहान आहे. परंतु हींत चित्रा-गिरीची कमाल आहे. ह्या महालाच्या उत्तरेस गगनमहाल व पूर्वेस आनंदमहाल हे आहेत. पूर्वी ह्या इमारतीस सर्वत्र सोनेरी मुलामा केलेला होता, ह्मणून हिला सोनेरी महाल असें ह्मणत. हल्लीं हिची दुरुस्ती चालली आहे; व नंतर या सोनेरी महालांत पोलीस शिपायांचें हेडक्वार्टर करावें असा सरकारचा उद्देश ऐकतों.

मक्कामशीद—इ० स० १५०८ ह्या वर्षी सुलतान युसफ आदिलशाहा यानें ही इमारत बांधिली[1]. ह्या इमारतीस तीन बाजूंनीं

१ आमचे पाहण्यांतील एका बखरींत ही मशीद इ० स० १५७७ साली अल्ली आदिलशाहा पहिला यानें बांधिली असा लेख आहे. परंतु दोन तीन बखरींत युसफ आदिलशाहा यानें बांधिली असें लिहिलें आहे, व तेंच विशेष संभवनीय दिसतें.



भिंती आहेत, यामुळें सकृद्दर्शनीं येथें भजनालय असावेंसें वाटत नाहीं. आर किल्ल्यांत शिरल्याबरोबर दुसऱ्या सर्व इमारती दिसूं लागतात तरी हिचा मुळींच पत्ता लागत नाहीं. कारण ही सखल जागीं बांधलेली असून फारच ठेंगणीही पण आहे. ह्याचें कारण ही मुद्दाम स्त्रियांकरितांच बांधलेली असून वस्तुतः त्यांचा गोषा रहावा ह्या हेतूनें हिची अशी योजना आहे. हिची लांबीरुंदी हमचौरस २८ फूट आहे; व उंची १३ फूट आहे. आंतील सर्व खांब दगडी असून त्यांस मेहरपी आहेत. त्यांवरील काम फार नाजूक व सुरेख आहे. भिंतीच्या दगडांत पवित्रस्थानीं मक्केच्या मशिदीची प्रतिमा उतरली आहे. इमारतीच्या चारही बाजूंस ११ फूट रुंदीचे सोपे काढले आहेत, व पूर्वेच्या अंगास ह्या सोप्यांस लागून परंतु इमारतीपासून निराळे असे दोहों बाजूंस दोन उंच मनोरे आहेत. वर जाण्यास एक रस्ता या खांबांस वेष्टूनच गेला होता, परंतु त्याच्या दगडी जिन्याच्या पायऱ्या कोणीं गांववाल्यांनीं काढून नेल्यामुळें त्याची चुन्याची कपलाद मात्र कायम आहे. हा रस्ता जायबंदी तर झाला आहेच, परंतु हल्लीं सरकारानें पहिल्या मजल्यापुरता (सोप्यांच्या गच्चीवर जाण्यास) मात्र दुरुस्त केला आहे.

इब्राहीम जगद्गुरु बादशाहाची मुलगी फातमा सुलतान उर्फ मलिकेपजहां ही फारच ईश्वरपरायण होती. ती आपला बहुतेक काळ ईश्वरी मार्गांत घालवीत असे. दिवसांतून तीन प्रहर तिचे या भजनालयांत जात: ही फार साध्वी होती. हल्लीं विजापूरचें

१ मुसलमान लोक मशीद बांधितांना पश्चिमेच्या बाजूस भिंतींत मक्केचें स्थान दाखवितात. कारण मक्का ही पश्चिमेस आहे; आणि ह्याच कारणामुळें तुर्कस्थान वगैरे देशांत पूर्वेकडे दाखवितात.

पोस्ट आफिस जींत आहे ती बुखारमशीद व किल्ल्याच्या पश्चिमेस बाभळींच्या गर्दीत जी एक सुंदर मशीद[1] आहे ती अशा दोन मशिदी हिंनें मांडलेल्या आहेत.

ही इमारत बांधून आज सुमारें साडेतीनशें वर्षें होऊन गेलीं, परंतु हिची बांधणूक कांहीं ठिकाणीं अगदीं नवीन असल्याप्रमाणें दिसते. सर्व विजापुरांत सुरक्षित व सगळी अशी काय ती ही मक्कामशीदच आहे. मग ही सखल जागीं आहे ह्मणून ह्मणा, अथवा अबलांच्या ह्मणून वाटेस कोणी गेलें नाहीं असें म्हणा, हिला फारशी कोणाची बाधा भोंवली नाहीं. हिला हल्लीं सरकारानें सर्वत्र चुना फासला आहे; आणि दक्षिण व उत्तर बाजूंचे दरवाजे सागवानी लाविले आहेत.

चिंदडी मशीद—ही मशीद किल्ल्याच्या भव्य बुरुजावर पूर्वेच्या बाजूस म्हणजे आसारमहालाच्या आग्नेयेस आहे. ही अलीआदिलशाहा (पहिला) यानें इ० स० १५७५ त बांधिली. हिजवर जाण्यास पश्चिम बाजूनें बिकट मार्ग आहे. हिची लांबी ५३ फूट व रुंदी १७ फूट आहे. ह्या इमारतीस आंतून दिलेला रंग जरी बेरूप झाला आहे तरी तो पाहण्यासारखा आहे. राजघराण्यांतील पुरुषांकरितां ही बांधिली होती. ही ज्या बुरुजावर आहे त्यास कठडा नसल्यामुळें वरून खालीं पाहण्याची व पडण्याची फार भिती वाटते. कदाचित् येथून मनुष्य पडला तर त्याच्या चिंधड्याच व्हावयाच्या. हीवरून पाहिलें असतां पूर्वीच्या अवशिष्ट इमारतींची शोभा व शहराची दैन्यावस्था दृष्टीस पडते. हिचें काम अगदीं जीर्ण झालें असून चुन्याची जमीन नदीच्या रेवट पात्राप्रमाणें झाली आहे.

---

[1] ह्या मशिदीस फातमा सुलतान ऊर्फ मुल्कजहांची मशीद असें ह्मणतात.



श्री नारसिंहाचें देवालय—हें देवालय आरकिल्ल्यांतील पडकोटांत आहे. हा हिंदूंचा देव मुसलमानांस कसा आवडला व त्यास त्यांनीं येथें कसें राहूं दिलें ह्याविषयीं प्रथमतः आह्मांसही मोठा चमत्कार वाटला. कारण 'फणी मयूरस्य तले निषीदति' असें होईल तरी कसें? परंतु याविषयींची मूळ हकीगत विजापूर येथील एका मुसलमानाच्या घरांतील दफ्तरांत पुढील प्रमाणें मिळाली:—

कुरुंदवाड येथें कृष्णा पंचगंगा संगम झाला आहे. तेथें श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींचा अवतार झाला. त्यास नरसोबा असें ह्मणतात. पूर्वी एक परीट येथें स्वामींची एकनिष्ठपणें सेवा करीत होता. एके दिवशीं विजापूरचा बादशाहा बडाअली ह्यानें ह्या स्थानाचा महिमा सर्वतोमुखीं ऐकिला. तेव्हां आपणही एकवार स्वामींचे दर्शनास जावें असें वाटून आपल्या सर्व इतमामासह तो निघाला. तेथें गेल्यावर गंगेस दुथडी मोठमोठ्या कनाथी लावून स्त्रियांसह जलविहारांत निमग्न झाला असतां, ह्या परटाची (स्वामींच्या शिष्याची) सहज तिकडे नजर गेली. तो जलामध्यें जी ऐन भरांत आलेली व केवळ लावण्याची खाण, जिच्या अंगावरील पदर वारंवार सरकून तारुण्यराजाच्या द्वारपालांची अवर्णनीय शोभा दिसत होती, जिचे गाल गुलाबाच्या टवटवीत फुलाप्रमाणें होते, अशा सौंदर्यसरितेच्या अधरोष्ठाचें बादशाहा राहून राहून पान करीत आहे असें दिसलें.

---

१ यानंतर आदिलशाहा अमदानींत विजापुरांतचसें काय, पण सांगोलें, म्हाझरें, अकलूज इत्यादि दूरदूरचे ठिकाणींही (मग छोटेखानी असो अथवा बडेखानी असो) पण जे जे किल्ले अगर इतर सरकारी इमारती बांधल्या गेल्या त्यांत गुरुप्रेमबुद्धिसूचक असें एकेक श्रीनारसिंहाचें देऊळ आहे.

अशी सौंदर्यसरिता जलविहारांत पाहून प्रतिशुक्राचार्यही डळमळतील. मग ह्या परटाची काय कथा?—एका कवीनें ह्मटलें आहे:—

विस्तीर्ण आणि अतिचंचल नेत्र ज्यांचे,
कीं पुष्ट यौवनमदें स्तनही जयांचे ;
मंदोदर त्रिवलियुक्त, अशा स्त्रियांतें
पाहोनि जे न ढळती नर धन्य पै ते. ॥१॥

असो. परीटबुवांचा अगदीं गडबडगुंडा उडून गेला, आणि स्वामींपुढें जाऊन भांबावल्यासारखें करूं लागले. तेव्हां तुझें मन असें चंचल कां झालें आहे असा स्वामींनीं प्रश्न केला. परंतु तो उत्तर देईना. स्वामी अंतर्ज्ञानीच ते! त्यांनीं हें सर्व गुह्य ताडिलें, आणि ह्मणाले बेटा! फिकीर करूं नको. पुढच्या जन्मीं तूंही बादशाहा होशील व ह्याच्या शतपट उपभोग करशील, व त्या वेळीं मी तुला दर्शन देऊन याची आठवण देईन.

पुढें स्वामींच्या कृपाप्रसादानें बडा अली आदिलशाहा याचे पोटीं तो परीट 'इब्राहिम आदिलशाहा जगद्गुरु' या नांवानें त्याचे मागून गादीवर आला. ह्यानें आपला सर्व काळ ऐषआरामांत चालविला असें प्रथम भागांत सांगितलेंच आहे. पुढें ऐषआरामाच्या धुंदींत याला कोठली आठवण! कोठचा परीट व कोठचा कोण! अशी याची स्थिति झाली. कारण स्वामींनीं सांगून ठेविल्याप्रमाणें पुढील सर्व गोष्टी घडून यावयाच्या होत्या.

ह्या बादशाहास पुष्कळ दिवसांपासून एका प्रकारचा आजार जडला होता तो कांहीं केल्यानें बरा होईना. तेव्हां गाणगापुरीं नरसिंह सरस्वती ह्मणून कोणी महापुरुष आहेत त्यांच्या दर्शनानें कदाचित् गुण आल्यास पाहों असें त्यास लोकांनीं सांगितलें. त्याप्रमाणें बादशाहा दर्शनास गेले व स्वामींच्या कृपेनें त्यांस गुणही आला. तरी तो बादशाहा तो बादशाहाच! पुढें स्वामींनीं त्यास दृष्टांत देऊन 'तूं पूर्वजन्मीं परीट होतास वगैरे' मागील गोष्टींची आठवण दिली. तेव्हां बादशाहास स्वामींच्या कृपेनें तें सर्व स्मरलें. नंतर त्यानें मोठ्या सत्कारानें स्वामींस विजापुरास आणवून त्यांची क्षमा मागितली, आणि प्रार्थना केली कीं, 'आपलें दर्शन अहर्निशीं घडावें' अशी इच्छा आहे; तरी या दासाशेजारीं स्वामींनीं असावें. ही बादशाहाची विनंति त्यानीं आणून 'विजापूरचे किल्ल्यास आंतून व बाहेरून असे दोन खंदक आहेत त्या दोहोंच्या मध्यभागीं पश्चिमेच्या बाजूस जो पिंपळाचा वृक्ष आहे तेथें मी उत्पन्न होईन, त्याचें तूं दर्शन घ्यावें.' असें सांगून स्वामी गुप्त झाले.



अशा प्रकारची कथा गुरुचरित्राच्या ५१ व्या अध्यायांतही आहे. त्याअर्थी हिच्या खरेखोटेपणाबद्दलचा विचार करणें आह्मी वाचकांवरच सोंपवितों.

वरील हकीगतीप्रमाणें हल्लीं हें देवालय ज्या ठिकाणीं आहे तेथेंही एक असाच फार जुनाट पिंपळाचा वृक्ष आहे, व तो हाच असें ह्मणतात. ह्या पिंपळाच्या पोटीं घालून हें नारसिंहाचें दगडी देवालय बांधिलें आहे. ह्याच्या पायथ्याजवळ एक जिवंत पाण्याचा खंदक आहे, तेथें नानातऱ्हेचे पक्षी खुशाल क्रीडा करीत असतात.

ह्या देवाची यात्रा दरसाल चैत्र शुद्ध प्रतिपदा व कार्तिक शुद्ध प्रतिपदा या दिवशीं भरत असते. त्यावेळीं दर्शनाकरतां खेड्यापाड्यांतील हिंदु मुसलमान लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटतात, व मुसलमान लोक 'हा हिंदूचा देव बडा करामतवाला आहे' असें समजून त्यास नवसही बोलतात.

पांडवांचीं देवालयें हीं पांडवांचीं कृत्यें आहेत अशी लोकांची समजूत आहे. तेव्हां अर्थात विजापूर वसण्याचे पूर्वीच हीं बांधिलेलीं पाहिजेत. परंतु ह्यांविषयीं विश्वसनीय असा लेख सांपडत नाहीं. ह्यांपैकीं एक किल्ल्यांत दक्षिण अंगास आहे. त्याविषयीं विजापूरच्या बखरींत पुढीलप्रमाणें हकीकत दिली आहे:—

"ह्या ठिकाणीं फार प्राचीनकाळीं भिल्ल लोकांची वस्ती होती. त्यावेळीं त्यांच्यापैकीं पाणकराव बिन पटवराव ह्मणून कोणी प्रसिद्ध होता त्याचें हें मुळचें देऊळ आहे. ब्राह्मणी राज्याच्या अमदानींत पीर महाबरी खंडाईत ह्मणून कोणी अवलिया येथें फिरत फिरत आला होता. त्याचा व येथील भिल्ल लोकांचा हिंदुधर्मासंबंधीं बराच वादविवाद झाला, व शेवटीं मारामारीवर येऊन पीर महाबरी यानें त्यांची पूजेची गाय ठार मारिली, यामुळें तर अगदींच निकरावर गोष्ट आली. तेव्हां अवलियानें त्यांस सांगितलें कीं, जर मी तुमची गाय पुनः जिवंत उठविली, तर तुह्मी हें देऊळ माझे स्वाधीन करून येथून चालते व्हावें. भिल्ल लोकांस हें असंभवनीय वाटून त्यांनीं त्याचें ह्मणणें कबूल केलें व याप्रमाणें उभयतांच्या शपथा झाल्या. नंतर अवलियानें आपल्या सामर्थ्यानें ती मेलेली गाय उठविली व भिल्ल लोकांनीं कराराप्रमाणें तें देऊळ अवलियाचे स्वाधीन करून दुसरीकडचा मार्ग सुधारला. पुढें आदिलशाही कारकीर्दींत मुसलमान लोकांनीं आपल्या रीतीप्रमाणें त्या देवळाची मशीद बनविली. ह्याच देवळांत पीर महाबरी याचा नातू पीरसनी साहेब याची कबर आहे."

सांप्रत ह्याचें बांधकाम अगदींच मोडकळीस आलें आहे. तरी मोठमोठे दगडी खांब व शिळा ज्या आडव्या उभ्या घातल्या



आहेत त्या जरी निराधार व पडण्याच्या लागास आलेल्या दिसतात, तरी त्या आज कैकवर्षे याच स्थितींत आहेत.

ह्याप्रमाणेंच उत्तरेचे अंगास एक मशीद आहे तिलाही पांडवांचें देवालय असेंच म्हणतात. परंतु हें ह्मणणेंही वरीलप्रमाणेंच दिसतें. तथापि हें बरेंच प्राचीन असून सुलतान युसफ आदिलशाह यानें आपण विजापूरच्या तक्तावर येण्यापूर्वीच म्हणजे इ० स० १४७४ यावर्षी यास मशीद बनवून टाकिलें आहे. सांप्रत हेंही वार्धक्य दशेप्रत पोंचून याचीं हाडें दिसूं लागलीं आहेत, व त्यामुळें याचे बांधकामांत चुन्याचा उपयोग केला होता असेंही पण स्पष्ट दिसूं लागलें आहे. तेव्हां हीं पांडवांचीं कृत्यें आहेत कीं नाहीं याविषयीं वाचकांनींच संशय फेडून घ्यावा.

'पांडवांचीं कृत्यें' यासंबंधानें आमच्या लोकांची कांहीं विलक्षण समजूत आहे. एखादी चमत्कारिक वस्तु आढळली का जसें तिच्या मागें 'विलायती' हें विशेषण लागतें, एखादी युक्तीची गोष्ट आढळली कीं, ती बादशाहा व बिरबल यांच्या नांवावर विकूं लागते—हें तर असो, पण 'अंत्याक्षरा रहित तें घोड्यानें खावें—डुकरानें खावें' अशा प्रकारचे वेडगळ श्लोकही कालिदासाच्या नांवावर मोडण्यास कित्येक दीर्घ शहाणे मागेंपुढें पाहत नाहींत; त्याप्रमाणेंच एखादी जुनी, अगडबंब व अचाट कौशल्याची इमारत पाहिली कीं ती 'पांडवकृत्यें' या नांवावर मोडूं पाहतात; व तसाच प्रकार येथेंही असावा. एवढें भाग्य समजावयाचें कीं, ताजमहाल, बोळ घुमज वगैरे इमारतींस अजून 'पांडवकृत्यें' असें ह्मणूं लागले नाहींत.

येथपर्यंत आदिलशाही घराण्याच्या किल्ल्यांतील इमारतींचें वर्णन केलें. ह्या इमारतींशिवाय किल्ल्यांत पडक्या व छिन्नभिन्न झालेल्या व कोठें नुसत्या भिंती उभ्या राहिलेल्या तर

कोठें खांबच, अगर कोठें मोडक्या कमानी व नुसते पायेच अशा इमारती बऱ्याच आहेत. शिवाय पाण्याचे खजिने, भुयारें, धान्य सांठविण्याचीं कोठारें, चोरवाटा, नोकर लोकांचीं रहाण्याचीं ठिकाणें, तळघरें, कारंजीं, भिंतींत चिणून टाकण्याचे कैदखाने, दारूगोळा ठेवण्याच्या जागा, विहिरी, फुलझाडांच्या दगडी कुंडया, तोफांच्या गोळयांच्या मोठमोठ्या राशी, तोफांच्या दारूचे कोळशाचे पिठासमाणें होऊन पडलेले ढिगारे, आसार माहालास जाणारी इमारत, सातमजली माडीखालील दुमदार मशीद, सराफखाना, शिलेखाना, तोफखाना, तालीमखाना, बंदीखाना, शिकारखाना, पीलखाना, वगैरे जागा व वस्तु अस्ताव्यस्त होऊन आदिलशाही पुरुषांचें ध्यान करीत बसल्या आहेत. हें सर्व एकसमयावच्छेदेंकरून पाहिलें असतां मनावर विलक्षण परिणाम घडतो. सरकार हल्लीं वरील ठिकाणांची दुरुस्ती करीत चाललें आहे व तत्प्रीत्यर्थ आजपर्यंत तीन लक्ष रुपये खर्च झाल्याचेंही समजतें. यावरून थोडक्याच दिवसांत या ठिकाणीं विस्तृत पटांगण व फुलझाडांच्या पांचपन्नास कुंडया मांडलेले छोटेखानी बगीचे व कुंडयांच्या गळ्यांत बांधलेले नंबरांचे ताईत यावांचून कांहीं दिसणार नाहीं. या दुरुस्तीच्या कामावर हल्लीं निरनिराळ्या जिल्ह्यांतून आणलेले सुमारें १,००० कैदी लाविले आहेत. कांहीं दिवसांनीं सात किंवा आठ इमारतींशिवाय ह्या किल्ल्यांत कांहीं दृष्टीस पडावयाचें नाहीं ! !

---

# विजापूरवर्णन.

## शहरांतील इमारती वगैरे.

### प्रकरण २ रें.

### बोळ घुमज[१].

हा सुलतान महंमद आदिलशाहा याचा दर्गा शहरात ईशान्येस आहे. ह्या इमारतीची हमचौरस प्रत्येक बाहेरील चौथऱ्याची लांबी १९८ फूट व उंची तळमजला सोडून कळसापर्यंत २२३ फूट आहे. बाहेरून ह्या इमारतीचा देखावा चोहोंबाजूस चार मनोरे व मनोऱ्यांच्या सहाव्या मजल्यास लागून इमारतीच्या सभोंवतीं ग्यालरी दिसते. ह्या इमारतीच्या आंत जा-

---

१ बोळ घुमज नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, ह्यास कळस पूर्वापार नाहीं. सुलतान महंमद यानें एक कळस केला होता पण तो लहान दिसूं लागल्यामुळें काढून टाकिला, म्हणून, किंवा कित्येक ठिकाणचें याचें नाजूक काम करण्याचें तसेंच राहिलें म्हणून यास बोळघुमज किंवा बोळ ( बोडका ) घुमज असें म्हणूं लागले.

हल्लीं विजापुरांत ह्यास गोलघुमज म्हणतात. मूळ शुद्ध शब्द 'गुंबद' असा आहे. गुंमज, घुमज, घुमट वगैरे शब्द अपभ्रंश होऊन झाले आहेत.

आग्रा येथील ताजमहालाची तळमजल्यापासून कळसापर्यंत उंची २५० फूट आहे. परंतु आह्मी या बोळघुमजाचा तळमजला सोडला आहे. तेव्हां तो धरल्यास या दोन्ही जगप्रसिद्ध इमारतींच्या उंच्या कदाचित् तंतोतंत जुळतील.

ण्यास उत्तरेच्या बाजूशिवाय तीन दरवाजे आहेत. हल्लीं दक्षिणेच्या बाजूस दरवाजा खुला आहे. आंत गेल्यावर घुमजाची खोली लागते. ही खोली १३५ फूट हमचौरस आहे. हिच्या मध्यभागीं ७६ हमचौरस फुटींचा एक चौथरा असून त्याच्याच मध्यभागीं सुलतान महंमद याची दर्शनीय कबर[1] आहे व त्यावर हमचौरस १४ फुटांचें एक सुबकसें लांकडी मखर केलें आहे. या मखराला लागूनच उजवे आंगास एक स्त्रीची कबर[2] आहे. ती त्याच्या रंभावती नामक प्रियपात्राची होय. या दर्ग्यांत या दोहोंशिवाय आणखी ४ कबरी, स्त्रियांच्या ३ व पुरुषाची एक अशा आहेत, एकूण ६ कबरी झाल्या त्या येणेंप्रमाणें:—

---

१ मुसलमान लोकांत खालीं एक व वर एक अशा दोन ठिकाणीं कबरा असतात. पैकीं खरी कबर तळमजल्यांत असते.

२ या रंभावती संबंधानें कित्येक मुसलमान इतिहासकारांचा असा लेख सांपडतो कीं,—"एके समयीं सुलतान व रंभावती हीं उभयतां या इमारतीच्या वरील पोटग्यालरींत उभीं राहून घुमटाची शोभा अवलोकन करीत असतां सुलतान सहज विनोदानें बोलला, प्रिये 'येथून तुला खालीं उडी मारितां येईल?' 'होय, येईल' असें ती ह्मणाली. मग काय, बोलून चालून विनोदच तो. बादशाहानें मार ह्मणावयाचा अवकाश. 'मार पाहूं' असें म्हणतांच तिनें धाडकन् उडी मारिली! परंतु ह्मण आहेना कीं 'देव तारी—त्याला कोण मारी'? खालीं कांहीं माणसें सहजगत्या उभीं होतीं त्यांनीं तिला अचानक झेलिलें. तिच्या केंसालाही धक्का लागूं दिला नाहीं. रंभावतीचें हें धाडस पाहून तर सुलतान फारच खुष होऊन 'माग—तुला काय पाहिजे तें माग, देतों' असें म्हणाला. तेव्हां देतां तर एवढेंच द्या कीं, 'माझी व आपली कबर ह्या अगदीं शेजारीं शेजारीं असून महाराजांचे उजवे बाजूस माझी कबर असावी' असें तिनें मागितलें; यावरून रंभावतीची कबर येथें बांधिली आहे.



पूर्वेकडे (१) सुलतान महंमदाचा नातू.
त्याच्याजवळ (२) छोटी औरत उरुसाबी.
मध्यभागीं (३) सुलतान महंमद.
उजवे अंगास (४) रंभावती.
(५) सुलतान बेगमच्या पोटची मुलगी.
(६) बडी औरत. (बडी सायबीण.)

वर जो उत्तरेच्या बाजूस दरवाजा नाहीं ह्मणून सांगितलें तेथें एक अपुतें दगडी काम केलें आहे. हें काम बोळ घुमज बांधण्यापूर्वींचें आहे. येथें सुलतान महंमदाच्या आईचा घुमज बांधण्याचा मानस होता. पण त्या बाईसाहेब मक्केची यात्रा करण्यास ह्मणून ज्या गेल्या तों त्यांस तिकडेसच परलोकची यात्रा घडल्यामुळें त्यांच्या या घुमजाचें काम तसेंच अपुतें राहिलें व यामुळें मुख्य इमारतीची शोभा गेल्याप्रमाणें दिसते.

ह्या इमारतीस जे चार अष्टपैलू मनोरे आहेत त्यांस आठ आठ मजले आहेत. ह्यांवर जाण्यास वरती सांगितलेल्या कबरींच्या खोलीच्या चारी कोंपऱ्यांचे भिंतींतून चार मार्ग आहेत. परंतु हल्लीं त्यांपैकीं तीन मार्ग सरकारानें बंद पाडून नैर्ऋत्येकडील चौथा मात्र खुला ठेविला आहे. ह्याच्या दरवाज्याची उंची सहा फूट असून रुंदी पावणेतीन फूट आहे. हा रस्ता भिंतींत आहे, व पुढें निमुळता होत गेला आहे. हा मार्ग सवादोन फुटींचा रुंद आहे. हा दोन चौरस फूट दगडी खांबास वेंटाळून गेला आहे. ह्याची शेवटच्या मजल्यापर्यंत एकंदरची उंची १८० फूट आहे. ह्यास तीन तीन पायऱ्यांवर वळण लागतें; व दरएक वळणाचे जागीं भिंतीस छिद्र पाडून उजेड केला आहे. नंतर चोवीस चोवीस पायऱ्या चढल्यावर कोंपऱ्यांतील मनोऱ्याच्या मजल्यावर एक बाजूस जाण्यास मार्ग लागतो. त्या फुटलेल्या एका एका मार्गानें मनोऱ्याच्या एका एका मजल्यावर

जाण्यास सांपडतें. ह्या प्रत्येक मजल्याचा व्यास बत्तीस फुटींचा आहे, व उंची सोळा फूट आहे. नंतर आलेल्या व फुटलेल्या मार्गानें पुनः मागें जाऊन मुख्य रस्त्यास मिळावें लागतें. ह्याप्रमाणें मनोऱ्याच्या आठी मजल्यांची शोभा पहावी! ह्या मनोऱ्यांवर एकेक घुमज आहे.

सहाव्या मजल्यावर गेलें असतां मुख्य इमारतीच्या सभोंवतीं वर सांगितलेली एक ग्यालरी लागते; तिची प्रत्येक बाजूची लांबी १४० फूट असून रुंदी २ फूट १० इंच व उंची ८ फूट ८ इंच आहे. हवा उजेड येण्याकरितां हिला साडेतीन फूट रुंदीच्या एकोणीस कमानी आहेत. ह्यावरून सुलतान महंमदाची कबर पाहण्याकरितां छिद्र केलें आहे, त्यांतून पाहिलें असतां खालीं फार खोल दिसतें. ह्याच ग्यालरीवरून वरील घुमटाच्या पायथ्यापाशीं जाण्याकरितां प्रत्येक बाजूस दोन दोन मार्ग केले आहेत.

मनोऱ्याच्या सातव्या मजल्यावर गेलें असतां वरील ग्यालरीच्या वर आणखी एक अडीच फूट रुंदीची पोट ग्यालरी लागते. ती भिंतींत असल्यामुळें बाहेरून पहाणाराच्या एकाएकीं लक्षांत येत नाहीं. हिला सुमारें तीन फुटांचीं छिद्रें हवा येण्यास केलीं आहेत. खालून पाहिलें असतां हीं छिद्रें फारच लहान दिसतात. असो.

आतां आपण घुमटाच्या पायथ्यापाशीं जाऊं आणि उजाड व गतवैभव अशा या बादशाही शहराची दैन्यावस्था चोहोंकडे कशी दिसते ती पाहूं. अदिलशाही घराण्यांतील पुरुषसिंह मोठमोठे वाडे बांधून त्यांत शिवाजी महाराजांच्या व दुसऱ्या मोठमोठ्या योद्ध्यांच्या पराक्रमासंबंधानें गोष्टी सांगत बसत. त्या वाड्यांच्या भिंती हल्लीं अगदीं मोडकळीस येऊन जणुं आपल्या दैन्यावस्थेची लाज वाटते ह्मणूनच काय, मोठमोठ्या फडांच्या



निवडुंगांनीं जिकडे तिकडे आच्छादित झाल्या आहेत! व ज्या बहादरांनीं हिंदु प्रजेस व त्याबरोबर हिंदु देवालयांसही 'त्राहि त्राहि' करून आपला धर्म केवळ तलवारीच्या जोरावर फैलावला, त्याच शूरांच्या कबरी जिकडे तिकडे दारिद्र्याचें पांघरूण ओढून पक्षांच्या विष्ठेमध्यें गडप होऊन, अगदीं शांत स्थितींत, मौन धरून सांदीस पडल्या आहेत! हें सर्व एकसमयावच्छेदेंकरून पाहिल्यावर अंतर्यामींची सर्व गडबड नाहींशी होऊन, विचारास अवसर सांपडला ह्मणजे, जगदीश, जगन्नियंता, जगत्प्रतिपालक, निराकार, निर्विकार असा जो प्रभू त्याचा अपार महिमा व अगाध लीला किती आहे हें दिसून येतें!

महान् महान् योद्धे ज्यांनीं अनेक लढायांशीं टक्कर दिली होती, तोफांच्या गडगडाटांनीं ज्यांच्या कानठाळ्या किल्येकदां बसून गेल्या होत्या, वीर्यातिशयामुळें रक्तांत हात बुडविण्याची ज्यांना कांहींच भीति वाटेनाशी झाली होती, युद्धाच्या कामांत ज्यांच्या सल्ल्याशिवाय पानही हालत नव्हतें, व ज्यांनीं आपली तरवार उपसली कीं प्रतिपक्ष्यांची गाळण होऊन गेली नाहीं असें कधींच झालें नव्हतें, असे जे विजापुरांतील महारथी त्यांची ही दशा! तर मग आपला काय पाड, कशाचा आपण गर्व वाहतों. माझें घर, माझें दार, माझें अमकें, माझें तमकें हें कोठें आहे?

आतां आपण या जगड्व्याळ घुमटाच्या आंत प्रवेश करूं. ह्या विशाळ घुमटाची जाडी १२ फूट आहे. आंत गेल्यावर घुमटांत एक अकरा फुटांची ग्यालरी लागते. ही ग्यालरी सुलतान महंमदाच्या कबरेजवळ उभें राहिलें असतां मुळींच दिसत नाहीं. ह्या ग्यालरीस आंत जाण्यास जे सभोंवतें आठ मार्ग केले आहेत, त्यांची रुंदी अडीच फूट व उंची सहा फूट आहे. दुरून

हे रस्ते एखाद्या लहान छिद्राप्रमाणें दिसतात. ह्या ग्यालरींतून खालीं कबरेकडे पाहिलें असतां डोळे दिपून जातात. ह्यावर बिन आधारी साठ फुटींचा भव्य घुमज असून त्याचा व्यास १३५ फुटींचा आहे. ग्यालरीचा घेर सुमारें ४०० फूट आहे. ह्यांत एखादा शब्द उच्चारिला असतां त्याचा प्रतिध्वनि निदान दहा वेळां स्पष्टपणें मोजून घ्यावा. मग मात्र तो गायनयुक्त शब्द हळू हळू नाहींसा होतो, यामुळें प्रथमतः मनुष्यास भीति वाटते; व एकटा दुकटा असल्यास त्याची तर भीतीमुळें पांचांवर धारणच बसावयाची. दुसरा येथें आणखी एक चमत्कार असा आहे कीं, दोघांजणांनीं दोन टोकांस समोरासमोर बसावें. एकानें भिंतीस तोंड लावावें व अगदीं हळू बोलावें, दुसऱ्यानें भिंतीस कान लावून तें ऐकावें. ह्मणजे जरी ह्या दोघांत १३० फुटींचें अंतर आहे तथापि तो मनुष्य जणूं आपणाशींच बोलत आहे असें स्पष्ट ऐकूं येतें; व मनुष्याकडे पाहिलें असतां तो त्यास बसलेला पाहून व त्याची ती दूरत्वातिशयामुळें चिमुकलीशी दिसणारी विलक्षण मूर्ति पाहून भीति उत्पन्न होते.

ही पोट ग्यालरी जमिनीपासून १२० फूट उंच आहे. येथें हल्लीं धुरळा झाला आहे. हें सर्व विशाळ काम पाहून मनुष्याची छाती दडपून जाते. ह्मातान्याकोतान्यांची तर १८० पायऱ्या चढून ही ग्यालरी पहाण्याची प्राज्ञाच नाहीं. कसाही सशक्त मनुष्य असला तरी एका सपाट्यांत ह्या ग्यालरीपर्यंत पायऱ्या चढून आला कीं त्यानें कमाविलीच !

इतका मोठा घुमज[१] सर्व पृथ्वींत दुसरा कोठेंही नाहीं असें म्हण-

[*] This Dome measures 130 feet in Diameter which is larger than that of the Pantheon at Rome or, I believe,

(पुढें चालू.)



तात. ह्या इमारतीच्या दक्षिणेस एका लोखंडी सांखळीस अडकवून एक दगड ठेविला आहे. तो विजेचा दगड आहे असें म्हणतात. आह्मी ह्या दगडाविषयीं असें ऐकत होतों कीं, पावसाळ्यांत ज्यावेळीं वीज आकाशांत नाचूं लागते त्यावेळीं हा दगडही लाल होऊन आपल्या ठिकाणीं नाचूं लागतो. परंतु हें लोकांचें सांगणें निव्वळ खोटें आहे असें ह्मणण्यास आम्हांस तिळभरही शंका वाटत नाहीं. कारण ज्यावेळीं जिकडे तिकडे विजा चमकत होत्या, आकाशांत वारंवार मेघांचा गडगडाट होत होता, सर्व दिशा धुंद झाल्या होत्या, मोठा सपाट्याचा वारा सुटला होता, पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या व ह्या गगनचुंबित घुमटाचीं शिखरें अभ्रानें आच्छादित झालीं होतीं त्यावेळीं मुद्दाम आह्मी तेथें जाऊन त्या दगडाकडे एकाग्र दृष्टीनें पहात होतों, परंतु लोकांचे ह्मणण्याप्रमाणें आह्मांस कांहींएक दिसून आलें नाहीं.

ह्या इमारतीची झाडलोट करण्याकरितां ह्मणून हल्लीं ४।५ रुपये दरमहा पगाराचे असे तीन नोकर आहेत. ह्या नौकरांस प्रेक्षकांकडून पैसाअधेला शिवाय मिळतो. इमारतीचे दक्षिणेस नगारखाना आहे. ही इमारतही फार भव्य आहे. हल्लीं यांत रेलवे कंपनीनें भिंती वगैरे सारविण्यास ३००० रुपये खर्चून विश्रांतिमंदिर केलें आहे. पश्चिमेस निमाज पढण्याची दुगडी

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

of St. Pauls in London ; and very little less than that of St. Peters. ( Book of Bombay by James Douglas. )

[१] ह्या घुमजाचा व्यास १३० फूट आहे. तेव्हां रोम येथील प्यान्थीआन् किंवा लंडन येथील सेन्टपाल ह्या इमारतींच्या घुमजांपेक्षां मोठा आहे. मात्र सेंटपिटर्सपेक्षां किंचित कमी होईल.

इमारत आहे. हींत हल्लीं सरकारी तारऑफिस असून तारमास्तरास राहण्यास ह्या भजालिर्थातच जागा केली आहे. उत्तरेस 'मासे बावडी' व 'निमबावडी' अशा दोन विहिरी आहेत. पैकीं निमबावडीचें पाणी (पुण्यांतील भिकारदासाच्या विहिरीच्या पाण्याप्रमाणें) फार गोड व पाचक असून सर्व विजापुरांत त्याची प्रसिद्धि आहे. वर लिहिलेल्या तारऑफिसाच्या पिछाडीस सुलतान महंमदचा गुरू 'हाशीमपीर' याची कबर व दर्गा आहे. तसि 'पीरजाद्याची कबर' असें ह्मणतात. हल्लीं याचा वंशज विजापुरांत आहे, त्यास मुसलमान लोक फार मान देतात. हा दर्गा सुलतान महंमद यानें बांधिला आहे. ह्या पीरजाद्यानें सुलतान महंमद मरावयास टेंकला असतां आपल्या आयुष्याचीं दहा वर्षें देऊन त्यास वांचविलें अशी दंतकथा आहे. ही कितपत खरी असेल याची कल्पना करणें हें आमच्या वाचकांवरच सोंपवितों.

---

## जुम्मा मशीद.

ही इमारत ह्याच नांवाच्या बाजार पेठेंत आहे. ही बडा अल्ली आदिलशहा ह्यानें मीरमहंमद तगे हुसेनी नांवाच्या हुशार कारागिराकडुन इ० स० १५६५ सालीं बांधविली.

ही इमारत पूर्वाभिमुख असून हिला आंत जाण्याकरितां पूर्वेच्या बाजूस एक, उत्तरेच्या बाजूस दोन, व दक्षिणेच्या बाजूस एक असे एकंदर चार दरवाजे फार भव्य व सुंदर आहेत. पैकीं पूर्वेकडील दरवाजा हा आंत शिरण्यास समोरच्या बाजूचा ह्मणजे अर्थात् मुख्य आहे. ह्या दरवाजाची उंची नऊ फूट व रुंदी साडेपांच फूट आहे. याचा उंबरठा एका दहा फूट अखंड दगडाचा असून त्यावर चौकटीचे जे नक्षीदार खांब आहेत तेही अखंड दगडाचेच आहेत. ह्या दरवाजावरच एक लहान पण



सुरेख इमारत आहे, व ती इतकी भिजबूत आहे कीं पाहणारास नुक्ती बांधल्यासारखी वाटते.

ह्या दरवाजांतून आंत शिरल्याबरोबर एक मोकळें पटांगण लागतें. याच्या मध्यभागीं एक जंगी व सुंदर कारंजें करून त्यांत बेगम तलावाचें पाणी नळानें बांधून आणून सोडलें होतें. पण तो नळ सांप्रत बंद झाल्यामुळें उदकरहित कारंजें मात्र दृष्टीस पडतें. ह्या पटांगणांत उभें राहिल्याबरोबर समोरच मुख्य इमारतीच्या एकसारख्या आंत आंत कमानीच कमानी व सभामंडपाची विस्तीर्ण जागा हीं दिसूं लागतात. ह्यामुळें पाहणाराचें आजूबाजूकडे विशेष लक्ष जात नाहीं.

मुख्य इमारत ही पटांगणापेक्षां कांहीं थोडया ज्यास्त उंचीच्या चौथऱ्यावर आहे, व तीस दर्शनी कमानी ९ असून त्यांची रुंदी २१ फुटांची आहे. ह्या कमानींच्या आंत आंत ज्या कमानी दिसतात म्हणून सांगितलें त्या सर्व अशा कांहीं गमतीनें बांधिल्या आहेत कीं, दर्शनी कमानींच्या आंतील आडवी पहिली ओळ २१ फुटांवर असून त्याच्या पलीकडे तितक्याच अंतरावर दुसरी ओळ, ह्याप्रमाणें आडव्या नऊ ओळी; व त्याचप्रमाणें उभ्या बाजूनें-ह्या सर्व आडव्या ओळींतील प्रत्येक दोन ओळींच्या प्रत्येक दोन कमानींस मध्यें जोडणाऱ्या २१ फूट रुंदीच्याच उजव्या बाजूनें एक व डाव्या बाजूनें एक अशा दोन दोन कमानी; ह्यामुळें उभ्या ओळींपैकीं उजव्या बाजूची एक व डाव्या बाजूची एक अशा दोन कमानी आणि आडव्या ओळींपैकीं पूर्वेची एक व पश्चिमेची एक अशा दोन कमानी ह्यांच्या मध्यें २१ फुट बाजूच्या अशा ठायीं ठायीं चौरस जागा पडतात. एकंदरींत २१ फूट अंतराच्या (किंवा रुंदीच्या) ९ कमानींवर हें सर्व प्रमाण बसविलें आहे. असो. ह्यावरून

ह्या सर्व कमानी खालची मोकळी सभामंडपाची जमीन ह्मणजे एक विस्तीर्ण पटांगणच पडलें ह्मणावयाचें ! आणि अर्थात् हें पटांगण २४४ फूट लांब व १३८ फूट रुंद एवढें आहे. तथापि ह्या एवढ्या पटांगणांतही कमानीप्रमाणेंच योग्य परिमाणाशिवाय बोलणें नाहीं. ही मशीद ह्मणजे प्रार्थनेची जागा होय, आणि लढाईस जाण्यापूर्वी मुसलमान वीर ह्याच मशिदींत बसून ईश्वराची प्रार्थना करीत असत. त्यांस बसण्याची अव्यवस्था होऊंनये ह्मणून तीन फूट दहा इंच लांब व दोन फूट आठ इंच रुंद असे योग्य अंतराअंतरावर सर्व मंडपाचे एकंदर २४३० अवयव पाडिले आहेत. ह्यांतील प्रत्येक अवयव ह्मणजे एकेका वीराचें आसन होय. ह्या प्रत्येक आसनास काळ्याभोर रंगाच्या महिरपी काढिल्या आहेत. शिवाय प्रत्येक आसनास त्याच्या सीमेच्या रेषा रेखिल्या आहेत; ह्यामुळें हीं सर्व आसनें एकवटून पाहिलीं असतांच मनास आल्हाद होतो. मग ज्या वेळीं ह्यांवर एकापेक्षां एक असे २४३० पट्टे वीर बसून प्रार्थना करीत असतील त्या वेळीं हा मंडप जो गजबजून जात असेल व जी शोभा दिसत असेल त्याची कल्पना करणेंच प्रशस्त होय ! मंडपांतील ही सर्व आसनांची जागा चुन्याची असून तीं अगदीं कांचेप्रमाणें गुळगुळीत व तकतकीत झाली आहे व यामुळें हें सर्व काम अगदीं नव्यासारखें दिसतें. नंतर ह्या मंडपाच्या कमानीकमानींतून पुढें बरेंच लांब गेल्यावर ह्या मशिदीची जी पश्चिमेची भिंत तिच्या मध्यभागावर एक विशाळ कमान दृष्टीस पडते. ह्या कमानींवर नेहमीं पडदा झांकलेला असतो, तो उघडून पाहिल्याबरोबर डोळे दिपतात. ह्या कमानींतही अनेक महिरपी, त्यांचे भोंवतीं वेलबुट्टी, मजेदार झाडें व महिरपींतून सोनेरी अक्षरानें कुराणांतील वाक्यें मोठ्या डौलानें लिहिलीं आहेत. एकंदरींत ह्या कमानींतील सर्व कांहीं



काम सोनेरी असून त्यानें सर्व कमानभर गजगजाट झाला आहे; व ह्यामुळेंच पाहणाराचे डोळे दिपून जातात व हा देखावा पाहून त्या निराकार निर्विकार प्रभूकडे लक्ष लागून जातें. हें सोनेरी काम सुलतान महमदाच्या कारकीर्दींत इ० स० १६३५ या वर्षीं झालें आहे; परंतु हें धर्माचें प्रकरण असल्यामुळें त्यास अजून कोणी आपला लोभी स्वभाव दाखविला नाहीं ! कमानींतील महिरपांतून जीं जागोजाग कुराणांतील वाक्यें लिहिलीं आहेत तीं फार्शी व आरबी भाषेंत आहेत ह्यामुळें आह्मांस त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. तथापि मधील महिरपींत जीं वाक्यें लिहिलीं आहेत त्यांतील कांहीं चुटके त्यांच्या अर्थासह खालीं देतों:—

(१) बरकसरेउम्रतकयामगरउस्तूवारनीस्त्
(२) दारदारेबेकरारकसेराकरारनीस्त्
(३) खुशूमंजेलस्तदुनीयारौनकूबचश्मा
(४) खुशूदौलतूअस्तउम्रवलेपायदारनीस्त्

## अर्थ.

(१) वय हीच कोणी इमारत आहे, पण तीवर भरंवसा ठेवणें रास्त नाहीं.

(२) दुनिया ही स्थिर नाहीं व तीतील प्राणीही स्थिर नाहींत.

(३) दुनियेंमध्यें सफर करणें फार चांगलें आहे व तीतील वास्तव्य चिजाही फार चांगल्या दिसतात.

(४) आयुष्य ही फार छानदार दौलत आहे पण तेंही चिरकाल नाहीं.

हीं वाक्यें किती खोल विचाराचीं आहेत हें मार्मिक वाचकांच्या सहज ध्यानांत येणार आहे.

असो; ह्या कमानीशेजारींच मुख्य काजीस बसण्याकरितां

संगमरवरी दगडाच्या तीन सुंदर पायऱ्या केल्या आहेत. त्यांतील वरचे पायरीवर बसून ते उपदेश करीत असत. येथून पुनः पटांगणाच्या मध्यभागावर यावें तों एवढ्या अफाट पटांगणांत मनुष्य अगदीं क्षुद्रवत् भासतो; व येथून त्यानें वर घुमजाच्या पोकळीकडे पहावें तों वरपर्यंत नजर पोंचत नाहीं.

ह्या इमारतीस दक्षिणोत्तर बाजूस मुख्य बैठकीच्या पटांगणास लागून सोपे काढले आहेत. ह्या सोप्यांत फकीर वगैरे अनाथांस रहाण्यास तळघराप्रमाणें जागा केल्या आहेत. जुम्मा मशीद इमारतीस तीन बाजूंनीं दर्शनी ग्यालऱ्या काढल्या आहेत. ह्या रस्त्यावरून दिसतात. ह्यांवर जाण्यास आंतील सोप्यांतून मार्ग आहेत. दक्षिणेकडील व उत्तरेकडील प्रत्येक बाजूच्या ग्यालरीची लांबी ३४० फूट असून तींत २३ कमानी आहेत; व पश्चिमेस ग्यालरीची लांबी २५४ फूट असून तींत सतरा कमानी आहेत. काय मोठें व भव्य काम हें! आदिलशाही बादशहांनीं मनगटाच्या जोरावर कमाविलेला पैसा ह्या इमारतीप्रीत्यर्थीं किती खर्च केला असेल कोण जाणें! बिचाऱ्या महाराष्ट्र प्रजेस हें त्यांनीं कौतुक करून ठेविलें. असो. ह्या तीनही ग्यालरींतून घुमटाच्या पायथ्याशीं जाण्याकरितां पश्चिम बाजूस दोन व दक्षिणोत्तर एक एक असे चार मार्ग आहेत.

ह्या मार्गांनीं वर गेल्यावर एक विस्तृत पटांगण लागतें. हें पटांगण सर्व इमारतींचें छपर होय. हें सर्व चुनेगचीं केलेलें आहे. ह्यावर चारपांच हजार लोकांची केवळ यात्राच भरेल इतकें हें मोठें आहे. येथें मध्यभागीं घुमटाचा पाया लागतो. हा समचौरस ८३ फूट आहे. येथून तळजमीन सुमारें ६३ फूट आहे. एकंदरीनें ही इमारत साधी आहे.

पूर्वी ह्या इमारतीकरितां ७०० रुपयांची नेमणूक होती, परंतु तीं बंद होत होत हल्लीं बुऱ्हानदीन खतीब व महंमद अली बांगी यांचे वंशजांस सारे ९० रुपये दरमहा मिळतात. यांशिवाय सरकारानें इमारतीची झाडलोट करण्याकरितां सात रुपये पगाराचा नोकर ठेविला आहे. ह्या मनुष्यास एक पैसा दिल्याशिवाय सोनेरी कमानीवरचा पडदा काढून दाखवीत नाहीं.



---

## मेहेतर महाल.

हा महाल कधीं बांधिला असावा याचा बरोबर सन सांपडत नाहीं; तरी हा सुलतान महंमद याच्या कारकीर्दींत बांधिला असावा. परंतु हा बादशहानें बांधिला नसून मेहतरगदा यानें बांधिला असें कित्येक लोक सांगतात, व अडाणी लोक तर हा महाल कोणी बादशहाच्या पदरचा मेहेतर (भंगी) यानें बांधिला असें ह्मणतात. तथापि पहिल्या ह्मणण्यांत सत्यता असावी असें दिसून येतें; कारण फार्शी भाषेंत मेहेतर याचा अर्थ फकीर व गदा याचा अर्थ सरदार किंवा मुख्य असा आहे, तेव्हां एकंदर शब्दाचा अर्थ फकिरांचा मुख्य किंवा सरदार असा होतो. प्रथम भागांत आह्मीं एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, सुलतान महंमद आदिलशाहा हा फकिरांचा पोशिंदा होता. त्या अर्थीं त्यांस अनुसरून फकिरांच्या कोणी मुख्यानें हा महाल बांधिला असावा हें युक्त आहे. आतां ज्या फकिरांनीं हा बांधिला त्यांस इतकें द्रव्य कोठून मिळालें याची हकीगत अशी आहे कीं, सुलतान महंमद हा नित्य रात्रीं निजतांना सोन्या रुप्याचें नाणें आपणावरून ओंवाळून पलंगाखालीं ठेवीत असे व दुसरे दिवशीं तें फकिरांस वांटून टाकी. असा त्याचा क्रम सतत चालल्यामुळें पुढें कांहीं दिवसांनीं शहरांतील फकीरलोक द्रव्यवान होऊन त्यांच्यानें वेळच्यावेळीं बादशाहापुढें येण्याचें सह-

ग्रीं बंद पडत चाललें. हें पाहून सुलतान महंमद यानें परमुलखांतून मुद्दाम बारा फकीर आणवून त्यांस तो तें द्रव्य देऊं लागला व पुढें होतां होतां हे परदेशी फकीरही चांगलेच मातबर होऊन विजापुरांत आपलें नांव राहावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां त्यांनीं आपला मुख्य जो मेहतर खुदुज ह्मणून होता त्यास विनंति केली कीं, बादशाहापासून मिळत असलेलें द्रव्य आह्मांस न वांटतां त्या पैशामध्यें आमच्या नांवानें एक सुंदर नगारखाना व मशीद सर्व विजापुरांतील नगारखान्यांस व इमारतींस मागें टाकील अशा रीतींची बादशाहाची परवानगी घेऊन बांधावी. त्याप्रमाणें मेहेतरखुदुज यानें बादशाहाची परवानगी घेऊन तालीकोटाहून सुंदर दगड आणवून हा महाल ( ह्मणजे नगारखाना ) व त्याचे मागले बाजूस एक मशीद अशी अतोनात द्रव्य खर्च करून बांधिली.

वास्तविक पहातां ज्याचें आह्मी वर्णन करीत आहों हा मुख्य मशिदीच्या दरवाज्यावरील नगारखाना आहे; परंतु ह्याचा देखावा महालाप्रमाणेंच असल्यामुळें लोक त्यास ' मेहेतर महाल ' असें ह्मणूं लागले. हा महाल हमचौरस सारा पंचवीस फुटांचा आहे, व ह्याचे दर्शनी बाजूचे दोन कोंपऱ्यांवर जमिनीचे तळापासून बिनमजली व खांबासारखे सोट असे दोन मनोरे महालापेक्षां वरपर्यंत गेलेले आहेत. मशिदीसुद्धां एकंदर सर्व इमारत जर पाहिली, तर फक्त महालाखालून जाणाऱ्या मशिदीच्या दरवाज्यास मात्र लांकूड असून बाकी सर्वत्र नुसत्या दगडांशींच कारभार आहे. तथापि लांकडावरही कोरितां येणार नाहीं अशा प्रकारचें बारीक व नाजूक कोरींव काम ह्या दगडांवर झालेलें पाहून कारागिरांची व त्याच्या बांधविणारांचीं तेथील लोकांस देखील धन्यता वाटते. याचें प्रत्यंतर इतकेंच कीं, हीं इ-



मारत शहरांतील अगदीं भर रस्त्यावर असल्यामुळें तेथील रहिवाशांसही तिच्या खालून जातां येतांना वर तिच्या सौंदर्याकडे पाहिल्याशिवाय पुढें पाऊल टाकवत नाहीं. एकंदरींत पाहतां ह्या महालाच्या नाजूकपणापुढें विजापुरांतील बहुधा सर्व इमारतींचीं कामें मागें पडतील. यापेक्षां कोणी पाहिल्यावांचून त्यांस ज्यास्त सांगतां येणार नाहीं. असो. ह्या महालाखालील ह्मणजे सर्व इमारतीच्या दर्शनी बाजूच्या भिंतींवर नाना तऱ्हेची वेलबुट्टी काढिली आहे. हल्लीं हें नक्षीचें काम पावसामुळें झिजून अस्पष्ट झालें आहे, तरी त्याच्या पूर्वीच्या सौंदर्याचें मोल सहज करितां येणार आहे. नंतर हें काम पाहून आंत शिरण्यास वर दर्शविलेला सर्व इमारतीचा मुख्य लांकडी दरवाजा आहे, तो कमानदार असून त्याची उंची ७ फूट व रुंदी ४ फूट आहे. त्यांतून शिरलें ह्मणजे दोन बाजूंस दोन देवड्या लागतात व त्यांपुढें दुसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा अगदीं लहान ह्मणजे ९ फूट उंच व २ फूट रुंद आहे. मेहेतर महाल ह्याच दोन दरवाजांच्या मधील अंतरावर आहे. तेव्हां अर्थात ह्या दोन दरवाजांमधील अंतर २५ फूटच आहे. येथून उजवे बाजूस वर जाण्याकरितां भिंतींत दोन फूट रुंदीचा मार्ग असून वाटोळे वेढे घेत गेलेला आहे. त्यावरून वर गेलें ह्मणजे दक्षिणोत्तर बाजूस बसण्याकरितां सज्जे केलेले आहेत. येथें बसून वरची शोभा पहावी तों निराधार शिलांचें छत पाहून मनुष्य चकित होऊन जातो. हा ह्या इमारतीचा दुसरा मजलाच ह्मणावयाचें. ह्या मजल्यावरील मजला ह्मणजे वरील उघडी गच्ची होय. तथापि तिच्या सभोंवार मजबूत भिंती आहेत. गच्चीच्या पुढील तीन बाजूंस खालील मजल्यासारखेच सज्जे आहेत व ते पुढें आलेले असल्यामुळें त्यांस दगडी तिरांचे टेंकावे दिलेले आहेत. परंतु त्यांवरही नक्षीकाम कांहीं कमी नाहीं.

हल्लीं ह्या सज्जांपैकीं पूर्वेकडील एक सज्जा मात्र पडला आहे, तथापि बाकीचे दोन पूर्वपश्चिम असल्यामुळें ह्या महालास चौफेर दिसतो. ह्या सज्जावरून महालाची शोभा पाहिली असतां तहानभूक हरून जाते! उत्तरेकडील सज्जावरून समोरच आसार महालाचीही शोभा दिसते. एकंदरींत ही महालाची इमारत जरी ४० फूट उंचीची व हमचौरस २५ फूट लांबी रुंदीची अशी छोटेखानीच आहे तरी तिच्या कारागिरीची कुशलता पाहून मिसर देशांतील पिरामिडसारख्या इमारती पाहिलेले साहेब लोकही नवल करितात!

---

## आसार महाल.

ही इमारत आर किल्ल्याभोंवतालच्या खंदकास लागूनच त्याचे पूर्वेस आहे. ह्याच्या बाकीचे तीन बाजूंपैकीं पूर्वेस मुस्तफाखान व खोवासखान वजीर यांचे पडके वाडे, दक्षिणेस मेहेतर महाल व जुम्मा मशिदीकडे जाणारा रस्ता, आणि उत्तरेस स्टेशनाकडे जाणारा रस्ता अशा हिच्या चतुःसीमा आहेत. ही इमारत इ० स० १६३१ ह्या वर्षी सुलतान महंमद आदिलशाहा ह्यानें प्रथम दाद महाल ह्मणजे लोकांची दाद घेण्याचा महाल किंवा अदालत महाल अशा अर्थावर किल्याबाहेर बांधविली होती; आणि त्याप्रमाणें हिचें काम पुरें झालें, परंतु हें वर्तमान दिल्लीच्या शाहाजान बादशाहास समजतांच त्यास राग आला, व त्यानें एका दिल्लीच्या सार्वभौम बादशाहावांचून दुसरांस असा महाल किल्ल्याबाहेर बांधण्याचा कोणासही अधिकार नाहीं, असें आज्ञापत्र लिहून ह्या महालास दादमहाल किंवा अदालत महाल असें नांव देण्याची मनाई केली. ह्या कारणामुळें व दुसरें ह्या वेळींच हल्लीं त्या महालाच्या मागील बाजूस जो



खंदकावरून किल्ल्यांत जाणाऱ्या पुलाची साक्ष आहे त्यास लागूनच पूर्वींचा आसार महाल होता, त्यास आग लागून जळाल्यामुळें अनायासें त्यांतील पैगंबर नबीसाहेब यांची संदूकें[१] ह्या नवीन बांधलेल्या महालांत तुर्तीच आणून ठेविलेली होती ह्यामुळें ह्या महालास हल्लींचें आसार महाल असें नांव द्यावें लागलें. असो.

ह्या इमारतीची लांबी १३५ फूट व रुंदी १०० फूट असून तिला दक्षिण व उत्तर बाजूंस एकेक दरवाजा आहे. पैकीं दक्षिण बाजूच्या दरवाजाच्या आसपास कित्येक संगमरवरी दगड पडले आहेत. हे नुसते दगड पाहूनच लोक आश्चर्यभरित होऊन जातात. कारण ह्या दगडांपैकीं एक निमाज पढण्याकरितां केलेला दगड आहे तो आह्मी मोजून पाहिला तों त्याची लांबी ८ फूट व रुंदी पांच फूट भरली. शिवाय जवळच एक खांब पडला आहे त्याची लांबी ११ फूट ९ इंच आणि व्यास पांच फूट आहे. असेंही असून ह्यांत तोंड पाहून घ्यावें इतके हे दगड तुळतुळीत आहेत. दगडांपैकीं हल्लीं बहुतेक दगड व दुसरें इमारती सामान तेथील रहिवाशांनीं लांबविलेलेंच असून सरकारानेंही कांहीं आपल्या उपयोगांत आणिलेलें आहे असें सांगतात. तथापि इतकें लांब नको, हल्लीं महारांचांभारांच्या घरांपुढें देखील अशा प्रकारचे दगड पुष्कळ आढळतात. असो. हे वर सांगितलेले दरवाजे ह्मणजे इमारतीची कोणतीही दर्शनी बाजू नाहीं. दर्शनी बाजू पूर्वेची असून तिला उघड दरवजा नाहीं, व तिच्या जवळच लागून एक सुंदर तळें आहे. ह्या तळ्यांत बेगम तलावाचें पाणी आणून सोडिलें आहे. दर्शनी बाजूस नुसते

---

१ संदूक ह्म० पेटी. हींत पैगंबराचीं वस्त्रें व एक केश अशा प्रकारचें कांहीं सामान असतें.

उंचच चार अष्टपैलू खांब आहेत; त्यांची उंची सुमारें ३९ फूट व
घेर १२ फूट असल्यामुळें ते केवळ वृक्षवत् भासतात. ह्या खांबां-
वरील छप्पर व मुख्य इमारतीचें छप्पर हीं एका पातळींत आ-
हेत व खांबांपासून इमारत ४० फूट अंतरावर आहे; ह्यामुळें उं-
चच उंच व रुंदच रुंद अशी पायाचे सपाटीबरोबर एक भली
मोठी १२८ फूट लांबीची ग्यालरी खांबांच्या व इमारतीच्या
मध्यें पडते. ह्या ग्यालरींतून वर तक्तपोशीकडे पहावें, तों ती
चित्रविचित्र रंगांच्या दगडांनीं मढवून टाकिलेली दृष्टीस पडते.
ह्याच ग्यालरींत एक दगडी चौरंग पडलेला आहे, त्याची लां-
बी सहा फूट व रुंदी तीन फूट आहे. ह्या दगडांत सोनेरी रंगा-
ची चमक असून त्यांत पुष्कळ रंगांचें मिश्रणही झालेलें दिसतें.
मग असला चमत्कारिक दगड आणणारानें कोठून शोधून आणि-
ला असेल कोण जाणें! असो. नंतर ग्यालरींतून पुढें इमारतीच्या
पहिल्या मजल्याची २३ फूट उंचीची भिंत व तीवर दुसरा मजला
आणि त्यापुढील सज्जा दिसतो. ह्या भिंतींत कमानी पाडलेल्या
आहेत व त्यांचे आंत एक ४० फूट लांब व २३ फूट रुंदीची स-
लग जागा असून तिच्या उत्तरेच्या खोलींत मक्केच्या नमुन्या-
बरहुकूम लांकडी देवालय व दक्षिणेस दुसऱ्या मजल्यावर जा-
ण्याचा जिना आहे. सदरील देवालय नेहमीं बंद असतें; करितां
तेथील रक्षकास चांगली चिरीमिरी दिल्यावांचून पाहण्यास
सांपडणें कठीण! येथील मुसलमान लोकांत लग्न वगैरे मंगल-
कृत्य निघालें असतां ह्या खोलीचें व दुसऱ्या मजल्यावर अस-
लेल्या पैगंबराच्या संदुकीचें प्रथम दर्शन घेण्यास जातात. तळ-
मजल्यावर ही खोली व वर सांगितलेली जागा ह्यांशिवाय दुस-
ऱ्या आणखी ज्या कांहीं खोल्या आहेत त्यांत ताबुदाचें सामान
व कांहीं जीर्ण झालेलें पिराचें सामान असतें, व त्याही नेहमीं
बंदच असतात.



आतां आपण दक्षिणेच्या जिन्यानें वरच्या मजल्यावर जाऊं
व तेथील रम्य शोभा पाहूं. ह्या मजल्यावर ८२ फूट लांब व २७
फूट रुंदीचा एक दिवाणखाना आहे. परंतु एवढ्या अजस्र दि-
वाणखान्याचें वरील छत केवळ भिंतींच्या आधारावरच आहे.
ह्या दिवाणखान्याची भिंत चुन्याची असून अगदीं तुळतुळीत
झालेली आहे. दिवाणखान्याची शोभा पहात पहात पश्चिमेच्या
बाजूस जावें तों एक दरवाजा लागतो. तो ८ फूट उंच व साडे-
पांच फूट रुंद आहे, व ह्यांतूनच आर किल्ल्यांत जाण्याचा खंद-
कावरून पुलाचा मार्ग होता असें दिसतें. कारण हा दरवाजा बंद
आहे व पुलाचीही साक्षच आहे. तेथून परत उत्तरेस फिरलें ह्म-
णजे २७×१९ फुटींची खोली लागते. तिच्यांत शंभर शंभर हात
लांबीच्या सतरंज्या, तसेच गालिचे व इतर बिछाइतीचें जगून-
वांचून राहिलेलें दीर्घायुषी सामान रचून ठेविलेलें आहे. हें दीर्घा-
युषी ह्मणण्याचें व जगूनवांचून म्हणण्याचें कारण, आज चार-
पांचशें वर्षांचें वृद्ध घोंगडें असून तें तसेंच चालत चालत
कांहीं वर्षांपूर्वी मुंबईच्या प्रदर्शनास गेलें होतें; पण बिचारें मध्यें-
च मुक्काम न करितां परत आलें! आणखी दुसरें असें कीं,
ह्याच महालांतील चित्रविचित्र नक्षीच्या वृक्षवत् चांदीच्या समया,
नामी नामी झाडें, ह्यांच्यासारखा ह्या सामानास येथें पुनः
राहण्याचा अजून कंटाळा आलेला दिसत नाहीं! नशीब बिचाऱ्या
ज्या आसाराचें! असो. वरील खोली पाहून मग पूर्वेच्या म्हणजे
दर्शनी बाजूच्या सज्जाकडे वळावें. हा सज्जा ४०×२३
फुटींचा आहे. ह्याच्या सर्व भिंतींस सोनेरी मुलामा दिलेला हो-
ता, परंतु तो द्रव्याशेनें मराठ्यांनीं व इतर चोरापोरांनीं बहुतेक
खरडून गाळून पार फन्ना केला आहे. तेव्हां अर्थात हा मुलामा
कोणते प्रकारचा असावा याची वाचक कल्पना तरी करतील;
बाकी खरडणें दृष्टीस पडेलच. ह्या सज्जांतून लांब त्या शूर खो-

ख़ासखान, मुस्तफाखान यांच्या जमीनदोस्त वाड्यांच्या जागा दिसतात. सज्जाच्या उत्तरेस एक खोली आहे तिचा दरवाजा नेहमीं रेशमी पडद्यानें झांकलेला असतो, व सदोदित तीवर मोहर केलेली असते. हिच्यांतच पैगंबराची संदूक ठेवलेली आहे. ही खोली बारा महिने बंद असण्याचें कारण असें सांगतात कीं, हिच्या मागील खिडकीवाटे कोणी भामट्यानें प्रयत्नानें शिरकाव करून संदुकीस ज्या मोठमोठ्या चांदीच्या पट्ट्या होत्या त्या व आंतील जरतारीचीं बहुमोल वस्त्रें लांबविलीं व आणखीही त्यानें कांहीं खटपट चालविलीच होती; परंतु इतक्यांत तेथें जवळच आग लागल्यामुळें त्यानें आपलें चंबुगवाळें आटपून पलायन केलें. पुढें तेथील रक्षक नोकरांस धूर दिसल्यावरून ते मोहर फोडून व कुलूप तोडून आंत शिरले तों त्या महापुरुषाच्या संदुकीची दशा झालेली त्यांच्या दृष्टीस पडली व लवकरच त्यांनीं आग विझवून बंदोबस्त केला, यामुळें संदूक तेवढी बचावली. नंतर सातारकर महाराजांकडून हिला तांब्याच्या पट्ट्या बसवून व खिडकीची दुरुस्ती करून मिळाली होती. असो. वर सांगितलेल्या खोलीप्रमाणेंच वरील सज्जाच्या दक्षिणेस एक हस्तिदंती दरवाजा लागतो त्यांतून आंत शिरलें असतां एक २३+१९ फुटांची खोली लागते. ही खोली सर्वत्र सोनेरी रंगानें मंडित केली असून त्यांत मधून मधून दुसऱ्या रंगाचीही झांक दाखविली आहे. हिच्या भिंतीवर जीं कुंड्यांतून सुबकशीं फुलझाडें काढिलीं आहेत व इतर कारागिरी लढविली आहे तिची आम्हीच वाखाणणी करीत आहों असें नाहीं; हल्लीं इंग्रज बहादरांच्या राज्यांत जे चितारी उत्पन्न झाले आहेत व दरवर्षी भसाभस होत आहेत, त्यांस देखील मान खालीं घालण्यावांचून इलाज नाहीं. हिला पूर्वेच्या बाजूस एक कमानदार जाळी आहे, तींत तांबड्या निळ्या कांचा बसविल्या



आहेत. ह्यावरून कांच ही पूर्वीपासून आमच्या देशांत असावी असें दिसतें. सदर खोलीला लागून दुसरी एवढीच एक खोली आहे, हिला अस्मानी रंग दिलेला असून त्यांत किंचित् सोनेरी रंगाचीही झांक मारिते. ह्या दोन्ही खोल्यांच्या रंगाचें व सज्जाच्या सोनेरी मुलाम्याचें हीं दोन्हीं कामें सुलतान महंमद यानें इ० स० १६३६ या वर्षी करविलीं. यांस जरी आज इतके दिवस झाले आहेत तरी रंगाच्या सौन्दर्यांत मात्र लेशभरही कमीपणा आलेला दिसत नाहीं. ह्या खोल्यांतून चिनी अत्तरदाण्यागुलाबदाण्या, पिराचीं तांब्याचीं भांडीं व फकिरांच्या तुळशीच्या गलेलठ्ठ मण्यांच्या माळा वगैरे पूर्वीचें सामान भरून ठेविलें आहे. शिवाय त्यांत एक मखमाली चांदवा अजून जीव धरून आहे, तो इतका तेजःपुंज व मजेदार आहे कीं, हल्लींच्या उंची व कोऱ्या मखमाली त्यापुढें रद्द आहेत.

हल्लीं ह्या महालाकरितां तिगडबिदरगीच्या जाहागीरदारांस सरकारांतून ७०० रुपयांची नेमणूक आहे, व त्यांनीं इमारतीची सफाई ठेवण्यास नोकर ठेविले आहेत. वरील मजल्यास नेहमीं कुलूप असतें, ह्यामुळें नवख्या पहाणारास तो भाग पहाण्याकरितां ह्या नोकरांची युक्तीनें मनधरणीच करावी लागते तथापि पहाणारांचें अजून एवढें नशीब समजावयाचें कीं ह्या इमारतीची फारशी पडापड झालेली नाहीं. मात्र तळमजल्यांतील चुनेगच्ची जमीन व लांकडी सामान व मजल्या पुढील सज्जाच्या खरडून टाकलेल्या भिंती हीं अगदीं विद्रूप होऊन गेलीं आहेत, आणि दक्षिणेकडील दरवाजा व त्यावरील सज्जा ह्यांचें लांकडी सामान विजापूर बादशाहीच्या अलीकडील राजकर्त्यांनीं लांबविल्यामुळें तेवढी काय ती पडापड झालेली आहे.

## ताजबावडी.

राजाश्रयस्तस्करताश्वपण्यम् ।
आथर्वणं चापि समुद्रयानम् ।
एतानि सिद्ध्यंति महाफलानि ।
विपर्यये प्राणहराणि पंच । *

ही प्रसिद्ध विहीर शहराच्या नैर्ऋत्य कोनास आहे. हिच्या विषयीं पुरातन माहिती येणेंप्रमाणें आहे:—

सुलतान महंमद आदिलशाह गादीवर असतां त्याजवळ कोणी एका सौदागरानें सिंहलद्वीपांतील रंभावती नामक एका अतिलावण्यवती स्त्रीविषयीं फारच तारीफ केली. त्याचे सांगण्यांतील सारांश कीं,-पंधरा सोळा वर्षांचें जिचें वय, पिकलेल्या लिंबाप्रमाणें जिची कांति, ठेंगणी असून शरीराचा बांधा गोंडस, जिची कटी इतकी बारीक कीं ती पाहून सिंहिणीनें देखील खालीं मान घालावी, नेत्र भ्यालेल्या मृगाप्रमाणें चंचल, भोंवया काळ्या भोर असून इतक्या कमानदार दिसतात कीं हीं प्रत्यक्ष धनुष्येंच आहेत कीं काय असा भास व्हावा. मग त्यांपासून नेत्रकटाक्षरूप जे तीव्र बाण ते तरुणाचें हृदय भेदल्याशिवाय तरी कसे राहतील ? जिचें कपाळ ह्मणजे शुभ्र

* राजाश्रय, चोरी करणें, घोड्यांचा व्यापार करणें, तसेंच अथर्वण वेद (धनुर्वेद), समुद्रावरून देशांतराचा व्यापार करणें, ह्या गोष्टी जर चांगल्या प्रकारें सिद्धीस गेल्या तर उत्तम फलप्रद होतात आणि तीच जर का उलट सिद्धी झाली तर त्या पंचप्राण हरण करणाऱ्या असतात.

१ प्रथम भागांत व बोळ घुमजाचे वर्णनांत जिचा उल्लेख केला आहे तीच ही होय.



आकाशच विस्तारलें आहे कीं काय व जिचा केशकलाप ह्मणजे कोणी कृष्ण सर्प तिचे मस्तकास चिकटला आहे कीं काय असें वाटतें. सूर्याच्या प्रकाशानें जशा कमलिनी प्रफुल्लित होतात त्याप्रमाणें जिचें मुखकमल हें सदां प्रफुल्लित ! अहाहा ! त्या मुखास तिचें चांफेकळीसारखें सरळ नाक तरी कसें साजतें ! आणि नाकास पोपटाचे चंचूपुढें ठेविलेल्या पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें तिचा तो आरक्त अधरोष्ठ तरी कसा शोभतो ! ती विडा खाऊन, रत्नालंकार लेवून जरतारीचें पातळ नेसून शुभ्र रुमाल हातीं घेऊन जेव्हां आपले अंगावरील पदर वारंवार सांवरीत झमकत् झमकत् इकडून तिकडे फिरते तेव्हां जशी विद्युल्लताच चमकते आहे कीं काय असा भास व्हावा ! हे पृथ्वीपते, अशी सौन्दर्यसरिता आपणासच साजे ! तेव्हां हें सौदागराचें बोलणें ऐकून बादशहाचें मन फार चंचल झालें व ती स्त्री आपणास कशी प्राप्त होईल असा त्याला ध्यास लागून गेला; आणि कांहीं दिवस पर्यंत ही गोष्ट कोणाजवळ प्रगट केली नाहीं. परंतु शेवटीं ह्मण आहेना, कीं 'दुःख आहे तें वेशीला बांधिलें पाहिजे.' याप्रमाणें त्याचा विचार होऊन त्यानें हा मजकूर आपला विश्वासू वजीर ताजखान यास सांगून पुष्कळ द्रव्य व लोक त्याच्या बरोबर देऊन या नाजूक पण महत्वाच्या कामगिरीवर त्यास पाठविलें.

१ वरील स्थिति वाचून आमच्या वाचकांस नलोपाख्यानांतील नल राजाच्या खालील प्रमाणें स्थितीची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं.

असें बोलति ते चार समाचारा ॥
करी दमयंती नळ मनीं विहारा ॥
नोवरी ते मज होय कशी दारा ॥
करूं लागे नळ भूप या विचारा ॥

हा वजीर फार धूर्त व राजनिष्ठ होता; ह्यामुळें त्यास जाते वेळीं असा विचार पडला कीं, कदाचित् माझी कामगिरी सफल झाल्यास बादशाहाची मर्जी सुप्रसन्न होईल व तसें झालें असतां अर्थात दरबारांतील कित्येक परोत्कर्षासहिष्णु मुत्सद्यांस सहन होणार नाहीं, व ते मजवर ह्या नाजूक कामाची आळ घालण्यासही मागें पुढें पहाणार नाहींत, ह्याकरितां त्यानें एका डब्यांत कांहीं गुप्त जिन्नस ह्मणून ठेवून व त्यावर आपली मोहोर करून तो बादशाहाचे हवालीं केला आणि मी येईपर्यंत हा डबा फार जपून ठेवावा असें सांगितलें. त्यावरून बादशाहानें तो डबा आपल्या खाजगी खजिन्यांत नेऊन ठेवून ताजखानास निगेप दिला.

नंतर कांहीं दिवसांनीं हा वजीर सिंव्हलद्वीपास येऊन पोंचला व लवकरच आपल्या चातुर्याच्या बळानें त्या रंभावती पद्मिनीस घेऊन सुरक्षितपणें विजापुरास बादशाहाच्या कदमापाशीं येऊन दाखल झाला. तेव्हां सौदागरानें वर्णन केलें होतें त्यापेक्षांही शतपटीनें तिचें सौंदर्य पाहून बादशाह अगदीं मोहून गेला. कां बरें मोहून जाणार नाहीं? अगोदरच ती स्त्रीजात त्यांत तिचें मूळचेंच अनुपम सौंदर्य असून तशांत 'प्राप्ते षोडश वर्षेतु × × × अप्सरा भवेत' अशा स्थितींत ती! शिवाय तिचें कंठमाधुर्य, तिचें गायनकलेमध्यें प्राविण्य, तिचें रसाळ व चतुर भाषण व त्यांत तिची मन आकर्षण करण्याची उत्तम शैली! तेव्हां अर्थात् इतके मोहक गुण ज्या स्त्रीचे ठायीं एक समयावच्छेदेंकरून वास करीत होते तिला पाहून प्रति शुक्राचार्यांची देखील गाळण होऊन जावयाची! मग हा तर रंगेल बादशाहाच! बादशाहानें तिजप्रीत्यर्थ आनंदातिशयांत अतोनात संपत्ति उडविली व तिच्या नांवानें रंभापुर ह्मणून एक गांव देखील वसविला. मुसलमान लोकांत एक ह्मण आहे 'दर्याकू



आग लगी तो बुजाना मुष्कील है, और तीर कू तीर लगे तो छुडाना मुष्कील हैं. तद्वत् त्याचे कामरूपी शर त्या शुभांगीच्या ठिकाणीं अगदीं खिळून गेले. ताजखानासही त्यानें अपार द्रव्य दिलें व त्यास केवळ नाकांतला बाल बनवून ठेविला.

इकडे ताजखानानें पूर्वी भविष्य करून ठेविल्याप्रमाणें त्याचा उत्कर्ष पाहून इतर मानकऱ्यांच्या पोटांत दुखूं लागलें व त्यांनीं मोठ्या खुबीनें बादशाहाच्या मनांत भरवून दिलें कीं,–खुदावंत पहा कीं रंभावती आपल्या घरांत आल्या दिवसापासून आपण राज्याचा सर्व भार ताजखानावर टाकून नेहमीं अंतःपुरांत गर्क असतां परंतु आह्मांस असें वाटतें कीं, आपणासारख्या पृथ्वीपतींनीं निर्माल्यास इतकें लुब्ध होऊं नये! हें ऐकतांच बादशाह चकित होऊन ह्मणाला, काय? निर्माल्य? निर्माल्य याचा अर्थ तरी काय? तेव्हां मानकरी ह्मणाले, महाराज, ज्या वस्तूचा एकवार उपयोग झाला तीच पुनः किती वेळांही उपयोगांत आणली तरी ती निर्माल्यवत्च!! आणि अशा निर्माल्यास ज्याअर्थी आपण भुलून राहिलां आहां त्याअर्थी नगरांतले लोक आपली फार निंदा करितात व वस्तुतः हें त्यांचें ह्मणणेंही निर्विवाद आहे. कारण ती स्त्री जर एकादे नपुंसकानें पाहिली तर त्यास देखील पुरुषत्व येऊन तो कामातुर होईल, मग इतरांची काय कथा? हीं मर्मभेदक वाक्यें कानीं पडतांच बादशाह अगदीं संतप्त होऊन गेला, व त्यानें कांहीं विचार न करितां ताजखानास फांशी देण्याविषयीं एकदम हुकूम फर्माविला. उघडच आहे, तेथें कांहीं हायकोर्टाच्या मंजुरीची वाट पहावयास नको, किंवा पिनलकोडचें कलम लावण्याकरितां व्हाल्यूमचे व्हाल्यूम चाळावयास नकोत! प्रत्यक्ष मोंगलाईच ती! हम करे सो कायदा! मग काय बादशाहाच्या हुकुमाप्रमाणें लागलींच ताजखानाच्या हातींपायीं बिडी पडून

शिपाई लोक त्यास फांसावर नेऊं लागले, व आतां लवकरच फांसावरही चढविणार, इतक्यांत ताजखानानें त्या शिपाई लोकांची विनवणी करून बादशहास निरोप पाठविला कीं, 'आपण मला फांशी देत आहां तर मी नाखुषी नाहीं, परंतु आपले 'आदिलशाही' या नांवास हा केवळ कलंक आहे. तरी याचा शांतवृत्तीनें विचार करून मी आपणास पूर्वी जतन करून दिलेला डबा आणून पाहिला असतां आपली बालंबाल खात्री होणार आहे.'

याप्रमाणें निरोप पोहोंचतांच बादशहानें फांशीची कांहीं वेळ तहकुबी करवून तो डबा आणवून पाहिला तों त्यांत वजिराचें जननेंद्रिय! तें पहातांक्षणींच सुलतान महंमद यास फारच आश्चर्य वाटलें व परांकाष्ठेचा खेद झाला; व आज आपण त्या बिचाऱ्याचा नाहक बळी घेत होतों असें वाटून त्यास गहिंवर आला. मग ते क्षणींच ताजखानाची फांशीची शिक्षा फिरवून त्यास त्याच्या स्वामिभक्तिपरायणतेबद्दल बहुमूल्य नजराणे देऊन त्यास बहुमानानें 'मलिक संदल' हा नवीन किताब दिला; आणि ताजखानाची क्षमा मागून तुला काय पाहिजे तें माग असें बादशहानें सांगितलें. तेव्हां या दासाचें नांव जेणेंकरून जगांत राहील व ज्यांपासून लोकांस नेहमीं उपयोग घडेल अशा दोन विहिरी विजापुरांत असाव्या अशी ताजखानानें प्रार्थना केली. त्यावरून ही वर्णनयोग्य ताजबावडी व दुसरी संदल[1] बावडी अशा दोन विहिरी विजापुरांत बांधिल्या गेल्या आहेत. ह्याशिवाय ताजखानानें तिकोट्यास[2] सराई (धर्मशाळा) व महाल बांधिला आहे तोही प्रसिद्ध आहे.

१. ही विहीर साधारणांत असल्यामुळें आह्मी तिचें निराळें वर्णन दिलें नाहीं.

२. हा गांव विजापुरापासून पश्चिमेस १२ मैलांवर आहे.



कित्येक लोक असें सांगतात कीं, ही विहीर बडाअली आदिलशाह[1] ह्यानें आपल्या कारकीर्दीत इ. स. १५५७ ह्या वर्षी आपल्या 'ताजबिबी' नामक राणीचें नांव रहावें या हेतूनें बांधिली असून त्यावरून हिला ताजबावडी हें नांव प्राप्त झालें आहे. दुसरे कित्येक जे शब्दव्युत्पत्तींतच निष्णात आणि कल्पनापटु लोक आहेत त्यांची व्युत्पत्ति व कल्पना अशी आहे कीं, ही विहीर बांधीत असतां मातीचें टोपलें खालून वर येण्यास तास लागत होता! इतकी ही खोल आहे ह्मणून हिला 'तास' बावडी व त्यावरून अपभ्रष्ट 'ताज' बावडी असें नांव पडलें आहे. परंतु ह्या दोहों ह्मणण्यांपैकीं एकावर भरंसा ठेवण्यास आधार मिळत नाहीं.

असो. ह्याप्रमाणें ह्या विहिरीच्या नामाभिधानासंबंधानें हकीकत झाली. आतां हिच्या सद्यःस्थितीच्या वर्णनाकडे वळूं.

ही विहीर ह्मणजे एक विहिरीश्वर अथवा तलावच ह्मटला पाहिजे! कारण हिचें नांव बारीक पण आकृति मोठी आहे! हिची लांबी मोजण्यास आमच्या बरोबर टेप होती ह्मणूनच बरें झालें, नाहीं तर हिची २२२ फूट लांबी व २२२ फूट रुंदी एकाद्यानें फुटाची काडी घेऊन मोजूं लागल्यास त्याला हे सक्त श्रमच आहेत! आह्मांस असें वाटतें कीं, साधारण पोहणारा असल्यास त्याला या कडेहून त्या कडेस जाण्यास खचीत दम लागेल व एकाद्यानें या कांठावर उभें राहून त्या कांठावरील मनुष्यास हांक मारिली असतां बहुधा ऐकूं जाणार नाहीं! अशा प्रचंड विहिरीस सभोंवार तासलेल्या दगडांची जंगी भिंत आहे ह्मणून एक ठीक आहे! ह्या भिंतीवरच उत्तर बाजूशिवाय इतर तीन दिशांस मोटा काढण्याच्या जागा आहेत. उत्तर बाजूकडे अशी जागा नसण्याचें कारण त्या बाजूच्या विहिरींत शिरण्याकरितां मध्यावर एक ३६ फूट रुंदीची अफाट कमान आणि तिचे दोहीं

१—

बाजूस लागून दोन सुंदर मनोरे आणि त्या प्रत्येकाचे पलीकडे एकएक साधारण इमारत इतक्यांचा समावेश त्या एका २२२ फूट रेषेच्या जागेंत झाला आहे. सांप्रत त्यांपैकीं एका इमारतीचे माडींत सरकारी मराठी नंबर एकची शाळा व दुसरींत म्युनिसिपाल कमेटीचें छोटें आफिस हीं आहेत; आणि कमानीसमोरील पटांगणांत रविवारचा बाजार भरत असतो व त्यावेळीं भोंवतालच्या खेड्यापाड्यांतील पुष्कळ लोक येतात.

असो. वर सांगितलेल्या कमानींतून थोडें आंत गेल्यावर एक साधारण उंचवटासा लागतो; त्याचे दोहों बाजूंनीं विहिरींत उतरण्यास पायऱ्या केल्या आहेत ह्या पायऱ्या पाण्याच्या तळापर्यंत गेल्या असाव्या व अर्थातच हा उंचवटाही पाण्याच्या तळापासून बांधून काढलेला असावा. यावरून एवढें पाहिल्यानेंच विहिरीच्या आंतील मौज पाहणें संपली असें कित्येकांस वाटेल; कारण आह्मी वाचकांस पायऱ्यांवरून पाण्यापर्यंत नेलें तेव्हां आतां काय राहिलें ह्मणून ते निराशही होतील. पण पूर्वीचे मुसलमान बादशाह महा शोकी होते; त्यांनीं विहिरीच्या आंतल्या बाजूनें सभोंवार फिरण्याची व मध्यें मध्यें तेवढ्यांतच विश्रांती घेण्याची हौस केली आहे. सदरच्या उंचवट्यावरून थोडें परत यावें ह्मणजे उजवे बाजूस व एक डावे बाजूस असे दोहोंकडे दोन मार्ग दिसतात. ह्या मार्गांतून आंत गेलें ह्मणजे विहिरीच्या आंतल्या बाजूनें (सुमारें विहिरीभोंवतालच्या जमिनीच्या पातळीबरोबर) कंगोऱ्याप्रमाणें परंतु बऱ्याच रुंदीचे खासे सज्जे विहिरींत पुढें आलेले आहेत; त्यांवरून विहिरीं भोंवताली पण विहिरीच्या पाण्यावर हवातस धुमाकुळ घालावा. शिवाय ह्या सज्जांतुन मध्यें मध्यें वर ज्या पूर्व, पश्चिम व दक्षिण या दिशांस मोटांच्या जागा सांगितल्या त्यांच्याबरोबर खालीं (लंबरेषेंत) अशीं तीन सुंदर विश्रांतिस्थळें (विहिरींतले



बंगले) केलीं आहेत. कदाचित् कोणास मध्येंच भूकबिक लागल्यास ह्या बंगल्यांत बसून यथेच्छ फळाहार करावा आणि नंतर ह्या बंगल्यास विहिरीच्या मुख्य भिंतींतून ठिकठिकाणीं पाण्यापर्यंत जाण्याच्या ज्या पायऱ्या केल्या आहेत त्यांनीं जाऊन प्राशन करावें व हुदशहुदश करीत वर यावें. ह्या पायऱ्या देखील पाण्याच्या तळापर्यंत असतील! कारण आह्मी खोलच खोल कितीं गेलों तरी पत्ता लागला नाहीं. एकंदरींत ही विहीर ह्मणजे एक रमणीय स्थलच आहे.

---

## चंदाबावडी.

ही विहीर शापूर पेठेंत जाणाऱ्या रस्त्यावर आहे. ही बांधण्यास अली आदिलशाह पहिला यानें इ० स० १५५७ सालीं सुरुवात केली होती. पुढें हिचें काम पुरें होतें न होतें तों इ० स० १५६५ या वर्षी अहंमदनगरच्या बादशाहाची कन्या इतिहासप्रसिद्ध जी चांदबिबी हिच्याशीं त्याचें लग्न लागल्यामुळें तिचें नांव जगांत राहाण्याकरितां अनायासें त्यानें सदरच्या विहिरीस चांदबावडी असें नांव दिलें. पुढें उत्तरोत्तर ह्या नांवाचा अपभ्रंश होऊन तिला लोक 'चंदाबावडी' असें ह्मणूं लागले.

ही विहीर ताजबावडीपेक्षां बरीच लहान तथापि १४६ फूट लांब व १३६ फूट रुंद एवढी आहेच. ह्या विहिरीची बहुतेक बांधणी ताजबावडीप्रमाणेंच आहे असें ह्मटलें असतां चालेल. ताजबावडी भोंवती जशी तासलेल्या दगडांची भिंत आहे, तशीच हिच्या भोंवतीही आहे. मात्र ती विहीर उत्तराभिमुख असल्यामुळें तिला उत्तर बाजूचा मार्ग आणि इतर बाजूंवर मोटांचीं स्थानें आहेत व ही पूर्वाभिमुख असल्यामुळें हिला पूर्वेकडचा मार्ग आणि इतर बाजूंवर मोटांचीं स्थानें

आहेत. ताजबावडींत शिरतांना कमान लागते त्याचेऐवजीं हिला प्रत्यक्ष दरवाजाच आहे. ह्यांतून पुढें गेल्यावर तीप्रमाणेंच पाण्यापर्यंत जाण्यास पायऱ्या लागतात. ज्यास्त इतकेंच कीं, पायऱ्यांच्या शेवटीं पाण्याच्या सपाटीबरोबर हिला एक ३२ फूट रुंदीची भव्य कमान आहे व पायऱ्या उतरण्याच्या अगोदर डावे बाजूनें फक्त एक दरवाजा लागतो त्यांतून आंतील सज्जांवर जाण्याचा रस्ता आहे. ताजबावडीवर जसें आंतले बाजूनें फिरतां येतें व विश्रांति घेण्यास रम्यस्थळें वगैरे आहेत तशींच हिलाही आहेत. हिच्या उत्तरेकडील विश्रांतिस्थळांत हल्लीं तालीमखाना आहे.

ही विहीर पावसाळे दिवसांत अगदीं तुडुंब भरून येते, व त्या वेळीं अर्थात् पाण्याजवळची कमान तर दिसतच नाहीं; तथापि आंत उतरण्यास लागणाऱ्याही बहुतेक पायऱ्या बुडून जातात. खरखरींत उन्हाळ्यांत हिचें पाणी सुमारें १५ फूट खालीं जातें व साधारण ऋतूंत हींत सुमारें २४ फूट पाणी असतें असा आह्मी अदमास काढिला आहे; ह्मणून ही चोवीस फूटच खोल आहे असें नाहीं. हींत फार दिवसांचा गाळ सांचलेला असल्यामुळें व ही बहुतेक शेवाळमय इतकेंच नाहीं, शेवालवृक्षमय असल्यामुळें हिची पक्की खोली काढण्यास मार्गच नाहीं. वर जी आह्मी पाण्याची २४ फूट खोली दिली आहे तेथपर्यंत बहुधा निवळ पाणी असावें इतकेंच. आणखी दुसरें असें कीं आज त्या विहीरीचा अडीचशें तीनशें वर्षांत कोठें फारसा उपसा झाला आहे ? तो काळ गेला ! ती वेळ गेली ! ! व ते शौकीही गेले ! ! !

ह्या विहीरीच्या आसपास लोकवस्ती बरीच आहे, ह्यामुळें बहुतेक लोक हिचेंच पाणी पितात. आणि लवकरच विजापूर हें जिल्ह्याचें सदर स्टेशन होणार आहे त्याअर्थी नवीन ज्यास्त



वस्तीच्या सबबीनें हिची बहुधा सोय लागेल असा अजमास आहे !

---

## हैदरबुरुज
### ऊर्फ
### उप्पर बुरुज अथवा उपली बुरुज.

हा बुरुज ह्मणजे शहराच्या तटाचा किंवा आर किल्ल्याच्या तटाचा एखादा बुरुज नसून केवळ एक बुरुजच आहे; असा शहरच्या पश्चिमेस तटानजीक आंतले बाजूस आहे. त्याच्या उत्तरेस शाहापूर पेठेकडे जाणारा रस्ता, पूर्वेस आर किल्ल्याकडे जाणारा रस्ता, व दक्षिणेस मुसलमानांच्या इदगीची इमारत आणि नैऋत्येस मुल्क मैदान तोफेचा बुरुज ह्याप्रमाणें ह्याच्या दिशा आहेत. हा बुरुज इब्राहिम आदिलशाह दुसरा ह्यानें आपल्या हैदरखान नामक वजीराचे देखरेखी खालीं इ० स० १५८० या वर्षी बांधिला; व ह्मणूनच ह्याचें वास्तविक नांव 'हैदरबुरुज' असें आहे. हल्लीं विजापुरांतील कित्येक लोक ह्यास उप्पर बुरुज असें ह्मणतात व कित्येक लोक उपलीबुरुज असेंही ह्मणतात. पहिल्या लोकांचें ह्मणणें कांहीं समंजस व सार्थ दिसतें. कारण त्यांचें ह्मणणें ह्या बुरुजास पाया नसून हा केवळ एका सक्त उंचवट्यावर बांधिला आहे त्याअर्थी ह्यास उप्पर ह्मणजे जमिनीच्या वरपासूनच असणारा अर्थात उप्पर बुरुज असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु दुसऱ्या कांहीं लोकांचें ह्मणणें—कोणी एका ह्यातारीनें उपल्या (गवऱ्या) विकून त्यांच्या कमाईवर आपलें नांव राहण्याकरितां हा बुरुज बांधिला ह्मणून ह्यास आह्मी 'उपली बुरुज' ह्मणतों, हें निवळ वेडगळपणाचें दिसतें. कारण अशा प्रकारचा अलग बुरुज फक्त विजापु-

रांतच आहे असें नाहीं; कर्नाटकांतील खेड्यापाड्यांतूनही अशा प्रकारचे ठिकठिकाणीं बुरूज (उंच स्थळें) आढळून येतात. पूर्वीचे दिवस दंग्याधोप्याचे असत यामुळें त्यावेळीं टेहेळणी करण्याकरितां अशा उंच स्थळांची आवश्यकताच होती; आणि त्याप्रमाणेंच प्रस्तुतच्या बुरुजाची उंची ६९८ फूटच आहे, तरी तो उंचवट्यावर असल्यामुळें बिजापूर शहराच्या तटास असणाऱ्या १२० बुरुजांहूनही तो अधिक उंच आहे; व येथून भोंवतालीं दूरवरचा देखावा दृष्टीस पडतो.

असो. ह्या बुरुजास वर जाण्याकरितां ह्याचे दक्षिण अंगास एक पायऱ्यांचा मार्ग आहे. हा मार्ग (जिना) ९ फूट रुंदीचा चांगला ऐसपैस असून तो बुरुजास वेटाळत जाऊन पूर्वेच्या बाजूला संपतो. ह्याला एकंदर ७० पायऱ्या आहेत व तेवढ्या चढतां चढतां मांड्यांत गोळे भरून येतात. माथ्यावर गेल्या-वर तेथें दोन विशाळ तोफा आहेत. दक्षिणेच्या बाजूची तोफ ३३० फूट लांब असून तिचा परीघ ७ फूट आहे, व तोंडाच्या पो-कळीचा व्यास १४ इंचांचा आहे. उत्तरेच्या बाजूची तोफ हिच्या पेक्षां बरीच लहान तरी २० फूट लांब असून तिचा परीघ ४ फूट आणि तोंडाच्या पोकळीचा व्यास १० इंचांचा आहे. ह्या दोन्हींही तोफा तोंडदार घाटाच्या आहेत.

ह्या बुरुजाच्या बांधण्यांत असें एक चमत्कारिक प्रमाण आहे कीं ह्याची उंची व व्यास हीं दोन्हीं सारखीं इतकेंच नाहीं, पण तंतोतंत आहेत. मग यांत काय हेतु असेल तो ईश्वर जाणें! ह्या व्यासावरून ह्याचा परीघ म्हणजे वाटोळी एकंदर जागा सुमारें २१३ फुटांवर असावी हें वाचकांच्या लक्षांत येईलच. ह्या एवढ्या अफाट बुरुजावर मोकळेपणीं हिंडावें तों एकसारखा धोंधो वारा वाहत असतो त्यामुळें अंगावरील वस्त्रांचा खडखड



खडखड आवाज होतो, आणि येथून चोहोंकडे नजर फेंकली असतां जिकडे तिकडे घरें दारें पडलेलीं, निवडुंग माजलेले वगैरे भयानक देखावा दिसतो; आणि विजापूर बादशाहींतील ठिकाणांची अशी उदासीन व रडकी स्थिति पाहून मनास खेद वाटतो!

---

## मुल्क मैदान. (मलिक ये मैदान)

### किंवा

## महाकाली तोफ.

ही नामांकित तोफ कान्स्टांटिनोपलच्या 'हुसेनखान' नांवाच्या कोणी कारागिरानें अहंमदनगर येथें इ० स० १५४९ या वर्षी ओतवून दिली होती व हिचा सांचाही अद्यापि नगरास आहे असें ह्मणतात. पुढें ही परंड्याच्या किल्ल्यावर होती तेथून विजा-

१ ह्या तोफेचें वास्तविक नांव मलिक ये मैदान (रणभूमीची राणी) असें आहे, परंतु विजापुरांतील कित्येक लोक हीस मुल्कमैदान (रण-भूमींतील सिंह) असें ह्मणतात, व औरंगजेबानें लिहिलेल्या लेखांतही मुल्कमैदान असेंच आहे; आणि कित्येक भाविक व हिंदुलोक तर हिला महाकाली किंवा महांकाळी असेंही ह्मणतात; व भक्तीनें तिची पू-जाअर्चा व नवसनैवेद्यही करितात.—एकंदरींत हिंदु लोकांचा भाव फार विलक्षण आहे. मुंबईत लार्ड कार्नवालिस नामक गव्हर्नर जनर-ल साहेबांच्या पुतळ्यास व जनरल वेलस्लीच्या पुतळ्यास देखील त्यांनीं भजण्यास कमी केलें नाहीं! प्रथम ज्या वेळीं हा पुतळ्यांची स्थापना झाली त्या वेळीं कंपनी सरकारानें आम्हांस सदय होऊन हे विलायती देव दिले ह्मणून कित्येकांनीं आभार मानले!! परंतु हें खूळ सरकारांनीं लवकरच मोडून टाकिलें ह्मणून बरें झालें!!!

पूरचा सातवा बादशाहा सुलतान महंमद याचे कारकीर्दींत त्याचा मुख्य प्रधान मुरार पंडित हा (मुल्क मैदान) व अशीच दुसरी एक कडक बिजली अशा दोन तोफा परेंड्याहून[1] वेड्यावांकड्या मार्गानें आणीत असतां मार्गांत अत्यंत जड असल्यामुळें कडक बिजली कृष्णानदींत बुडाली[2], तेव्हां ती तशीच टाकून ही फक्त मुल्क मैदान मात्र घेऊन आला व तेव्हांपासून ती बरींच वर्षेंपर्यंत शहराच्या पश्चिमेच्या तटांपैकीं सरजें नामक बुरुजावर होती. नंतर सुलतान शिकंदरचे कारकीर्दींत औरंगजेबानें जेव्हां विजापूर बादशाहीचा शेवट लाविला त्यावेळीं त्यानें ही तोफ हल्लीं त्याच बुरुजास लागून असलेल्या आंतील बाजूचे सखल बुरुजावर आणून ठेविली आहे ती अजून जशीच्या तशीच तेथें आहे[3].

ही तोफ फार विशाळ आहे. हिचें वजन कित्येकांच्या मतें ३९,००० रतल[4] व कित्येकांच्या मतें ६० खंडी आहे. लांबी १४ फूट असून परीघही बरोबर तितकाच आहे; आणि तोंडाच्या

१ परंडा हा गांव मोंगलाईतील नळदुर्ग जिल्ह्यांत बार्शीरोड स्टेशनापासून ५१६ कोसांवर आहे.

२ ही तोफ जेथें बुडाली तेथें ती पाण्यावर दिसते व तिची भाविक लोक पूजाअर्चा करितात असें कित्येक लोकांच्या सांगण्यांत आहे.

३ अशीच एक महाकाळी (पण छोटीशी) तोफ भोरकर सचिवांचे येथें किल्ल्यावर आहे व तिच्याच प्रसादानें आपणांस सांप्रतचें राज्य मिळालें; तेव्हां ही आपली पायगुणाची आदिमाताच समजून तिचें देव्हारें त्यांच्या पदरीं चालू असून तत्प्रीत्यर्थ नंदादीप, अनुष्ठान वगैरे खर्चही संस्थानांतून मिळतो असें ऐकतों.

४ मुंबईचा २८ रतलांचा मण धरिला असतां ५९ खंडी २० मण होतात.

५ घाशीराम कोतवाल पृष्ठ १६९ ह्यांत दिलेलें माप अगदीं खोटें आ-

(पुढें चालू.)



पोकळीचा व्यास दोन फूट चार इंच असून जाडी बरोबर १ फूट आहे[5]. हिला ज्या दोन बाजूंनीं दोन नल्या भक्कम कड्या आहेत त्याही अशाच सव्वातीन इंच जाडीच्या व एक फूट व्यासाच्या पोकळीच्या आहेत. हिच्या तोंडाचा आकार सिंहाच्या जबड्याचा आहे व त्यानें तोंडांत हत्ती धरले आहेत असें दाखविलें आहे. ह्या सिंहाच्या डोक्यावर "औरंगजेब बादशाहानें ज्या वेळीं विजापूर हस्तगत केलें त्यावेळीं आपल्या जयप्राप्तीचा खालील प्रमाणें फार्शींत लेख लिहून (कोरून) ठेविला आहे.

शहिआलमगीरगाजीबादशाहेदीपनाह
फतूहचिजापुरकर्दचहरेतारिखेजफूर
आकेदादोअदलदादमुल्कशहांगिरफ्तू
रूनमूदएकचाळगुफूतामुल्कमैदानगिरफ्तू

अर्थः—जो आलमगीर (औरंगजेब) बादशाह बहादूर धर्मसंरक्षक, त्यानें सन तारीख हिजरी १०९७ मध्यें विजापूर फत्ते केलें; व इन्साफीनें बादशाहाचा मुलुख घेऊन आपल्या दैवानें प्रसिद्ध मुल्क मैदान तोफ काबीज केली.

असो. ह्या तोफेजवळ गेलें असतां तिचें तें अक्राळविक्राळ व अगडबंब स्वरूप पाहूनच छाती दडपून जाते व काय हें आमच्या आर्यभूमींतील लोकांचें साहस असें वाटतें! मग ही गंगाभागिरथी बाई ज्या वेळीं सौभाग्यव-

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

हे. तसेंच मुंबईचें पुस्तक (Book of Bombay) पृष्ठ ४३९ यांत दिलेल्या मापांतही तीन इंचांचा फरक पडतो. मात्र ग्रान्ट डफ साहेबांचा इतिहास व्हाल्यूम पहिला पृष्ठ ८३ यांत दिलेलें व आमचें मेज तंतोतंत जुळतें.

ती असेल त्या वेळीं जर आह्मी पाहतों तर ठारच व्हावें लागतें ! ! तथापि ही सौभाग्यवती असतांनाही हिनें आपला पराक्रम एकदांच दाखविला होता व त्या वेळेपासून तिच्या कोणी वाटेस गेलें नाहीं असें सांगतात. कारण ही एकदां कोठें उडविली होती तेव्हां तिच्या हिसक्यानें शहरांतील कित्येक इमारती पडल्या—कित्येकांचे पाये डगमगले—कित्येक घोड्यावरून पडून कोणाचे हात मोडले, व कोणाचे पाय मोडले व स्त्रियांचेचसे काय, पण गायींह्मैशी इत्यादिकांचेंही गर्भपतन झालें. आणि ज्या गोलंदाजानें कान्याला बत्ती दिली त्यानें बत्ती दिल्याबरोबर हल्लीं या बुरुजाजवळ जी बुजविलेली विहीर दृष्टीस पडते त्या विहिरींत उडी घातली ; परंतु विहिरीचें पाणी खळबळून गेल्यामुळें बिचारा तोही प्राणास मुकला. सदरची विहीर याच कामाकरितां बांधिली असावी. एकंदरींत असली तोफ साऱ्या पृथ्वींत नसेल. हल्लीं इंग्रज बहादुरांच्या राज्यांत छोटेखानी तोफेस देखील 'गलेलट्ट' सहा घोडे व हांकण्याकरितां सहा गोलंदाज लागतात; पण जेव्हा ही तोफ परंडयाहून हैदोस घालीत विजापुरास आणिली असेल त्या वेळीं किती हत्ती, किती लोकसमूह व किती पैसा लागला असेल तो आणणारास

१ बुक आफ बांबे पुस्तकाच्या ४३९ व्या पृष्ठांत देखील खालील प्रमाणें लिहिलें आहे.

"The big gun Mailikel-Maidan surely was a Contribution to the science of war. Mons-Meg at Edinburgh Castle is nothing to it." ( Book of Bombay-Page 439 )

" लढाईच्या कामास मलेकम मैदान ही एक देणगीच आहे. एडिंबरो येथील किल्ल्यावर मॉन्स मेग म्हणून जी नामांकित तोफ आहे ती हिच्या पासंगास देखील पुरणार नाहीं. "



माहीत ! ह्या तिच्या विशाळपणावरूनच विजापूरच्या सैन्याविषयीं मुसलमान इतिहासकर्त्यांनीं जो लेख लिहिला आहे त्याचें प्रत्यंतर दिसून येतें.

ही तोफ कोणत्या धातूंच्या मिश्रणानें झाली आहे कोण जाणें ! पण हीवर ठोकलें असतां चांगला घण् घण् घंटानाद निघतो. पुष्कळ इंग्रज ग्रंथकारांसही हल्लीं ती ज्या जागेवर आहे तेथें पूर्वी ( यांत्रिक साधनें नसतांही ) नेऊन ठेविली असावी तरी कशी याचेंच प्रथम आश्चर्य वाटतें; मग हींत कोणकोणते धातु मिश्रित असावेत ह्याचा विचार करणें लांबच राहिला ! हल्लीं हिच्यावर लोकांनीं हात फिरवून फिरवून ही इतकी तकतकित झाली आहे कीं, तींत पाहिलें असतां स्पष्ट चेहेरा दिसतो.

असल्या विलक्षण तोफेविषयीं आजपर्यंतच्या बहुतेक राज्यकर्त्यांस अभिलाषबुद्धि उत्पन्न झाली होती. प्रथम इ० स० १६३४ ह्या वर्षी शाहाजाहान बादशाहानें २०,००० स्वारांनिशीं आपला एक सरदार पाठविला, परंतु विजापूरकरांनीं त्याचा मोड केल्यामुळें आल्या वाटेनें त्यास परत जावें लागलें ! नंतर औरंगजेबानें विजापूर पालथें करते वेळीं या कामीं भगीरथ प्रयत्न केले, परंतु ते फुकट गेले. तथापि त्या महत्वाकांक्षी गाजीनें तिच्यावर निदान आपलें नांव तरी खोदून ठेविलें आहे ! इंग्रजी राज्यकर्त्यांस तर सर्वसंग्रहालयाचा फार नाद आहेच ! इंग्लंडचा राजा चौथा वुइलिअम् ह्यानें ही तोफ इंग्लंडास पाठवावी ह्मणून मुंबई सरकारचे मार्फत इ० स० १८२३ या वर्षी हुशार इंजिनियर पाठविले होते. त्यांनीं ही बुरुजावरून खालीं उतरण्याचे कामीं जंग जंग पछाडले, परंतु सर्व प्रयत्न व्यर्थ ! ह्यामुळें इंग्रज सरकारानें तगी नाद सोडून दिला ;

नाहीं तर हिंदुस्थानांतील चमत्कारिक, जंगम वस्तु जेवढी ह्मणून
नेणें शक्य आहे तेवढी विलायतेस सर्वसंग्रहालयाची लाईफ
मेंबर होऊन बसली आहे त्याप्रमाणेंच हिला मानपत्र कधींच
आलें असतें ! यानंतर मात्र हल्लीं विजापुरास अग्निरथाची अ-
नुकूलता झाली आहे तेव्हां पुढें मागें ह्या बाईनें कंटाळून कोहि-
नूर हि॰याशीं आपलें देशबंधुत्वाचें नातें जोडण्याकरितां प्रयाण
केलें तर केलें !! परंतु प्रथम ही ज्या वेळीं सरजे बुरुजावर
होती तोंपर्यंत त्या बुरुजावर वाटोळें फिरविण्यास मोठ्या मनु-
ष्याचीही जरूर नव्हती; तीच आतां औरंगजेबानें खालच्या
बुरुजावर आणून खालीं दोहीं बाजूंस भली अगडबंब तुळवट
घालून त्यावर हिची स्थापना केल्यापासून ही फार मड्ड झाली
आहे !!!

---

## खुद्द विजापूर शहराभोंवतालचा तट.

एवढ्या माथळ्यावरूनच पूर्वीच्या मुसलमान लोकांचीं क-
शीं अचाट कृत्यें होतीं याची कल्पना वाचकांस होणार आहे.
हल्लीं ज्या कित्येकांनीं इंग्रजी राज्यांत राहून पुणें येथील पेश-
वेसरकारच्या शनवारच्या वाड्याचा तट पाहिला असेल त्यां-
नीं अशा प्रकारचे तट पाहिले असतां त्यांची खचीत छाती
दडपुन जाईल व पेशवे सरकाराबद्दलही जो त्यांस वृथाभिमान
असेल तोही नाहींसा होईल. परंतु अशा प्रकारचे कडेकोट बं-
दोबस्त असतांही त्याच विजापूरच्या शेवटच्या शिकंदर बाद-
शाहास औरंगजेबाच्या जाऊन स्वाधीन व्हावें लागलें तस्मात्
काळापुढें इलाज नाहीं !

---

१ हा हिरा महाराणी सरकारांस रणजितसिंगाचे चिरंजीव महाराज
धुलिपसिंग ह्यांनीं इ० स० १८६९ ह्या वर्षी दिला आहे.



असो; हा जंगी तट अल्ली आदिलशाह पहिला यानें इ. स. १५६३
सालीं बांधिला आहे. ह्याचा घेर ९ मैलांचा[१] असून त्यांत त्यास अ-
नुसरून एकंदर १२० [२] बुरुज व लहानमोठे असे ७७ दर-
[३]वाजे आहेत. तथापि एवढी अफाट रचना अल्ली आदिलशाहाचा
मुख्य वजीर किशवरखान यानें एकेका सर[४]दाराकडे एक एक
बुरुज याप्रमाणें वांटून देऊन अवघ्या अडीच वर्षांत आटपली
होती.

---

१ या तटाचा घेर ६ मैलांचा होता असें ग्रांट् डफ (त्यांचा इतिहास
पृ० २४५) व एल्फिन्स्टन (त्यांचा इतिहास पृ० ५७७) यांचें म्हण-
णें आहे. तथापि अस्सल विजापूरच्या इतिहासांत याचा घेर ९ मैलां-
चाच दिलेला आहे.—हल्लीं एखादा नवखा मनुष्य हें पुरातनचें शहर
पाहण्यास गेला असतां त्यास तेथील लोक ह्या कोटाचा घेर १६ को-
सांचा आहे असें कांहीं भलतेंच सांगतात; परंतु त्यांची निराळी कान-
उघाडी करावयास नको !

२ ह्यांपैकीं—बुर्ज अलीबाग, बुर्ज हिलालीबाग, सुंदर बुरुज, अहंम-
द बुरुज, शापूरदरवाजा बुरुज, शरजा बुरुज, लवे महंमद बुरुज व
गगन बुरुज हे प्रसिद्ध आहेत.

३ ह्यांपैकीं खालीं लिहिलेले सात दरवाजे फार मोठे आहेत.

[१] पादशापूर. [२] मक्का. [३] अल्लापूर. [४] बोमणी उर्फ
ब्राह्मणी. [५] शापूर. [६] सारवार दिंडी. [७] फत्ते दरवा-
जा. (ह्यास पूर्वी मंगरूळ म्हणत असत, परंतु औरंगजेब बा-
दशाहानें विजापूर काबीज केलें त्या वेळीं ह्यास फत्ते दरवाजा
हें नांव ठेवून त्यावर त्यानें फत्ते झाल्याची तारीख व सन
कोरिला आहे.)

४ ह्याची सत्यता प्रत्येक बुरुजावर प्रत्येक सरदारानें जे आपल्या
नांवाचे व सनाचे लेख लिहिले आहेत त्यांवरून दिसून येते. हे लेख

(पुढें चालू.)

पूर्वी (अर्थात आदिलशाही अमदानींत) ह्या बुरुजांवर तोफा ठेविलेल्या असत व गोलंदाजांस रहाण्याकरितां बुरुजांत ठिकाठिकाणीं खोल्या केल्या असत. ह्या तोफा आदिलशाही बुडाल्या दिवसापासून तों हा काळपर्यंत जे जे ह्मणून राज्यकर्ते झाले त्यांनीं लांबविल्या आहेत, असे सांगतात. हल्लीं सर्व विजापुरांत तोफा काय त्या येणेंप्रमाणें आहेतः—शहराच्या पश्चिमेस सरजे बुरुजावरील प्रसिद्ध मुल्क मैदान तोफ, मक्का दरवाजावरील तोफ, पूर्वेस अल्लापूर दरवाजावरील तोफ, दक्षिणेस लांडेखसाब निहामद बुरुजावरील तोफ, व शहरांत उपली बुरुजावरील दोन तोफा, शिवाय पब्लिक वर्क्सचे इंजिनियर यांच्या बंगल्यांत एक तोफ अशा सर्व मिळून काय त्या सात तोफा विजापुरांत आहेत.

ह्या बादशाही कोटासभोंवतीं खडक फोडून जो जंगी खंदक केला आहे त्यांत हल्लीं जीवंत पाणी कोठें कोठें आहे. कोटाच्या आंतील बाजूस कोठकोठें मोठमोठे खाडे खणले आहेत त्यांत अक्षयी विपूल पाणी असतें. ह्या प्रकारचा एक खाडा पूर्वेस फत्ते बुरुजाच्या पायथ्यापाशीं आहे. त्यांत असंख्य द्रव्य आहे, असें लोक सांगतात. हें कितपत खरें असेल याची कल्पना आमच्या बहुश्रुत वाचकांना होईलच. हल्लीं खंदकांचा बहुतेक भाग छिन्नविच्छिन्न होऊन गेला आहे व त्याचप्रमाणें

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

फार्शी व आरबी भाषेंत आहेत, तथापि खालीं लिहिलेला लेख एका बुरुजावरचा आह्मी मुद्दाम उतरून आणिला आहे.

"ईबुर्जेबस्तफिरंगीशाहे"
"यगरशखानगुलामआदिलशाह"

अर्थः—हा फिरंगी बुरुज यगरशखान यानें बांधिला.



कांहीं बुरुजही ढांसळले आहेत. ह्या बुरुजांची उंची कोठें कोठें शंभर फूट दृष्टीस पडते. यांचा भव्यपणा, मजबुती वगैरे पाहून मनुष्य अगदीं गुंग होऊन जातो. जिकडे पहावें तिकडे एकसारखा तासलेला दगड ह्या बुरुजांस लावला आहे; व कोठकोठें सात सात फुटांच्या चौरस शिळा माथ्यापर्यंत चिकटून टाकिल्या आहेत. हे बुरुज जणुं काय पर्वतसे दिसतात. असो. ज्या भव्य तटाकडे पाहतांक्षणीं शत्रूंचें काळीज दडपून जाई, ज्या तटावर पूर्वी महान् महान् शूर शिपाई गस्त घालीत असत, ज्या तटावरून तोफांचे व बंदुकांचे असंख्य आवाज सुटून शत्रूंस दे माय धरणी ठाय असें होत असे, ज्या तटाचा भव्यपणा पाहून मोगल लोकांचा थरकांप होऊन ते मुकाट्यानें दिल्लीचा मार्ग सुधारीत व ज्याचें वर्णन शूर शिपायी अजूनही आपल्या वीररसपूरित पवाड्यांतून करीत आहेत असा जो हा विजापूरचा तट तो हल्लीं दीन होऊन क्षुद्र झांडांझुडपांनीं त्याचीं आंतडीं बाहेर काढिलीं आहेत. मोठमोठीं झाडें बुरुजावर व तटावर वाढून त्यांच्या मुळ्यांनीं तटाच्या काळजापर्यंत शिरकाव करून त्यांनीं त्याचें भव्य शरीर विदारून टाकिलें आहे. असो; एकंदरींत इतर सर्व गोष्टींप्रमाणें याचीही हल्लींची दैन्यावस्था व भव्यपणा पाहून पहाणाराची एक विचित्र स्थिति होऊन जाते.

# विजापूरवर्णन.

## शहराच्या कोटाबाहेरील इमारती वगैरे.

### प्रकरण ३ रें.

### इब्राहिमरोजा.

ही इमारत शहराच्या पश्चिमआंगास कोटापासून अर्ध मैलावर आहे. ज्या स्थळीं ही इमारत आहे तें स्थळ तारीफ करण्यासारखें आहे. येथें पश्चिमेस एक शानदार बगीच्या असून येथील हवा, पाणी व जमीन एकंदरीनें फारच सोयीवार असल्यामुळें इंजिनियर लोक व डाक्तर लोक हें स्थळ फारच पसंत करितात. मुंबई, पुणें वगैरे ठिकाणांहून मोठमोठे साहेब लोक व गव्हरनर साहेबही विजापुरांत आले असतां ह्याच इमारतींत बहुधा उतरत असतात. त्यांची बैठक दर्ग्यांत नसून मशिदींत असते.

दुरून पाहिलें असता ही इमारत फार भव्य व विशेष उंच आहे असें दिसत नाहीं. मात्र स्तंभाप्रमाणें जिकडे तिकडे लहान मोठे मनोरे दिसूं लागतात. परंतु उत्तर बाजूच्या दरवाजाजवळ गेलें ह्मणजे मग हळूहळू तिचा भव्यपणा दृष्टीस पडूं लागतो. ह्या इमारतीचा मुख्य व आंत शिरण्याचा दरवाजा हाच होय. ह्यास नगारखाना ह्मणतात. याप्रमाणेंच विजापुरांतील बहुतेक इमारतींच्या सदर दरवाजांवर नगारखाने केलेले सर्वत्र आहेत.



इब्राहिमरोजाच्या सभोंवतीं जें दगडी मजबूत कुसूं आहे, त्याच्या पूर्वबाजू शिवाय इतर तीन बाजूंच्या भिंतींची रुंदी तेहतीस फूट व उंची एकवीस फूट आहे, परंतु पूर्वेकडे जमीन उंच असल्यामुळें तेथील उंची अवघी अकरा फूट आहे; व रुंदीही सुमारें तितकीच आहे. ह्या चारही बाजूंच्या भिंतींत जागजागीं कमानी करून त्यांत फकीर लोकांस राहण्यास कोठड्या केल्या आहेत. हल्लीं कोठड्यांत सरकारी लोक राहतात.

उत्तरेकडील सदर (मुख्य) दरवाजानें आंत गेलें असतां आंतील अवर्णनीय शोभा दृष्टीस पडूं लागते. वर लिहिलेल्या कुसवाच्या मध्यभागीं एक अकरा फूट उंचीचा चौथरा असून त्यावर पूर्वेस एक (दर्गा) व पश्चिमेस एक (मशीद) अशा दोन मजबूत व सुबक इमारती आहेत. ह्या दोहोंच्या मध्यभागीं एक फार सुंदर कारंजें आहे. आतां आपण पूर्वेकडील दर्ग्याकडे प्रथम पाहूं.—हा दर्गा हमचौरस ११५ फूट आहे. ह्याच्या सभोंवतीं प्रत्येक बाजूस दरएक कमान औरस चौरस १' फुटांची अशा सात सात कमानी आहेत. त्याचप्रमाणें दर्ग्याच्या भिंतीला लागूनही पांच पांच कमानी आहेत. अशा ह्या दुहेरी कमानी असल्यामुळें त्यांच्या योगानें दर्ग्यास फारच मनोहर शोभा आली आहे; ह्या दर्ग्याच्या भिंतींची शोभा फारच तारीफ करण्यासारखी आहे. हिच्या सर्व दगडांवरून कुराण कोरलेलें आहे. हीं सर्व अक्षरें वेलबुट्टीप्रमाणें दिसतात. उत्तरेच्या बाजूस जें लिहिलें आहे त्यापैकीं एक चुटका आमच्या वाचकांकरितां देतों:—

लाइलाहाइल्इल्लुल्ला
महंमदुरसूलुल्ला

अर्थः—ईश्वर एकच आहे व महंमद त्याचा प्रेषित आहे.

ह्या दर्ग्याच्या चारी बाजूंला चार दरवाजे फार सुंदर आहेत. त्यांच्या झडपा लांकडी असून त्यांवर सोनेरी शाई चोळलेली होती. हल्लीं ती गेली आहे हें सांगणें नकोच. दर्ग्याच्या प्रत्येक बाजूस दोन दोन खिडक्या आहेत, व त्यांवर फारशी लिपींत कोरलेली अशी दगडी जाळी बसवून दिली आहे. ह्या दर्ग्याची एकंदर भिंत सोन्यानें चोळलेली असून तीवर नानातऱ्हेचीं सोनेरी झाडें रेखिलीं होतीं, परंतु सांप्रत तीं सर्व नाशाप्रत पावलीं आहेत. ही फक्त बाहेरील शोभा मात्र आपण अवलोकन केली; आतां दर्ग्याचे आंतील स्थिति कशी आहे ती पाहूं.

दर्ग्याच्या आंत पाऊल टाकल्या बरोबर किंचित् अंधकार भासतो. आंतील खोली हमचौरस ३८ फुटांची आहे व तींत मध्यभागीं ३३×१३ फुटींचा एक चौथरा आहे. त्यावर एका ओळीनें अशा सहा कबरा आहेत. त्या येणेंप्रमाणें:—

१ हजी बडी साहेब ( इब्रा० बा० आई )
१ इब्राहिम बादशाहा ( सुलतान )
१ जोरा सुलतान ( कन्या )
१ सुलेमान पादशाहा ( मुलगा )
१ ताजसुलतान ( पातशाहाजादी )
१ दुरवेशपादशाहा ( पादशाहाजादा असें सांगतात पण कोठें संभवनीय लेख नाहीं.)

ह्या कबरी नेहमीं वस्त्राच्छादित असतात. ज्या सुलतान इब्राहिम जगद्गुरूनें लाखों रुपये खर्चून वरील इमारत बांधिली त्याच्यापुढें हल्लीं खापरांचीं धुपाटणीं आहेत, व त्यांत दमडी अधेल्याचा ऊद—तो देखील कधीं कधीं—जळत असतो.

ह्या खोलींत उभें राहून वर नजर फेंकली असतां मोठमोठ्या



नकशीदार शिळांचें निराधार छत दिसतें. हें सुमारें वर सांगितलेल्या कबरापासून चाळीस फुटांवर उंच आहे. आमचे श्वेतद्वीपस्थ व आर्यभूमींत उत्पन्न झालेले हुषार इंजिनियर लोक ह्या निराधार छताविषयीं फारच तारीफ करितात. ह्यास जे दगड आहेत ते व इमारतीसही जे दगड आहेत ते, या दगडांमधून मोठमोठ्या लोखंडी सळया घालून ते मोठ्या कौशल्यानें एकमेकांशीं गच्च जखडून टाकिले आहेत. विजापुरांत दुसऱ्या अशाच प्रकारच्या ज्या कित्येक इमारती आहेत त्यांत ठिकठिकाणीं लोखंडाचाच पुष्कळ उपयोग केलेला आढळतो; व यावरून विजापूरच्या राज्यांत लोखंड पुष्कळ उत्पन्न होत असावें हेंही उघड दिसतें.

---

1. "The roof in the Roza Mausoleum hanging as it were in the air, was a mystery which is now only explained by their method of using concrete." These are Furgusson's words and he says further that, nine builders out of ten will tell you that such a flat roof as that in the Ibrahim Roza will not stand. It has stood, however, for a couple of hundred years and may hold together for as many more.—*Book of Bombay.*

२. कोंकणांत माती सर्वत्र तांबडी असते. ह्या मातीमध्यें खनिज लोह पुष्कळ मिश्रित असतें, व धावड जातीचे लोक येथें हल्लींपेक्षां पुष्कळ लोखंड उत्पन्न करीत होते. हल्लीं असें करण्यास हरकती मात्र पुष्कळ आहेत त्या अशा कीं, तें अशोधित लोखंड गाळण्यास भरपूर कोळसा पाहिजे व तो मिळण्यास जंगल तोडण्याचा प्रतिबंध आहे. पूर्वी स्वराज्यांत धावड जातीच्या सोळा वर्षांच्या वयाच्या प्रत्येक पुरुषास डोईपट्टीबद्दल तीन तीन रुपये कर द्यावा लागत असे व तो दिल्यावर

( पुढें चालु )

वर दर्शविलेल्या खोलींतून वर जाण्याकरितां पूर्वेस एक व पश्चिमेस एक असे दोन मार्ग दोहों दरवाजांच्या बाजूनें आहेत. ह्या मार्गांत बहुतेक काळोख असल्यामुळें फार संभाळून जावें लागतें. हा मार्ग भिंतींत असून ह्याची रुंदी दोन फूट चार इंचांची आहे. वरतीं गेल्यावर इमारतीचे सभोंवतीं अशी एक ग्यालरी लागते कीं तिच्या प्रत्येक बाजूची लांबी ६७ फूट व तिची रुंदी ९ फुटांची आहे. तेव्हां अर्थातच ६७–६७ फुटांच्या ग्यालरी चार झाल्या. ह्या ग्यालरींचें छत वर सांगितलेल्या दगडी छताप्रमाणेंच निराधार आहे. येथील शोभा पाहिल्यावर आलेल्या मार्गानें परत जाऊन वरतीं जाण्याचा रस्ता काढावा व आपण कबरीच्या खोलीच्या वर जें विनआधारी छत पाहिलें होतें त्यावर जावें. ही जागा फारच गार असून अष्टकोनाकृति आहे. हिचा व्यास ३८ फुटांचा आहे. ह्यावर घुमज आहे. ह्या घुमजाच्या पायथ्यापाशीं जाण्यास दक्षिणोत्तर मार्ग आहेत. ह्या मार्गांनीं वरतीं गेलें म्हणजे तेथें गच्ची लागते. येथें वारा फार सपाट्यानें वाहातो, व पूर्वेकडील शहरचा भाग बहुतेक दृष्टीस पडतो.

ह्या दर्ग्याचें दगडी छत (मुख्यत्वेंकरून बाहेरच्या कमानींचें) कोठकोठें फाटून दगड मोकळे होत चालले आहेत, त्यामुळें सरकारानें मोठमोठे लांकडी धिरे दिले आहेत. याप्रमाणें इब्राहिम आदिलशाहाच्या दर्ग्याचें थोडेंसें वर्णन वाचकांस सादर केलें. आतां मशिदीचे इमारतीकडे वळूंः—

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

त्यांस लोखंड काढण्यास जितका कोळसा लागेल तितकें जंगल तोडण्याची पूर्ण परवानगी असे, व यामुळेंच पूर्वी लोखंड विशेष उत्पन्न होत असे.





ही इमारत पश्चिमेस आहे असें वर सांगण्यांत आलेंच आहे. हिचें काम फार साधें असून, हिची लांबी व रुंदी सुमारें १००×६८ फुटांची आहे, व आंतील निमाज पढण्याचा दिवाणखानाही एवढाच आहे. ह्यांतच साहेबलोक उतरत असतात. ह्या इमारतीस घुमजाच्या पायथ्याशीं जाण्यास दक्षिणेच्या व उत्तरेच्या बाजूंनीं रस्ते केले आहेत. वर गेल्यावर उघडी आगाशी लागते. ह्या आगाशीस चारी बाजूंनीं भिंती घातल्या आहेत; व ह्या भिंतींवर उंच दगडी कळस जिकडे तिकडे बसवून दिले आहेत. तेथून पश्चिमेकडील घुमजाचा चौथरा ३८ चौरस फुटांचा आहे. तेथून पश्चिमेकडील बगीच्याची मनोहर शोभा दृष्टीस पडते.

आतां आपण इब्राहिम रोजाचा पूर्वीचा थोडासा इतिहास लक्षांत आणून हा लेख संपवूं.

ही इमारत सुलतान इब्राहिम जगद्गुरु ह्यानें आपली प्रिय कन्या जोरा सुलताना इजकरितां म्हणून इ० स० १६२५ या वर्षी बांधिली आहे. त्याचें कारण असें झालें कीं एके दिवशीं राजवाड्यांत कोणी एकानें मधमाशांचीं पोळीं व त्यांचे नकाशे फारच अवर्णनीय काढून आणिले. बादशाहा ते पाहून फारच खूष झाला. ते जनानखान्यांत पहाण्याकरितां पाठविले. बादशाहाची सुलताना जोरा नामक फारच लाडकी व रूपवती कन्या तेथें होती. तिनें बापाजवळ येऊन ह्या जगांत माझें नांव रहावें म्हणून ह्याप्रमाणें सुरेख व मजबूत व आपल्या सौंदर्यानें सर्व इमारतींस मागें टाकील अशी एक इमारत माझ्या नांवानें बांधावी म्हणून हट्ट घेतला. हे तिचे लाड पुरविण्याकरतां बादशाहानें लाखों रुपये खर्चून ही इमारत बांधिली आहे.

इब्राहिम रोजास (आंतील दोन्ही इमारती धरून) खर्च ५२,८१,९०० रुपये झाला. ही बांधण्याचें काम एकसारखें ३६ वर्षें

११ महिने ११ दिवस सतत चाललें होतें असें सांगतात. ह्या इमारतीचें अलौकिक हस्तकौशल्य पाहून कसाही दुःखीकष्टी मनुष्य तेथें असला तरी त्याचें सर्व दुःख क्षणभर हरण होईल यांत कांहीं शंका नाहीं.

पुढें अल्ली आदिलशाह (दुसरा) याचे कारकीर्दींत मोंगलांनीं विजापुरावर स्वारी केली त्या वेळीं मक्के दरवाजावर एक तोफ होती ती शत्रूवर उडविली. त्यामुळें रोजाची इमारत अमळ जाया झाली व तिचा एक खांब सुटून पडला. तो खांब व इतर जाया झालेलें काम मॉन्ट साहेब बहादूर यांनीं पुढें परोपकार बुद्धीनें दुरुस्त केलें आहे, असें सांगतात.

---

## मोतीघुमज.

हा घुमज इब्राहिम रोजाचे पश्चिमेस व तोरव्यास जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस आहे. हा सुलतान महंमदाचा 'हबीमुल्ला अवलिया' ह्मणून कोणी गुरु होता त्यानें बांधिला. परंतु ह्यास 'मोती घुमज' असें नांव पडण्याचें कारण पुढीलप्रमाणें मिळतें.

वर सांगितलेला अवलिया हा सुलतान इब्राहिम आदिलशाहे जगद्गुरु ह्याचे कारकीर्दींतच बहुतेक विख्यातीस आला होता. त्यावेळीं कर्मधर्मसंयोगानें सुरत बंदराहून कोणी मुरीदगाजीखां व मल्लुखां असे दोघे बंधु लाखों रुपयांचें मोतीं घेऊन विजापूरच्या दरबारीं आले होते. त्यांनीं या अवलियाची कीर्ति ऐकून त्यास आपले गुरु करून घेतलें. पुढें कोणे एके वेळीं हे मोत्यांचें जहाज भरून समुद्रांतून चालले असतां एकाएकीं मोठें वादळ झालें व त्यायोगानें आतां जहाज खचीत बुडतें, व आपणास प्राणास मुकावें लागतें असें त्यांस



वाटलें. परंतु अशा वेळींच अकस्मात त्यांस या आपल्या गुरूची आठवण होऊन 'आह्मास या संकटांतून पार पाडिलें असतां आपणास जहाजांतील चौथा हिस्सा अर्पण करूं' अशी त्यांनीं त्याची प्रार्थना केली! पुढें याप्रमाणें घडून आलें व कबूल केल्याप्रमाणें हे दोघे बंधु तसेंच जहाज घेऊन विजापूरनजीकच्या समुद्रकिनारीं सुखरूप येऊन उतरले, आणि तेथून त्या दोघांपैकीं मुरीदगाजीखां हा अवलियास अर्पण करण्याकरितां जहाजांतील मोत्यांचा चौथा हिस्सा घेऊन पुढें विजापुरीं आला.

ह्यावेळीं हबीमुल्लाखां हे आपला घुमज बांधीत होते. त्याचें काम पुरें होऊन फक्त कांहीं जागीं चुन्याचा घोटीव सनला व्हावयाचा राहिला होता; व त्याकरितां हे अवलिया चुन्याच्या घाणीजवळ बसले होते इतक्यांत मुरीदगाजीखान हा मोत्यांचे करंडे घेऊन अवलियाच्या शोधाकरितां तेथें आला आणि त्यानें आणलेला नजराणा गुरूपुढें ठेविला. तथापि अवलियांनीं त्याविषयीं आपली निराशा दाखविली. परंतु पुढें मुरीदगाजी याचा विशेष आग्रह दिसल्यावरून त्यांनीं तीं मोत्यें घेऊन तशींच्यातशींच चुन्याच्या घाणींत टाकून दिलीं. त्या मोत्यांचा सनला

---

१. ही त्या अवलियाची करामत असल्याबद्दल आणखी असाही प्रमाणलेख मिळतो कीं, ज्यावेळीं तिकडे त्या व्यापाऱ्यांचें जहाज बचावलें त्यावेळीं इकडे या अवलियाच्या हातांतलि पोथी व त्याच्या अंगरख्याच्या अस्तन्या हीं अगदीं चिंब भिजून गेलीं होतीं; व त्याच्या खरेखोटेपणाबद्दल भोंवतालच्या मंडळींपैकीं कोणी एकानें ती अस्तनी पिळून तिचें पाणी चाखून पाहिलें तों तें समुद्राच्या पाण्याप्रमाणें खारट होतें!

पाहिली तों खुणा न पटतां हल्लीं ज्या स्थानावर हे दर्गे आहेत त्या स्थानांत जाऊन पाहिलें, तों मदिनांतील मातीची ओळख पटली व मग तेथें मठ बांधून ते राहिले.

प्रथमतः ह्या जागीं आपापाल जोगी ह्मणून कोणी साधु रहात होते. तेही मोठे ईश्वरपरायण होते, व त्यांणीं कित्येक साधनें साध्य करून घेतलीं होतीं. ह्या साधूंचा नित्य नियम असा होता कीं, आपल्या साधनेंकरून काशीस जाऊन भागीरथीचें स्नान करून यावें. एके दिवशीं हे साधु आकाशपंथें वायुगती काशीस जात असतां एकाएकीं खालीं सावली पडलेली पाहून मिरानी शमशूल ओशाख यांनीं त्याच्या तेथील शिष्यवर्गास विचारलें कीं, ही सावली कशाची आहे? तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं आपापाल जोगी आकाशपंथें काशीस चालले आहेत त्यांची ही सावली; वगैरे मजकूर ह्या अवलियांनीं शिष्यमुखें ऐकून ते परत येतील त्या वेळेस आह्मांस सांगावें, असें त्या शिष्यमंडळास सांगितलें. नंतर जोगी काशीहून परत आले तेव्हां त्यांच्या शिष्यांनीं झालेलें वर्तमान त्यांस सांगितलें व अवलियासही जोगी आल्याची खबर दिली. तें ऐकून जोग्यास आणण्यास अवलियांनीं आपल्या पादुका पाठविल्या, त्यावरून जोगी अवलियास भेटण्याकरितां गेले. ह्या दोघांची गांठ पडल्यावर धर्मसंबंधी पुष्कळ वादविवाद झाला. या वादांत जोगी पराभव पावले व त्यांनीं ती जागा अवलियांस अर्पण केली व आपण अन्य ठिकाणीं रहावयास गेले. त्या दिवसापासून मिरानी शमशूल ओशाख हे हल्लींच्या स्थानावर राहूं लागले.

ह्या अवलियाचा पुत्र 'बुरहानदीन अल्ला'; त्याचा पुत्र अमीनदीन साहेब. या अमीनदीन साहेबांच्या जन्मकाळाची फार



चमत्कारिक कथा आहे:—अमीनदीन साहेब जन्मावयाचे वेळीं (या वेळीं विजापुरास सुलतान महंमद राज्य करीत होता) त्याच्या मातुश्रीस असह्य प्रसववेदना होऊं लागल्या व त्याच समयीं तिला दृष्टांत झाला कीं 'मी नग्न बाहेर येणार नाहीं, याकरितां जर तूं एखादें बारीक वस्त्र गिळशील तर तें नेसून मी लागलाच येईन;' त्याप्रमाणें तिनें करितांच तिची सुटका झाली. हे वस्त्र परिधान करून पृथ्वीवर आले! तेव्हांपासून त्यांचा ईश्वरत्वाचा डंका सर्वत्र वाजला.

पुढेंही यांची वागणूक अगदीं अलिप्त असे; इतरांप्रमाणें थाटमाट—ढोंग—नित्यनेम वगैरे गोष्टींची ते कांहीं जरूर ठेवीत नसत—तेव्हां अर्थात् त्यांजकडून इतर दाढीवाल्यांप्रमाणें त्रिकाल कच्छहीन होऊन निमाज पढणें होत नव्हतें. उघडच आहे. अशांना अशा बाह्योपाधीचें काय प्रयोजन? परंतु जन हें त्रिविध आहेना? त्याच्या दोषापवादापासून कोण सुटला आहे? साधूंचा छळ होणें ही गोष्ट सर्वत्रच आहे. साक्रेतीसासारख्यांस देखील विष पिऊन मरण्याची शिक्षा भोगावी लागली. हें तर असो. पण इकडे तुकाराम, रामदास यांची थोडी का मानखंडना झाली होती? मुसलमान लोक ह्मणूं लागले कीं व त्यांनीं त्यास उपदेश केला कीं हें काय? इतर सर्व असो; पण तूं हाडाचा मुसलमान ह्मणवितोस त्यापक्षीं निदान निमाज तरी पढत जा! त्यांस अवलियानें उत्तर केलें, बरें तुमच्यासारखें कां होईना! मी ज्याप्रमाणें निमाज पढेन त्याप्रमाणें जर तुह्मी पढाल तर मी तुमचें ऐकेन, असें ह्मणून शहराबाहेर तलाव होता तेथें गेले. त्या तळ्यांत पाण्यावर चालत जाऊन तेथेंच ते पाण्यावर निमाज पढूं लागले. हें पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटून ते आपल्या मूर्खपणाचा पस्ताव करूं लागले व आपण साधूस व्यर्थ शिणविलें याबद्दल त्यांनीं शरण जाऊन त्याची

माफी मागितली व त्या दिवसापासून त्यांस ते फार पूज्य मानूं लागले.

ह्या स्थानास दोन घुमज अंतराअंतरावर आहेत; पैकीं पश्चिमेकडे आहे तो अमीनसाहेब यांचा व उत्तरेकडील बुराहनअल्ला यांनीं आपला बाप मिरानी शमशूल हे स्वर्गवासी झाल्यावर आपणाकरितां व आपल्या बापाकरितां ह्मणून बांधिला. याच स्थानीं खोजा अमीनसाहेब, बाबाहुसेनी व चांदसाहेब वगैरेंच्या तीनचार कबरी आहेत; व खेरीज एकसारखी एक चाळ बांधून त्यांत आणखी त्यांच्या वंशजांच्या कबरीही बऱ्याच दृष्टीस पडतात.

ज्यांची योग्यता काय सांगावी! कीं पुढें कैक वर्षांनीं (इ० स० १७३३) दिल्लीच्या महंमदशाह बादशहानें या अवलियाच्या वंशांतला पांचवा पुरुष हजरत मौलाली हुसेनी यांस विजापुराजवळील तोरवें, कौरहाल, बोबलाद वगैरे गांवें इनाम करून त्यांची सनद पाठवून दिली. सांप्रत हीं गांवें अजुन त्यांच्या वंशजांकडे चालत आहेत; व त्यांचा उपभोग हल्लीं त्यांचे वंशज घेत आहेत.

---

## ऐनूलमुल्कचा घुमज.

हा घुमज शहराच्या पूर्वेस दोन मैलांवर ह्मणजे जहां बेगमच्या घुमजाच्या वायव्येस सुमारें मैल पाऊणमैलावर राहतो. ऐनूलमुल्क ह्मणून सुलतान इब्राहिम आदिलशाह पहिला याचे पदरीं एक महाप्रतापी सरदार होता त्यानें आपलाही घुमज बांधिला व ह्याचेच पूर्वेस ऐनापूर ह्मणून गांवही बसविलें होतें. हा

१ सांप्रत हें गांव ओसाड पडलें आहे.



वजीर मोठा राज्यकारस्थानी व महत्वाकांक्षी होता. ह्याच्या मनांत बादशाहास ठार करून आपण तक्ताधिपति व्हावें असें होतें, व त्याकरितां त्यानें गोवेंकरांच्या मदतीनें प्रयत्नही करून पाहिला; परंतु सुलतान इब्राहिम हाही मोठा मसलती असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं.

असो. हा घुमज एका उंचवट्यावर बांधिलेला आहे व ह्याच्या आसपास दूरवर एकसारखा सपाट माळ आहे. ह्याला आंत जाण्याकरितां फक्त दक्षिणेस दरवाजा आहे. त्यांतून आंत गेल्यावर हमचौरस ५३ फुटींची खोली लागते व तिच्यावरच घुमजाचें काम चढलेलें आहे. येथून हा घुमज पाहिला असतां आकाशांत १०० फूट उंचीवर दिसतो, व त्यांत मध्यंतरींच एक सांखळी लोंबत असलेली दिसते. खोलींत कबरांची जी जागा आहे तेथें मेंढपाळांनीं गोठण केली आहे व त्यामुळें खोलातील एकंदर जमीन कवडीचा माल झाली आहे. आह्मी ह्या घुमजांत शिरल्याबरोबर प्रथमच वास्तविक घुमजाचें वर्णन करूं लागलों ह्याचें तरी हेंच कारण कीं, ह्यांतील दर्शनी कबरी तर जमीनदोस्त झाल्या आहेत; परंतु त्यांच्या ठिकाणावर मेंढरांच्या लेंड्यांचा चांगला थर मातलेला असून कोठें उभें राहिलें तरी घाणीशिवाय वर्णन करण्यास जागा नाहीं!! पहा, काळाची गति काय विचित्र आहे ती!! कीं ज्या ऐनूलमुल्कानें कांहीं दिवस सर्व महाराष्ट्रदेश दणदणावून टाकिला होता व ज्याचें नांव ऐकूनच सर्व लोक थरथरा कांपत होते, किंबहुना ज्यानें आपल्या बाहुबळानें एवढ्या मोठ्या सुलताना सारख्या राज्यधुरंधरासही चळचळां कांपाविलें होतें त्याच्या घुमजाची ही स्थिति! ज्यानें ज्याआंतील भिंती नानातऱ्हेचीं झाडें, चित्रें व कुराणाचीं वाक्यें यांहीं करून सोन्यानें मढवून काढिल्या होत्या तेथें आतां एखाद्या ठिकाणीं सोन्याचा रजःकण असेल तर शपथ! हल्लीं

त्यांपैकीं कोठें कोठें भिंतीवरून आरबी लिपींत असलेलीं चुन्याच्या नक्षीचीं अक्षरें मात्र उठविलेलीं दिसतात व सर्वत्र पक्षांच्या विष्टेनें भिंतींस चिटाच्या कापडासारखें रूप आलें आहे !

ह्याप्रमाणें प्रथम मजल्यावरील, आंतील स्थिति पाहून बाहेर येतांना दक्षिणेचे अंगास दरवाजापाशींच घुमजावर जाण्याचा मार्ग लागतो. हा मार्ग चार फूट रुंदीचा असून तो वळत वळत पश्चिमेच्या भिंतींतून थेट घुमजाच्या पायथ्यापाशीं जाऊन पोंचतो. त्यावर इतका वारा वहात असतो कीं, तेथें मनुष्यानें जींपूनच वागलें पाहिजे तर परिणाम आहे. तसेंच घुमजाच्या पायथ्यास एक भलें मोठें छिद्र ठेविलें आहे त्यांतून नीट कबरेच्या खोलीपर्यंत दिसतें ह्मणून तेथूनही पाहणारानें उतावीळ न होतां संभाळून पाहिलें पाहिजे, नाहीं तर कपाळमोक्ष व्हावयाचा ! ह्या छिद्रापासून सुमारें ६० फुटांवर खालची जमीन आहे तेव्हां अर्थात् ह्या पायथ्यापासून वर गोल होत गेलेल्या घुमजाची उंची ४० फूट असावी असा अजमास दिसतो. घुमजाचे आंतले अंगास जी सांखळी मध्येंच लटकाविली आहे ह्मणून वर सांगितलें ती या छिद्रांतून चांगली दिसते. ही अगदीं काळीढोण पडलेली आहे. विजापुरांतील लोक ही सांखळी सोन्याची आहे असें ह्मणतात; परंतु ती कसास लाविल्याशिवाय खात्री होणार नाहीं, व कसास लावणें तर प्रथम घुमज पाडल्यावांचून ती हातीं येणार नाहीं अशा ठिकाणीं तिचें वास्तव्य आहे; ह्यामुळें हिला तूर्त अनामिका धातूची ह्मणणें भाग आहे !

ह्या घुमजाचे इमारतीजवळ एक निमाज पढण्याची मशीद आहे, तिचेंही काम फार सुबक आहे. परंतु तिची स्थिति तरी घुमजाच्या स्थितीची सख्खी बहीण आहे व तिच्यांत हल्लीं फांसेफारधी व वाटसरू ह्यांच्या जागोजाग तीनें तीन दगडांच्या चुली दिसत असतात !



## जहां बेगमचा घुमज, मशीद व महाल.

यास हल्लीं छोटा बोळ घुमज हें नांव असून हा रेलवे स्टेशनाच्या पूर्वेस सुमारें दोन अडीच मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं ह्या घुमजाशिवाय जहांबेगमचा महाल व मशीद हीं आहेत.

जहांबेगम ही सुलतान महंमदची लाडकी कन्या होती. तिनें आपल्या बापाचा घुमज (बडा बोळ घुमज) पाहून, त्या नमुन्याबरहुकूम माझाही बांधावा अशी त्याजवळ विनंति केली. त्यावरून बादशहानें मुलीचें कौतुक पुरविण्याकरितां आपल्या घुमजाच्या समोरच (पातळींतील एका रेषेंत) हा घुमज बांधण्याचा पाया घातला. पुढें ह्याचें थोडेंथोडकें काम होतें न होतें तों सुलतान महंमद मृत्यु पावला यामुळें हें काम बहुतेक राहिलेंच ह्मणावयाचें; कारण पुढें छोटा अल्ली याचे कारकीर्दीत जरी ह्याचें काम चाललें होतें तरी त्या वेळीं वारंवार लढाईचे प्रसंग व एकामागें एक काळरूपी शत्रु उभे असत, तेव्हां असल्या कामास बिलकुल स्वस्थता नव्हती व ह्मणूनच हल्लीं जें कांहीं अर्धेमुर्धे काम झालें आहे तें रडतखडत झालेलें आहे, आणि अर्थात् त्याचें वर्णनही आह्मांस रडतखडतच करावें लागणार.

ज्यांना सांप्रतच्या प्रसिद्ध बोळ घुमजाचें आरंभींचें बांधकाम पहावयाचें आहे त्यांना हा घुमज उत्तम सोय आहे. ह्या इमारतीस बड्या बोळ घुमजाप्रमाणें जे चारी बुरुजांस चार मनोरे आहेत त्यांपैकीं आग्नेयेच्या मनोऱ्याचे मात्र चार मजले आहेत. बाकी कोणाचा एक तर कोणाचे दोन याप्रमाणें आहेत. तसेंच दर्शनी कमानीचें कामही बहुतेक चवथ्या तळमजल्यापर्यंत जाऊन पोंचलें आहे. ह्या कबरींचा चौथरा बड्या बोळ घुमजाप्रमाणेंच ७६ फु

तथापि त्यापेक्षां यांत एक दोन विशेष फरक सद्य:स्थितीवरून दिसतात ते हे कीं, ज्या चौरस खोलीवर बोळघुमजाच्या वास्तविक घुमजाचें काम चढलें त्या खोलीपेक्षां ह्या घुमजाची चौरस खोली ६ फूट कमी ह्मणजे हमचौरस १२९ फुटांची आहे; व दुसरें असें कीं, ज्या चौथऱ्यावर बड्या बोळघुमजांतील कबरी आहेत त्या चौथऱ्यावर कमानी नाहींत, आणि ह्यास त्या आहेत. ह्या कमानींवर बऱ्याच उंचीवर नेऊन तेथून घुमजाचें काम व्हावयाचें होतें असा अंजमास दिसतो. ह्यांतील चौथऱ्यावर तेल्यां रंगाचे घोटीव व तुळतुळीत दगडांनीं राजकन्येची दर्शनी कबर[१] बांधिली आहे, व तिच्या पुढें अशाच दगडांची छोटीशी कबर आहे. ही छोटी कबर कोणाची आहे हें समजलें नाहीं. बाकी बड्या बोळघुमजाप्रमाणें हिच्या तळमजल्यांतील दोन्हीही कबरी अस्ताव्यस्त झाल्या आहेत, व ह्या घुमजाच्या अर्धवट कामामुळें तेथें खासा उजेड आहे; व तो हल्लीं धनगरांनीं मेंढरांकरितां कोंडवाडाच बनविला आहे; आणि वरच्या कबरांच्या जागीं तरी अशींच कांटेरी व दुसरीं क्षुद्र झाडें उगवलीं आहेत! एकंदरींत ज्या जहांबेगम राजकन्येनें एवढे आपल्या बापाजवळ लाड करून हा घुमज बांधिला त्याचेंही तिनें पुरें काम पाहिलेंच नाहीं; पण त्याची ही हल्लींची अशी अवस्था झालेली पाहून पाहणाऱ्या मनुष्याच्या मनाची स्थिति कांहीं चमत्कारिक होऊन जाते!

ह्या इमारतीच्या दक्षिणेस नजीकच बड्या बोळघुमजाच्या नमुन्याप्रमाणें जहांबेगमची मशीद आहे; व तिचे नजीकच महाल आहे. तेथें हल्लीं एक ३०—४० घरांचें खेडें आहे, त्यास

---

१ घुमज बांधीत असतांच त्याची कीर्ति जहांबेगम ही इ० स० १६९२ ह्या वर्षी मृत्यु पावली.



ह्या महालावरून 'महल' हेंच नांव पडलें आहे. या महालद्वयापैकीं खऱ्या महालापुढें एक, भलें मोठें तळें होतें; पण सांप्रत त्याची खोली जमिनीबरोबर झाली आहे. मात्र बाजूच्या बांधकामापैकीं कांहीं शिलक आहे व त्यावरून ह्या तळ्याचा अदमास बांधावा लागतो.

हा महाल एक मजली असून ह्याची दर्शनी बाजू फारच मनोहर आहे. ह्याचा भाग अझून कोठें पडलेला दिसत नाहीं; परंतु धनगरलोक ह्या महालांत आपलीं गुरेंमेंढरें बांधीत असल्यामुळें याच्या चुनेगची जमिनीस जिकडे तिकडे खळगे खाचे पडले आहेत. हें ठिकाण शहरापासून बरेंच दूर आहे ह्यामुळें सरकारही इकडे विशेष लक्ष पुरवील अशी आशा दिसत नाहीं.

---

## तोरवें ऊर्फ नवरोजपूर.

तोरवें हें पश्चिमेस शहरापासून चार मैलांवर आहे. ह्याचें पूर्वींचें नांव नवरसपूर हें आहे. इब्राहिम जगद्गुरु यास गाण्याचा नाद फार होता. त्यानें हल्लीं ज्या ठिकाणीं तोरवें खेडें आहे तेथें संगीत व नारीमहाल असे दोन महाल इ० स० १५८८ मध्यें बांधिले. त्यांस त्यानें अनुक्रमें नवरस महाल व सुंदर महाल अशीं नांवें ठेविलीं होतीं. दुसरा महाल (सुंदरमहाल) त्याची सुंदरनामक राणी होती तिच्याकरितां बांधिला होता. ह्या बादशाहास गाण्याचा फार शोक होता व त्याजवळ पुष्कळ गवई होते हें प्रथम भागांत सांगितलेंच आहे. त्यांस त्यानें चांगलीं चांगलीं वेतनें करून बादशाहानें आपले आश्रित करून ठेविले होते, व त्या लोकांस राहण्याकरितां ह्मणून नवरस-

पूर हें बादशाहानें आपल्या शहानवाजाखान नामक वजिराच्या देखरेखीखालीं सन १५९८ सालीं वसविलें. इब्राहिम बादशहाचे कारकीर्दीत तें फारच भरभराटीस आलें होतें हें सांगणें नकोच. नंतर हा बादशाहा मृत्यु पावला त्या सालीं ह्मणजे इ० स० १६२६ त अहमदनगरचा प्रसिद्ध वजीर ज्यास मलिकंबर असा किताब होता, त्यानें एकाएकीं छापा घालून ह्याचा विध्वंस केला. त्या दिवसापासून तों हा कालपर्यंत तें अगदीं वैराण होऊन राहिलें आहे.

इब्राहिम रोजापासून तों थेट तोरवेंपर्यंत चार मैल एकसारखा दगडी दगड जिकडे तिकडे पसरलेला दिसतो! विजापूरच्या कोटांतील पडक्या वाड्याच्या भिंतींची तरी साक्ष आहे; परंतु ह्या ठिकाणीं कोठें एखादी भिंतही दम धरून उभी राहिली नाहीं. तोरवें गांवाजवळ जवळ गेल्यावर नारी महाल व संगीत महाल लागतात. परंतु हाय हाय! त्यांची ती हल्लींची स्थिति पाहून काळाचा सपाटा कांहीं विचित्र आहे असें ह्मणावें लागतें. ज्यांस ह्या आदिलशाही बादशाहांचें वैभव निदान इतिहासानें तरी माहीत झालें असेल अशा मनुष्यानें ही शोचनीय स्थिति पाहिली असतां खरोखर तो आसवें ढाळील. पूर्वी ज्या महालाकडे नुसतें पाहिलें असतांना डोळे काढीत असत, त्या महालांत सांप्रत तोरव्यांतील लोक दिशेस जात आहेत, मोठमोठ्या भिंतींवर भलीं भक्कम कांटेरी झाडें झुडपें यांनीं आपलें माहेरघर केलें आहे! ज्या सुंदरीच्या महालांत जिकडे तिकडे नानातऱ्हेच्या बहुमूल्य अत्तरांचा घमघमाट सुटत असे त्या ठिकाणीं हल्लीं मलमूत्रांचा दुर्गंध सुटत आहे! ज्या संगीत महालांत सुस्वर गायन करणारांचें मन प्रफुल्लित व्हावें ह्मणून नानातऱ्हेच्या फुलांचे गजरे व माळा जिकडे तिकडे लटकावीत असत, त्या ठिकाणीं कडुलिंब, येरंड वगैरे क्षुद्र झाडें उगवून त्यांचें हल्लीं एकछत्र राज्य माजलें आहे. कोठें पहावें तों नुसती उंच भिंत, कोठें गच्चीचा छिन्नविछिन्न भाग, कोठें मोडकीतोडकी भव्य कमान, कोठें छिन्नभिन्न झालेले दगडी जिने, कोठें विद्रूप झालेले कोनाडे, त्यांत चित्रविचित्र रंगाची अस्पष्ट लकेरी, कोठें वेलींत गुरफटून गेलेलें कारंजें, कोठें झाडांझुडपांनीं दडपून गेलेले हौद, याप्रमाणें ह्या सुंदरानामक सुंदरीच्या सुंदर अशा महालाची दैन्यावस्था झाली आहे.



पूर्वी नवरोजपुरांत जिकडे तिकडे नळाचें पाणी खेळतें होतें, तो नळ तुटून त्यांतील पाणी कोठें गेलें ह्याचा पत्ताही लागत नाहीं. विजापुरांतील खंदकांत तोरवेंहून जो नळ आणिला तो मात्र अझून कायम आहे.

# विजापूरवर्णन.

भाग ३ रा.

## विजापूरशहराचें वर्णन.

(१) हें शहर उत्तर अक्षांश १६° ५०' व पूर्वरेखांश ७५° ४८' असून याची उंची समुद्रसपाटीपासून १९५० फूट आहे; व हें सोलापूरचे दक्षिणेस ६१ मैलांवर सोलापुराहून धारवाडास जाणाऱ्या रस्त्यावर आहे. विजापूरच्या आसपास २० मैलांवरूनच येथील कित्येक इमारती दृग्गोचर होऊं लागतात; त्यांत बोळ घुमज ही पहिल्यानें दृष्टीस पडून जणुं काय तो आपणांकडे टक लावून पाहतोच आहे व या कृपापूर्व दृष्टीनें आपल्या स्वागताची उत्सुकता दाखवीत आहे असा पाहणारास भास होतो. यामुळें आतां आपले पाय विजापुरास लवकरच लागतील असें वाटून त्याची अवलोकन करण्याची जिज्ञासा विशेष वाढत जाऊन, वाटसरू आपले पाय झपझप उचलूं लागतो, परंतु हें सर्व व्यर्थ! जसजसें जवळ जावें तसतसा हा घुमज अगदीं मैला दोन मैलांवर आहे असें वाटतें मात्र, परंतु बिचारा वाटसरू कितीक मैल चालला तरी हे दोन मैल सरत नाहींत, व चालणारांची निराशा होऊं लागते. मग कांहीं वेळानें एकदांचा वाटसरू हुश्श—हुश्श करीत शहरांत जाऊन पोंहचतो.

आगगाडींतून प्रवास करणारास ह्मणजे या घुमजानें फस-



विण्याचें सोडिलें आहे असें नाहीं. निंबाळ स्टेशनास गाडी पोंहोंचण्यापूर्वीच एकाएकीं तो आपलें विशाळ स्वरूप दाखवितो, व मी जवळ आहें—भेटीस लौकर धांवा—अशी प्रवाशांस व गाडीस सूचना देऊन जरी गाडी आपलें सर्व सामर्थ्य खर्चून वाऱ्यासारखी पळूं लागली तरी पक्ष तीस सारखा दीड तास लागतो. या बोळ घुमजाप्रमाणेंच जे आग्रा येथील ताजमहाल पाहण्यास जातात त्यांचीही स्थिति होते. असो.

(२) एकदांचें याप्रमाणें विजापूरचे नजीक येऊन पोंहचल्यावर मग मात्र हळू हळू क्रमाक्रमानें इतर लहान मोठ्या इमारती आपलीं दीनवाणीं मुखें दाखवितांना दृष्टीस पडतात! पूर्वेकडे तीन चार मैलांवर ऐनलमुल्क याचा उंच घुमज व राजकन्या जहांबेगम इचा अपूर्ता पण भव्य घुमज माळरानांतून आपलीं केवीलवाणीं शिखरें लोकांस दाखवितात! हा सर्व देखावा आपण गाडींतून स्टेशनाच्या पूर्वेकडील मात्र पाहिला. पश्चिमेकडील देखावा दृष्टीस पडतांच मनावर जो कांहीं विलक्षण परिणाम घडतो तो सांगतां येत नाहीं!! त्याचा अनुभव पाहिजे.

(३) ज्यांस इतिहासज्ञानाचे नांवानें आंवळ्या एवढें शून्य, तो मनांत ह्मणेल कीं, 'आपले पूर्वज अशीं अगडबंब कामें करीत होते तरी कशाला? काय हा पैशाचा अपव्यय? काय हा दीर्घ प्रयत्न? त्यांस कांहीं उद्योग नव्हता काय? खरोखर अशा प्रकारचीं अचाट व अतोनात खर्चाचीं कामें करण्याचें त्यांना कांहीं प्रयोजन नव्हतें; राज्यांत चांगला बंदोबस्त राखिला असता, पुष्कळ सैन्य ठेविलें असतें, तर एवढा खर्च व ही विलक्षण खटपट करायास नको होती.' परंतु हें त्याचें ह्मणणें

‘कदाचित्’ हल्लींच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें मात्र लागू पडलें असतें, हें विचारी मनुष्य तेव्हांच कबूल करील.

दोन शतकांपूर्वी असें ह्मणणारास जरी राज्यपद दिलें असतें तथापि असे तट, खंदक वगैरे बांधावयाचें त्यालाही भाग पडलें असतें. एकंदरींत ती वेळच कांहीं वेगळी होती. आतांप्रमाणें लोक अगदीं निःसत्व व भुकेबंगाल नव्हते. त्या वेळचें पाणीच कांहीं वेगळें होतें. त्यांच्या आंगीं वीरश्रीचें वारें झळकत होतें. हल्लींप्रमाणेंच मुलगा शाळेंत जाऊं लागला नाहीं तोंच "दिधलें दुःख परानें, उसनें फेडूं नयेचि सोसावें। शिक्षा देव तयाला करिल ह्मणोनी उगेंच बैसावें ॥" याप्रमाणें त्यांच्या डोक्यांत भरवून देण्याविषयीं शाळामास्तरानें कधींही उरस्फोड केली नव्हती. त्यांची आयुष्याची दोरी पन्नाशीपर्यंत नव्हती, आतांप्रमाणें पंचविशी लोटल्याबरोबर ‘कृतांतकटकामलध्वजजरा’ दिसूं लागत नव्हती. काळजीनें त्यांचीं अंतःकरणें करपलीं नव्हतीं. मिशनरींच्या बडबडीनें त्यांचीं माथीं फिरून गेलीं नव्हतीं. वीरश्री, स्वदेशाभिमान, जात्यभिमान, मानापमानाची चाड वगैरे सद्गुणांनीं ते अधिक मंडित होते. त्या वेळचे लोक मुलगा १६ वर्षांचा झाला कीं त्यास शाळेंत खिळून टाकीत नसत. व्याकरण—भूगोलखगोल—खाड्याकेपें—लंडनची लोकवस्ती—आल्फर्डची कारकीर्द व ‘खडकाळें मावळांत आहे’ वगैरे घोकपट्टी करवून मुलें क्षयरोगी करीत नव्हते. घोड्यावर चांगलें बसतां आलें—तरवारीचे दहावीस प्रकारचे हात खेळतां आले—भाला सफाईनें टाकितां आला—तिराचें आणि बंदुकीचें अचुक निशाण मारतां आलें आणि घोड्याची परीक्षा करितां आली कीं आटपला विद्याभ्यास. ही क्षात्र विद्या त्यांच्या घरचीच पिढीजादी होती. शिवाजी व प-



हिला बाजीराव हे तर नेहमीं ह्मणत कीं, लिहिणें व हिशेब ठेवणें हीं भटुरग्यांचीं कामें, व त्यांनीं हें सत्यही करून दाखविलें. शिवाजी दादोजीपाशीं कोंदिखतावणीच्या माहितीची घोकपट्टी करीत बसता तर मराठ्यांची गादी स्थापित झाली असती काय? बाजीरावानें अटकेपर्यंत मराठ्यांच्या निशाणाचा झेंडा रोंखिला त्यानें कधीं भूगोल पाठ केला होता काय? असो.

(४) आदिलशाही घराण्याचा पहिला बादशाहा जो युसुफ यानें गिचन हल्ली[1], बिजन हल्ली, चंदनकेरी, खादगी खेडकेरी, कोरबोग्हल्ली, व कुरणकोटी अशीं सात खेडीं मोडून हें विजापूर वसविलें. या शहरास आदिलशाही घराण्यांतल्या निरनिराळ्या बादशाहांनीं निरनिराळीं नांवें दिलीं. पहिला बादशाहा युसुफ यानें ‘विजयापूर’, अली (१) यानें ‘बिदयापूर’, सुलतान महंमद यानें ‘महंमदपूर’ वगैरे, परंतु सांप्रत ‘विजापूर’ हेंच नांव प्रसिद्ध आहे.

(५) युसुफ आदिलशाहानें प्रथमारंभीं ‘बीजन हल्ली’ मोडून तेथें किल्ला बांधिला. त्यापूर्वी त्या खेड्यांत एक कच्च्या विटांची जबरदस्त भिंत होती ती किल्ला बांधिते समयीं बादशाहाच्या मनांत जमीनदोस्त करावयाची होती, परंतु त्या खेड्यांतील वयोवृद्ध पाटलाचे विनंतीवरून त्या खेड्याचें साक्षीकरितां ह्मणून ती तशीच त्यावेळीं कायम राखिली होती. ही विजापुरापेक्षांही वडील भिंत ह्मणूनच विजापुर हें जिल्ह्याचें मुख्य ठि-

---

१ कानडी भाषेत "हल्ली" याचा अर्थ गांव व "केरी" याचा अर्थ वाडी असा होतो.

काम करण्यासंबंधानें इंग्रज सरकार किल्ल्यांतील इमारती दुरुस्त करीत आहे त्यासंबंधानें निजधामास पोंहचली.

(६) ह्या शहरास दोन भुईकोट किल्ले आहेत; एक आंत व एक बाहेर. आंतील भुईकोट किल्ला पाडून तो भुईबरोबर करण्याचें काम सांप्रत चालू आहे. बाहेरील किल्ल्यास तर जागजागीं खिंडारें पडलीं आहेतच.

(७) सांप्रत मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे शहरें हरएक प्रकारें प्रसिद्ध व भरभराटींत आहेत त्याचप्रमाणें आदिलशाही अमदानींत विजापूरची स्थिति होती. या वेळीं विजापूर शहरांत लहान मोठीं मिळून ९,८४,००० घरें असून शहराची खानेसुमारी १८ लक्ष होती. त्या वेळीं विजापुरांत राहावयास मिळणें हें एक आपलें परम सुदैवच असें लोक समजत असत. 'जन्मा आलीयाचें फळ—मुंबई देखावी एकवेळ', हें आधुनिक 'बडबडपुराणांतील' वाक्य त्यावेळीं विजापुरास लागू पडत होतें.

सकृद्दर्शनी हा आंकडा असंभवनीयसा दिसतो, परंतु ज्यानें विजापूरचा विस्तार पाहिला आहे, शहरापासून कित्येक मैलपर्यंत एकसारखीं मोडकीं तोडकीं घरें, त्यांचीं छिन्नविच्छिन्न भिंताडें व दगड विटांचे ढीग पाहिले असतील, भुईंत खणूं लागल्यास मोडक्या घरांची साक्ष—अंबारें—कवलें—खांब—घोटीव दगड वगैरे ज्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहेत त्यास अशी शंका कदापि येणार नाहीं. असो.

(८) वज़ीर, उमराव, मानकरी, बडेखान, छोटेखान, अशा बड्या बड्या लोकांचे एकमजली व तिमजली असे वाडे कोटाच्या आंत होते व सौदागर वगैरे परदेशीय लोक कोटाच्या बाहेर राहत असत. हवा खाण्याकरितां व ऐषआरामाकरितां ठिका-



ठिकाणीं अनेक बगीचे लागून गेले असत. त्याप्रमाणें बावड्याही[1] सर्व शहरभर अनेक होत्या, व त्यांचें पाणी मजेदार रीतीनें ठिकठिकाणीं खेळविलेलें असे. इब्राहीम जगद्गुरूस गाण्याचा ह्मटला, ह्मणजे पहिल्या प्रतीचा शोक असे. त्याजवळ निरनिराळ्या देशचे रागरागिणीवर गाणारे असे एक नव्हे दोन नव्हे, तर साडेचारशें गवयी पगार खाऊन पडले असत. त्यांचा आलाप ह्या बागांतून नेहमीं ऐकूं यावयाच्याच! त्यांची प्रत्यहीं झडती होत असे, त्या वेळची ती बहार काय सांगावी? हे जणुं स्वर्गीचे गंधर्वच शापग्रस्त होऊन येथें आले आहेत काय? असें वाटावें! हाय! हाय!! आतां त्या सर्वांचा समूळ ऱ्हास होऊन त्याच विजापुरांतील लोक संगीत शाकुंतल नाटक पाहण्याचे इच्छेनें सांप्रत ६० मैलांवर सोलापुरास तंगड्या तोडीत येण्यास बिलकुल अनमान करीत नाहींत!

(९) शहरांतील सर्व अमीरउमराव, सरदार, मानकरी, शेटसावकार वगैरे आपापल्या लवाजम्यासह जुम्म्याचे दिवशीं (शुक्रवारीं) जुम्मा मशिदींत जात असत. त्या वेळचा तो थाट व ती शोभा यांचें यथातथ्य वर्णन करणें ह्मटलें ह्मणजे त्या वेळच्या मनुष्यासच पुसलें पाहिजे. नानातऱ्हेच्या मूल्यवान् रंगीबेरंगी गालिचावर सुवर्णाच्या वेल काढिलेल्या महिरपी, अशा त्या महिरपींवर चित्रविचित्र पोषाखाचे—पायघोळ आंगरख्याचे—भव्य छातीचे धष्टपुष्ट इमाम कोणीकडे? व हल्लींची शोचनीय स्थिति कोणीकडे! त्यांची ती धर्मावर पूर्ण

---

१. शहरांतील प्रसिद्ध "नऊ बावड्या" येणेंप्रमाणें:—

१ हुजूर बागची बावडी. २ ऐलगोड बावडी. ३ हेगोड बावडी. ४ मन बावडी. ५ हेल बावडी. ६ ताज बावडी. ७ संदळ बावडी. ८ केसरखान बावडी. ९ कमालखान बावडी.

श्रद्धा पाहून हल्लींच्या एकाद्या धर्मपालक मुसलमानास आश्चर्य वाटून मान खालीं घालावयाची पाळी यावयाची!

बादशहा जुम्मास निघाले कीं सोन्यारुप्याचीं नाणीं व सोन्यारुप्याचींच कृत्रीम फळें रस्त्यांतून एकसारखीं पेरीत, व तीं फकीरं गोळा करून नेत. त्याचप्रमाणें इतर बडे लोक वगैरेही मोठा दानधर्म करीत असत. हे हिंदु धर्माचा किती तिरस्कार करीत असत हें ह्मणजे कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं.

> तीर्थें क्षेत्रें तीं मोडलीं । ब्राह्मणस्थानें विघडिलीं ॥
> सकळ पृथ्वी आंदोळिली । धर्म गेला ॥ १ ॥
>
> रामदास.

पूर्वी बादशाही अमलांत ज्या जुमामशिदींत शुचिर्भूत झाल्याशिवाय आंत जाण्यास कोणाचीही आज्ञा नव्हती तीच जुमामशीद ह्या विजापूरचें वाटोळें झाल्या दिवसापासून हळू हळू बेवारशी गुराढोरांचें व जनावरांचें वसतिस्थान होऊन राहिलें होतें, इतकेंच नव्हे तर येथील कित्येक लोकांच्या सांगण्यांत असेंही आहे कीं, परमुलुखांतील कित्येक मुशाफर वगैरे या शहरीं आले असतां ते या मशिदींत उतरत असत; त्यांनीं तर हें स्थान अगदींच भ्रष्ट करून टाकिलें होतें. हें परस्थ लोकांचें असो; परंतु येथल्या कित्येक 'वस्ताशांस' काय ह्मणावें, हें मात्र समजत नाहीं. त्यांजकडून या ठिकाणीं जो भ्रष्टाचार चालत असे तो कांहीं पुसूंच नये! असो. सांप्रत हा सर्व प्रकार मुसलमान लोकांच्या सरकारांत पाठविलेल्या अर्जावरून अगदीं बंद झाला आहे इतकेंच नव्हे, पण तिची दुरुस्तीही झाली आहे.

(१०) मुसलमानांचे लग्नें करण्याचे दिवस आले ह्मणजे



शहरांत सर्वत्र अवर्णनीय कडाक्याचा कांय एकादा उत्साहच चालला आहे असें वाटत असे. नानातऱ्हेच्या मधुर वाद्यांनीं शहर कसें अगदीं दणाणून जाई. समारंभांत कित्येक हत्तीच्या अंबारींत, कित्येक सुंदर रथांत, कित्येक घोड्यावर बसत. एका अंबारींत सरदार उमराव बसलें तर दुसऱ्या अंबारींत त्यांचा 'पेचवान' हुक्का असे. नळाचें पाणी जसें एका हौदाच्यावरून दुसऱ्या मजल्यावर चढवितात त्याप्रमाणें ह्या उमरावांच्या तोंडांत (झरझरी) नळी सोडलेली असे. ती नळी आपसांत 'आप लीजीये' 'आप लीजीये' असें करितां करितां व हुक्याच्या हौद्यांतील नौकर चिलम्यांतील रणरणीत विस्तव फुंकतां फुंकतां तो सुगंधित गुडाखु लयास गेला तरी त्यांचें 'आप लीजीये' 'आप लीजीये' चाललेंच असे.

ही वरात रस्त्यानें मिरवत मिरवत येऊन प्रथमतः आसराचें दर्शन घेऊन जुम्मा मशीद वगैरे रस्त्यांतून जाई त्यावेळीं हजारों नगरवासी स्त्रीपुरुषें वाड्यांच्या गच्च्यांवरून, खिडक्यांतून, झरोक्यांतून व चिकाच्या पड्यांतूनही हा मनोहर थाट पहावयास जमत. एकसमयावच्छेदेंकरून हा सर्व दणदणाट पाहून एखादा नवखा मनुष्य तर घाबरूनच जावयाचा.

(११) मुसलमान लोक ह्मटले ह्मणजे जात्या मिजासी व थाटदार. ह्या थाटाची परम सीमा ह्मणजे लग्नसमारंभांत (सारदींत) व्हावयाची. आदिलशाही अमदानींतील लग्नसमारंभाचा थाट वर्णन करणें ह्मणजे सोमनाथाच्या देवालयांतील संपत्तीचें वर्णन करण्यासारखेंच समजावयाचें. काय ह्मणे—देवासमोर जी घांट टांगिली होती तिच्या सोन्याच्या सांखळीचें वजन दोनशें मण होतें! मूर्तीच्या आंत हिरे, माणकें, पाच वगैरे रत्नें आठ कोटी रुपयांचीं कोंबून टाकिलेलीं होतीं! देव

नित्याच्या झडतीला ५०० नायकिणी होत्या ! व म्लेंच्छासंगें कित्येक दिवस फक्त देवाचे पुजारीच लढत होते ! वगैरे हें आतांच्या लक्ष्मीच्या सावत्र पुत्रांस खरें तरी कसें वाटावें ! मिस्टरीज ऑफ लंदन व पारिस हीं पुस्तकें—अगर हीं इतकीं दूरचीं तरी कशाला ? आपलें जवळचें नॉटिव्ह सिक्रेट्स् कां घटकाभर घ्याना, हीं पुस्तकें वाचीत असतां त्यांतील काल्पनिक मजकूर जितका 'सत्य' वाटतो तितकाच, कदाचित् त्याहूनही कांकणभर जास्त वरील सोमनाथादिकांचे संपत्तीचें वर्णन वाचून वाटल्यास नवल तें काय? कांहीं दिवसांनीं भरतखंडाच्या पूर्वीच्या संपत्त्यादिकांच्या अशा प्रकारच्या वर्णनास 'कल्पित कादंबरी' ह्मणण्याची पाळी येते काय नकळे !

(१२) शहरांत ज्यास हल्लीं ब्राह्मणी दरवाजा असें ह्मणतात त्याच्या आसपास मराठ्यांचे व ब्राह्मणांचे टोलेजंग वाडे होते. त्यांपुढें सुवासिक फुलझाडांचे बाग असून मेघवृष्टीप्रमाणें कारंजांच्या तुषारांनीं त्यांचीं आलयें शीतल होत होतीं. त्या वाड्यांत ते आपल्या बिकट मोहिमींच्या गोष्टी, तसेंच आपणांवर जिवावरचे प्रसंग कसे गुदरले व तरवारीच्या जोरावर आपण त्यांतून कसे मुक्त झालों वगैरे ते एकमेकांस सांगत बसत. हाय ! हाय ! हल्लीं ते वाडे व तें ठिकाण अगदीं वैराण बनून दिवसा देखील तेथें जाण्यास भीति वाटते. जिकडे पाहवें तिकडे पडकीं घरें व दगडामातीचे ढीग व त्या शूरांच्या वाड्यांच्या भिंताडांवरील दाट निवडुंग हें मात्र दृष्टीस पडतें ! तसेंच जिकडे तिकडे विहिरी पसरल्या आहेत—कारंजीं व तळीं भग्न झालीं आहेत—त्यांचीं द्रव्य व धान्य सांठविण्याचीं कोठारें व तळघरें सूर्यनारायणास नमस्कार करीत आहेत, असेंही दिसतें.

(१३) शहरांत व शहराबाहेरही जिकडे तिकडे हल्लीं देखील



घुमजच घुमज दृष्टीस पडतात, ते इतके कीं, हे घुमज ह्मणजे विजापूर ओळखण्याची एक खूणच होऊन गेली आहे. योगसामर्थ्यानें जर एकाद्या मनुष्यास अचानक व त्यास न कळतां या शहरांत आणून सोडतां आलें तर तो या खुणेवरून चटकन् 'मी विजापुरांत कसा आलों' असें ह्मटल्यावांचून राहणार नाहीं. याप्रमाणें शहरांत व त्याच्या आसपासही कित्येक मैलपर्यंत हे असे असंख्य घुमज वगैरे पाहून कोणालाही असें वाटल्यावांचून राहणार नाहीं कीं, "हें खूळ आहे तरी काय ? विजापुरांतील पूर्वीच्या बादशहादिकांनीं ईश्वरापाशीं काय नवस केला होता कीं, आह्मी अमुक घुमज बांधून देऊं ह्मणून; ... आहारनिद्राभयमैथुनांहून विशेष गोष्ट जें ज्ञान ईश्वरानें मनुष्यमात्रास दिलें आहे त्याचा खरा हेतु ह्मणजे अगडबंब घुमज व इतर इमारती उठवून द्याव्या येवढाच आहे असें ते समजत होते काय ? अगर आपलें स्मारककृत्य करणें ह्मणजे आपल्या नांवाचे घुमज बांधणें याव्यतिरिक्त आपलें नांव जगांत रहाण्यास दुसरें साधनच नाहीं, असें ते समजत होते काय ? अगर काय होतें तरी काय ? हें आपणास तर बाबा कांहीं कळत नाहीं. मग काय असेल तें असो." युसफ आदिलशहापासून तो शेवटच्या शिकंदर बादशहाअखेर दोनशें वर्षेपर्यंत, एकसारखे घुमज व त्यापुढें मशिदी बांधण्याचें काम चाललें असावें व त्याचें कारण असें होतें कीं, ज्या वजीर-उमराव-सरदार वगैरे जवळ द्रव्य सांचलें कीं ते आपल्या नांवालौकिकाप्रमाणें घुमज, मशिदी बांधीत असत, व त्यांतच त्यांस महत्कृत्य व पुरुषार्थ वाटत असे, इतकेंच नव्हे, तर हें एक धर्मसंबंधीं कर्तव्य आहे असेंही ते समजत असत. काशींत जिकडे तिकडे देवालयें नाहींं का आपण पहात ? त्यांचें कधीं आपणांस आ-

श्चर्य वाटतें काय ? तद्वतच या 'अल्लोपासकांचीं' हीं उपासनागृहें ( देवालयें ) च समजावयाचीं.

शिकंदराच्या वेळीं वजीर उमराव इत्यादिकांचें जाडें प्रस्त माजलें होतें तसें कोणाच्या वेळीं नसेल. या वजीर उमरावांस पैशाची कांहींच खातर नसे. असते कशानें ? एकेकाची संपत्ति इतकी होती कीं सांप्रतचें विजापूर खरेदी करण्यासही तो समर्थ झाला असता ! ह्या उमरावांजवळ अगणित पैसा होता व यामुळें त्यांच्यांत दुफळी झाली व आपसांत वैमनस्यें पडलीं हेंही साहजिकच झालें, व याचा परिणाम जुम्मा मशीद हें जें सार्वजनिक उपासनागृह होतें व ज्यांत पूर्वीपासून सर्व उमराव जमा होत असत, त्यांनीं या आपसांतील वितुष्टामुळें त्या मशिदींत जमण्याचें बंद करून आपापल्या वाड्याशेजारीं वेगवेगळ्या मशिदी आपणांकरितां व आपल्या गुरूंकरितां बांधिल्या व या मशिदींपुढें व घुमजांपुढें पाण्याप्रमाणें पैसा खर्चून एकमेकांच्या चढाओढीनें अवर्णनीय शोभा आणिली होती. बहुतकरून प्रत्येक घुमजाजवळ निदान एक तरी सुंदर विहीर बांधून तींत उतरण्याचे मार्गही फार सुरेख केले होते. घुमजापाशीं कारंजें असून आसपासच्या जाग्यांत थाटदार बाग उठवून दिले होते, व त्यांत लहान लहान फरसबंदी पायमार्ग केले होते. जेव्हां पहावें तेव्हां अगदीं गारेगार वाटावें असे बाग शहरांत जागोजाग असल्यामुळें शहरास किती शोभा आली असेल व शहर त्या अमदानींत किती सुरेख दिसत असेल याची कल्पना करणें हेंच जास्ती प्रशस्त होणार आहे.

( १४ ) ज्यास या विजापूरचें पूर्वीचें वैभव ठाऊक नाहीं असा एखादा नवखा मनुष्य या प्रदेशाच्या आसपास व विशेषतः



विजापुरास येऊन उतरला असतां त्यास वाटेल कीं हें काय ! ही जागा तर स्मशानभूमी ( मसनवटा ) आहे. आपण येथें राहवें तरी कसें ? असें ह्मणून त्यानें सुमारें १९* मैलांच्या आसपास राहण्याकरितां ठिकाण शोधिलें, तथापि घुमज, मशिदी, जिकडे तिकडे मोठमोठ्या शिळा व दगड पसरलेले त्याच्या दृष्टीस पडतील. ह्या इमारती बांधिल्यापासून तों ह्या कालपर्यंत त्यांची दुरुस्ती किंवा डागडुजी कोणीही केली नाहीं. फार तर काय, पण त्यांतील केरही कोणी काढीत नाहींत तरी त्या तशाच आहेत. पांकोळ्या व भुयारांतून विषारी जनावरें खुशालनांदत आहेत !

( १५ ) खोवासखान मुसतफाखान यांचे आसारमहालाजवळील वाडे तसेच मुरारपंडित ( मुरहरपंडित ), किशवरखान, आफ्‌जुलखान, ताजखान उर्फ मलिकसंदल वगैरे मी मी ह्मणणारांचे वाडे शहरांत झळकत असत; त्यांवर नाना तऱ्हेची सोनेरी वेलबुट्टी काढिली असे; कोनाड्यांतून विचित्र रंगाचें चिनई सामान व तऱ्हेतऱ्हेचीं चित्रें शोभेकरितां ठेविलीं असत. सुवासिक फुलांचे हार व गजरे खुंट्यांवरून लटकावीत असत.

---

* Hamilton thus describes: 'The ruins of old Delhi cover the plain for an extent of nearly eight miles to the south of the modern Shahjehanabad, exhibiting throughout the east tract one of the most striking scenes of desolation to be met with throughout the whole world.'— *Hand-book of India and Egypt.*

हॅमिलटन साहेबांनीं प्रथम विजापूर पहावयाचें होतें ह्मणजे त्यांस "सर्व जगांत" हीं वरील अक्षरें घालतां आलीं नसतीं. ह्यावरून साहेब मजकूर यांनीं विजापूर पाहिलें नाहीं असें दिसतें.

गाद्या, गिर्द्या, लोडें यांची रेलचेल असे. अत्तरदाण्या, गुलाबदाण्या वगैरे पात्रें प्रदर्शनीप्रमाणें मांडिलीं असत. रंगमहालांतील व जनानखान्यांतील अवर्णनीय शोभा तर पुसूंच नका. दासदासींची यांच्याजवळ लयलूट होती. फक्त यांचें हुक्क्यांचें एस्टाब्लिशमेंट ( Establishment ) निराळेंच होतें. हुक्काधिपति हुक्क्यांत पाणी घालणारा, हुक्क्यांवर विस्तव ठेवणारा, हुक्के साफ करणारा, गुडाखु मळणारा, हुक्क्याची नळी खाविंद यांच्या तोंडास लावणारा, व हुक्क्याचें कोठार संभाळणारा वगैरे वगैरे त्यांचें 'हुक्का एस्टाब्लिशमेंट' होतें ! यावरून इतर दासदासी किती बरें असतील ? असो.

ज्या खोवासखानानें विजापूरच्या राज्याच्या लगामाचीं सूत्रें आठ वर्षेपर्यंत आपल्या हातांत वागविलीं होतीं, ज्याच्या वाड्याकडे नुसतें पाहण्याचीही कोणास छाती होत नव्हती त्या वाड्याचा अगदीं सत्यनाश होऊन गेला आहे. त्याचीं सुवर्णानें मढविलेलीं मोठीं मोठीं बहालें इमारतींचा नाश करून नगरवासी लोकांनीं व ज्यांचा हात पडेल त्यांनीं नेलीं ! हें पाहून कोणाही मनुष्यास दुःख वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्याच्या वाड्याच्या भिंती जणूं दारिद्र्याचें पांघरूण ओढून केविलवाणीं व वेडींवांकडीं तोंडें करून उभ्या आहेत व त्या पडक्या वाड्यांत सांप्रत लोक बहिर्दिशेस जात आहेत ! ! ज्या खोवासखान याच्या वाड्यापुढें अरब रोहिले यांचा पाहारा होता त्याऐवजीं हल्लीं मोठमोठे भुजंग व विषारी जनावरें यांचा सनदी पाहारा आहे यामुळें ह्या भयानक मंदिरांत जाण्यास [ दुर्गीप्रमाणेंच ] भीति वाटते.

याचप्रमाणें नबाब मुसतफाखान याच्याही वाड्याची बहुतांशीं अशीच शोचनीय स्थिति झाली आहे. यापुढेंच त्या शूर



पुरुषाची मशीद आहे. याचे वंशज हल्लीं याच पडक्या वाड्यांत राहतात. यांची हल्लींची दैन्यावस्था पाहिली असतां 'बडा घर व पोकळ वासा' याप्रमाणें अनुभवास येऊन दुःख वाटतें ! जो नबाब मुसतफाखान शेवंती गुलाब, जाईजुई यांच्या पुष्पशय्येवर निद्रा करीत असे त्याच्या त्या पुष्पवृक्षांचीं स्थानें व त्या कारंजांचीं ठिकाणें हीं हल्लीं शतधा विदीर्ण झालीं आहेत.

( १६ ) विजापुरांतील त्या काळच्या ह्या सर्व इमारतींस दगड लांबलांबून आणिले असावेत असें त्या दगडांच्या बाह्य स्वरूपावरून दिसतें, व आमचे श्वेतद्वीपस्थ लोक त्यांची फारच वाखाणणी* करितात. विजापूरकरांच्या अमदानींत सर्व कांहीं इमारतींच जिकडेतिकडे बांधण्याचें काम चाललें असावें, असेंही वाटतें. एकानें जर एकादा सुंदर वाडा, घुमज अगर मशीद बांधिली तर दुसऱ्यानें अधिक पैसा व अधिक अक्कल खर्चून त्याच्यावर ताण करावी, हें मागें सांगितलेंच आहे. ह्याप्रमाणें हजारों इमारती बांधिल्या गेल्या. ह्या इमारतींचें दर्शनी काम जसें फारच मनोवेधक आहे तशीच त्यांची मजबुतीही तारीफ करण्यासारखी आहे,

---

* At Bijapur well selected stones have worn well and many still retain much of their sharpness. Beautiful carvings, chiefly arabesques and traceries, may be seen in the Ibrahim Roza, the Mehtri Mahal and Jama Masjid, not to mention may other less important examples in the many mausoleums scattered about in every direction. The whole of the immense walls surrounding the city together with Turweh, are built of well-tooled basaltic rock.—*Memoirs of the Geological Survey of India, Vol. XII.*

व त्यांत कारागिरांनीं आपलें कौशल्य हातविण्यास बिलकुल कमी केलेलें दिसत नाहीं. लांकूडावर देखील जसें नकशीकाम करितां येणार नाहीं असें नकशीकाम त्या कारागिरांनीं दगडावर करून दाखविलें आहे. बादशहाचे वेळीं अशा लोकांस कोरड्या परव्याच न देतां योग्य इनामत देऊन कित्येकांस गांवहीं इनाम करून देत असत.

( १७ ) विजापूरचें राज्य ऐन भरभराटींत असतां त्याची चतुःसीमा येणेंप्रमाणें होती:—दक्षिणेस निरानदीपासून तुंगभद्रा नदीपर्यंत मुलूख व पलीकडे अदेणी परगणा, पश्चिमेस कोंकणपट्टींतील बाणकोटापासून रामेश्वरापर्यंत मुलूख, पूर्वेस रायचूर, उद्गीर, मलकेर व बेदर असे चार परगणे, उत्तरेस अक्कलकोट नळदुर्ग, कालीयान व सोलापूर.

राज्याचा वसूल येणेंप्रमाणें:—

ऐन वसूल ७,८४,६१,८१७ रु० १ आ० ६ पै०.

मांडलिक १६ राजांपैकीं फक्त श्रीरंगपट्टणची खंडणी ५८,५१,३६१ रु० १२ आ० व बाकीच्या १५ राजांकडून मिळून एकंदर ५,२५,६१,६४९ रु०. शिवाय बंदरवसूल येणेंप्रमाणें:—

दाभोळ ७,०००, खेलहट्टी ७,०००, चिपळूण १५,०००, सगर २,०००, गोंवें[1] ३७,५००, इसलामपूर ( राजापूर ) १८,०००, सत्याऐशीं, १०,०००, खारेपाटण ५,०००, हुचेरी ५,०००, सागोली ३,५००, सिदहोट ५,०००, खेड ५,०००.

( १८ ) अदिलशाहींतील निरनिराळया बादशहांचे वेळीं निरनिराळीं नाणीं चालत होतीं. सुलतान महंमदाच्या वेळीं अशरफी ( मोहर ), परताप, होन, धरण असें सोन्याचें नाणें चालत

१. हें पुढें बंद झालें व गोंव्याच्या कपतानास दिलें. ( १५१० ).



होतें. इब्राहिम (पहिला) याचे वेळीं इब्राम्या, सतलाम्या चालत होत्या. इब्राहिम जगद्गुरूच्या वेळीं 'नवरस' नामक नाणें चालू होतें. खेरीज कित्येक अलग्युषी नाणीं तर एका बादशहाच्या वेळीं चालू होऊन लागलीस दुसऱ्याच्या वेळीं बंद पडत तीं वेगळींच.

( १९ ) विजापुरांत सांप्रत ज्या पेठा व बाजार आहेत त्यांची सांप्रतची लोकसंख्या[1] येणेंप्रमाणें:—

| पेठेचें नांव. | लोकसंख्या. |
|---|---|
| तवरपूर ... ... ... ... ... ... | २०४ |
| जगती बाजार... ... ... ... ... | ९११ |
| पाच्छापूर ... ... ... ... ... ... | १८६ |
| दौलत बाजार ... ... ... ... ... | ३७१ |
| ठाणें बुजरुक बाजार ... ... ... | २३८ |
| नागथान बाजार ... ... ... ... | २९२ |
| शिकारखान बाजार... ... ... ... | १८३ |
| कमालखान बाजार... ... ... ... | ३७० |
| अनिखिंडी बाजार ... ... ... ... | ७३ |
| निरकी बाजार... ... ... ... ... | २९ |
| शहाअबुतुराब बाजार ... ... ... | ८५ |
| जुम्मामशीद बाजार... ... ... ... | ८८ |
| मुरादखान बाजार ... .. ... ... | ३७६ |
| लंगर बाजार... ... ... ... ... | १८१ |
| फत्तेनगर बाजार ... ... ... ... | १२३ |

१. सन १८८१—८२ सालाचे खानेसुमारीवरून हे आंकडे घेतले आहेत. पेठा केव्हां व कोणाचे वेळीं स्थापित झाल्या हें प्रथम भागांत दर्शविलें आहेच.

| पेठेचें नांव. | लोकसंख्या |
|---|---|
| कारंजी बाजार... ... ... ... ... | १२४ |
| इब्राहिमपूर ... ... ... ... ... | ५८९ |
| अफसलपूर ... ... ... ... ... | १६२ |
| शापूरदर्गा ... ... ... ... ... | ६१९ |
| कालेबाग ... ... ... ... ... | २२ |
| बाराखुद बाजार ... ... ... ... | ९२५ |
| पुराणी बाजार ... ... ... ... ... | ८७ |
| रुमीखान बाजार ... ... ... ... | ३० |
| शाहापेठ बाजार ... ... ... ... | ९८ |
| पाले बाजार ... ... ... ... ... | ८२० |
| हैदरखान बाजार ... ... ... ... | ३३१ |
| महमदशाहा बाजार... ... ... ... | ६२१ |
| खजीनी बाजार ... ... ... ... | २१९ |
| जोरापूर ... ... ... ... ... ... | ११७१ |
| एखातपूर... ... ... ... ... ... | १५७ |
| फकराबाद ... ... ... ... ... | ११८ |
| खदानपूर... ... ... ... ... ... | ५६८ |
| | [illegible] |

विजापुरांत लोकसंख्या कायती एवढीच. त्यांत मुसलमान सुमारें ४,०००, लिंगाईत २,०००, इतर हिंदू [ सर्व जातींचे मिळून ] ३,२७१ व ब्राह्मण ५००.

येथें एक म्युनिसिपाल कमेटी आहे तिचें वार्षिक उत्पन्न अवघें २००० रु० [ निव्वळ घरपट्टीबद्दल सुमारें १२५० व इतर जकात वगैरे सटरफटर ७५० ]. रस्ते वगैरे पब्लिकवर्क्सकडून होतात.



(२०) लोकांचा मुख्य उद्योग शेतकी, व्यापार व जाडें भरडें कापड विणणें हा आहे. कांहीं लोक मोलमजुरीही करितात. विजापूरच्या आसपास सुमारें १२ मैलपर्यंत एक झाडही दिसावयाचें नाहीं. जिकडे पहावें तिकडे केवळ सपाट मैदान, खरखित जमीन, मृगजळीच्या लाटा, खडकाळ प्रदेश. ऐन पावसाळा असला तरी हिरवें ह्मणून कांहीं दिसावयाचें नाहीं. डोळयास लावावयास देखील पाणी मिळावयाचें नाहीं. कोटाच्या आंत मात्र पाण्याची लयलूट. जिकडे तिकडे विहिरी व तळीं यांचा सुकाळ; खंदकांतील पाणी व हौदांतील पाणी खळखळ वाहत असतें. यावरून ज्या युसुफ आदिलशहानें हें शहर वसविलें त्याच्या योजनाशक्तीची तारीफ करावी तितकी थोडीच. कित्येक भाविक लोकांच्या सांगण्यांत असें आहे कीं, ह्या बादशहानें तपश्चर्या करून कृष्णानदीस प्रसन्न करून घेऊन येथें आणून सोडिलें व ती या विजापुरांत गुप्तरूपानें आहे. यामुळें जिकडे खणावें तिकडे ५।१० हातांवर पाणी लागतें.

गांवांतील गुरेंढोरें गांवांतच चरतात व त्यांचें ह्या गांवांतीलच चाऱ्यावर उपजीवन होतें. बकरीं, मेंढरें वगैरे उंच किल्ल्यांच्या व भव्य इमारतींच्या मोडक्या शिखरांवर चढून आपलें उदरपोषण करितात. बहुतेक शेती डोण नदीच्या कांठीं होते. ही नदी लहान आहे पण हिचें पाणी बेचव असून खारट लागतें. दुथडीस एकसारखें कित्येक मैलपर्यंत काळेंभोर रान असून एकसारखीं ज्वारी वगैरेचीं शेतें पिकून राहतात. अहाहा ! येथील जोंधळा पाहून व त्यांचें तें सुंदर कणीस पाहून तहानभूक निघून जाते. त्याचीं दीड दीड पुरुष उंच ताटें डोलत असतात, तें पाहून फारच समाधान वाटतें. ‘ पिकेल डोण—तर

खाईल कोण' असें जें ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे. याप्रमाणें ही नदी इकडील लोकांची अन्नदेवी तर खरी, पण इच्या अंगीं एक जबरदस्त दुर्गुण आहे तो हा कीं, ही नदी केव्हां केव्हां वाटसरू व गुरेंढोरें यांस फसविते! हींत लोण्यासारखा गाळ असल्यामुळें नेहमींचा रस्ता सोडून अंमळ बाजूला पाय पडतांक्षणींच ते खालीं खालीं जातात व शेवटीं ही विश्वासघातकी नदी त्यांस गट्ट करिते.

(२१) ह्या लोकांचें मुख्य भक्ष्य ज्वारी, गहूं व बाजरी व क्वचित् तांदूळ. मुख्य पीक ज्वारी (यांत मुंगारी व हिंगारी असे दोन भेद आहेत). शिवाय गहूं, हरभरा, बाजरी, कापूस, अळशी, तीळ, तूर व मुग हीं धान्यें. इकडे उगवणारीं मुख्य झाडें ह्मटलीं ह्मणजे बाभळी, लिंब, आंबे व शिताफळी. सांप्रत शहराच्या दक्षिणेस सुमारें तीन मैलांवर एक शिताफळींची बाग फार मोठी आहे. शहरांत जिकडे तिकडे पडक्या वाड्यांच्या कुंपणांत केळीं वगैरेचे बाग लाविलेले तुरळक दृष्टीस पडतात.

(२२) आठवड्यांतून रविवारीं मात्र येथें बाजार तासबावडीनजीक भरतो असें मागें सांगितलेंच आहे. तेथें "बारा बंदरी, पांच पुणेरी व एक जुन्हरी बरोबर आहे" ह्या व्यापाऱ्याच्या ह्मणीप्रमाणें प्रकार घडत नाहीं. गांवचे ह्मणजे खेड्यांतील लोक साळसूद आहेत. मुंबईतील 'साळयाभोळया' व्यापाऱ्यांप्रमाणें एकदम दुपटी तिपटीचा फेर सांगत नाहींत. व्यापार आहे तेथें लबाडी आहेच. ज्यानें मोठमोठ्या शहरांतील मंड्या पाहिल्या असतील, नानातऱ्हेच्या व शाखांच्या राशींच्या राशी पाहून ज्यांची दृष्टी निवाली असेल अशा लोकांस हा बाजार ह्मणजे कांहींच वाटणार नाहीं हें उघड आहे.



(२३) इकडील लोक थंडे दिसतात. ब्राह्मणांमध्यें देशस्थांचा भरणा अधिक. बहुतेकांची निजून उठावयाची वेळ ह्मटली ह्मणजे 'अगदीं प्हांटे' आठ वाजतां! त्यांच्या स्त्रियांचाही तोच प्रकार. त्यांनिजून उठल्याबरोबर स्नान केल्याशिवाय 'मडि नीरु' (सोंवळ्यांतील पाणी) आणितात. यांना स्नानाचा फार कंटाळा. महिन्यांतून चार किंवा आठ वेळां स्नान केलें कीं आटोपलें. लिंगाइतांत हाच प्रकार आहे. त्यांच्यांत विटाळ पाळीत नाहींत. 'दोन बोटें लावली राख—कीं झाली पाक.' ह्यांच्या स्नानाचें सोंकशास्त्र काय तें चार दिवस नाहीं तर सूर्यास गोंडा फुटला नाहीं तों भाकर चघळितात.

ब्राह्मण व ज्यांस इनाम जमीन आहे ते खेरीजकरून कुळंबी व व्यापारी लोक रिकामे बसत नाहींत. या लोकांत विद्येची अभिरुचि नाहीं. पैसा मिळविण्याविषयीं पक्के वस्ताद, खर्चण्याविषयीं फार चिकट. 'चमडी देतील पण दमडी देणार नाहींत' असें ह्मणतात तें खरें.

(२४) गव्हरनर साहेब इ० स० १८८३ त आक्टोबर महिन्याच्या सुमारास विजापुरास गेले होते. त्यांनीं त्या समयीं जें सुरस भाषण केलें त्याचा सारांश हा होताः—

"येथें एक हायस्कूल केलें जाईल, विजापूरच्या इमारतींस जितकी पूर्वस्थिति आणवेल तेवढी सरकार आणील, हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण करील व रेलवे तर सुरू आहेच, तेव्हां त्यासंबंधानें व एकंदरींनें ह्या पुरातन शहराची पुष्कळ भरभराटी होणार आहे;" व त्याप्रमाणें त्यांनीं करून दाखविण्यास आरंभही केला आहे. फक्त आर किल्ल्यांतील इमारतींच्या दुरुस्तीचा व तत्संबंधानें पाडापाडीचा आंकडा तीन लाखांवर

होऊन गेला! तेव्हां खरोखरच सरकारानें ह्या शहरांतील इमारतींकडे मन घातलें आहे असें ह्मणणें भाग आहे व घातलें आहे हेंही खरेंच.

( २५ ) गांवांत सरकारी शाळा चार आहेत; पैकीं शहापूर पेठेंतील शाळेंत मात्र मराठी शिकवितात; बाकी दुसऱ्या शाळांतून कानडीच अभ्यास चालतो. गांवांतही जिकडे तिकडे 'या उराउर आप्पा', 'येन बेकू', 'नीर कूडू', 'छलो' याप्रमाणें ऐकूं यावयाचें. एकंदरींत कानडीच फार, मराठी थोडी व जे कोणी मराठी भाषा बोलतात ती इतकी अशुद्ध असते कीं अशुद्ध बोलण्याच्या फार्सांतील भाषा तरी जास्त शुद्ध असेल. "गनानांत्वा आनी गनपति विनावेकाचि ह्मना, वणा राणा णाणा...." शिवाय 'आह्मी बसला', 'ती पुस्तक द्या,' 'हामची बायको पाणी देतो', 'तिनें घोड्याला बांधिली' वगैरे विजापुरांत कांहीं वर्षें राहिल्यास एखाद्या 'लेखणीबहाद्दरास' देखील मराठी चार ओळी शुद्ध येणार नाहींत. मुसलमान लोक कानडी व मराठी वगैरे मिश्र भाषा बोलतात. कीरे ह्मणजे काय रे हें त्यांच्या बोलण्यांत नेहमीं येतें. नांव उच्चारितांना 'अल्ली सा', 'मीरा सा' असा साहेब शब्दाचा उच्चार करितात.

( २६ ) विजापुरांतील कांहीं मुसलमान, ज्यांस ह्या शहराचा अल्पस्वल्प पुरातन इतिहास माहीत आहे त्यांस पुशिलें असतां ते धर्मबुद्धीनें व मोठ्या गंभीरतेनें हा वृत्तांत सांगतात, व आपल्या पूर्वजांचा फार बडेजाव वर्णन करितात.

ज्या मुसलमान सद्गृहस्थांपासून आह्मी विजापूरच्या बखरेंतून पुष्कळ माहिती घेतली आहे त्यांचें नांव 'मनशी महंमद



अल्ली' हें आहे. ह्यांचें वय ७० वर्षांचें आहे. हे गृहस्थ फारच उदारांतःकरणाचे असून तसेच मोठे धर्मकर्मीही आहेत. ह्यांच्या संग्रहास असल्यापैकीं, खालीं लिहिलेल्या मुख्य मुख्य व आणखीही कित्येक फार जुनाट तसबिरा आमचे पाहण्यांत आल्या.

१ विजापूरच्या नऊ बादशाहांच्या नऊ तसबिरी.

| | |
|---|---|
| २ बेगम ताजसुलतान. | ११ मोहोदीनखान. |
| ३ बेगम चांदबिबी. | १२ अफझुलखान. |
| ४ झोरा सुलतान. | १३ किंशबरखान. |
| ५ रंभावती. | १४ शहाजहानबादशहा. |
| ६ औरंगझीब. | १५ तैमूरलंग. |
| ७ राजा शिवाजी. | १६ बहादरशहा. |
| ८ शहाजी. | १७ निजामउल्मुलुख. |
| ९ वजीर खोवासखान. | १८ नाशीर उद्दवला. |
| १० वजीर असदखान. | १९ सालरजंग. |

ह्या सर्व तसबिरींमध्यें अवर्णनीय अशी तसबीर ह्मटली ह्मणजे विजापूरचा पहिला बादशहा 'युसुफ आदिलशहा' याची आहे. ती पाहिली असतां मदनाचा पुतळा ह्मणून जें बोलतात तो हाच असावा असें भासतें. रंभावतीची तसबीरही अशीच मनमोहक आहे; पण तिच्या तसबिरीचा रंग पुष्कळ ठिकाणीं उडून गेला असल्यामुळें त्या शुभांगीच्या सौंदर्याचा ठसा मनावर उमटावा तसा उमटत नाहीं.

( २७ ) सुमारें सातआठ वर्षांपूर्वी ह्या प्रांतांत दुष्काळानें आपलें विक्राळ स्वरूप कसें प्रगट केलें होतें ह्याविषयीं दोन तांत्रिक शब्द सांगून वाचकांची रजा घेतों.

सोलापूर, विजापूर, वगैरे शहरें व आसपासचीं घटसारीं

खेडींपाडीं ह्या दुष्काळानें दाढेंत आंवळून धरलीं होतीं व तीं आतां त्यांना स्वाहा करितो काय असें पाहून लोक परलोकच्या यात्रेच्या तयारीला लागले होते व कित्येकांनीं मुक्कामही गांठिला होता. तेथील लोक ह्या दुष्काळासंबंधीं जो मजकूर सांगतात तो ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात. हाय हाय! काय तो दुर्धर प्रसंग! ईश्वर करो, आणि वैऱ्यांवरही असा प्रसंग न येवो! जातिवंत मराठे ज्यांच्या स्त्रिया नेहमीं गोषांत राहून काळ काढावयाच्या, करडे मुसलमान ज्यांच्या स्त्रिया झरोक्यांत बसून आनंदांत दिवस लोटावयाच्या, कुलीन शेतकरी ज्यांच्या स्त्रिया हारेच्या हारे भरून भाकर तुकडा शेतांत गड्यामाणसांस पाठवून गोष्टी सांगत बसावयाच्या, भस्मचर्चित लिंगाईत ज्यांच्या स्त्रिया 'खडम् खडम्' करणारे चांदीचे लिंग गळ्यांत अडकवून मोठ्या थाटानें कापसाच्या मोसमींत कापूस कातीत "बिडुशरग पोगुवेनु नानु खचित बिड बिडुशरग पोगुवेनु नानु" असें मधुर गाणें गात बसावयाच्या, गृहस्थ ब्राह्मण ज्यांच्या स्त्रिया हळदकुंकवाकरितां झुण झुण आवाज करीत एकाच्या घरून दुसऱ्याच्या घरीं विद्युल्लतेप्रमाणें जावयाच्या; पण काय! त्यांच्या त्या स्त्रियांची जी कांहीं दशा झाली त्याचें वर्णन करण्यास यमाजीपंतासच सांगितलें पाहिजे! पहिल्या वर्षीं त्यांनीं दाणागोटा जो कांहीं शिल्लक होता त्याचा फन्ना पाडिला; दुसऱ्या वर्षीं डागडागिणा, चीजवस्त, गुरेंढोरें, यांस वाटेस लाविलें व तिसऱ्या वर्षी कफल्लक होऊन अन्न अन्न करून पटापट मरूं लागले. ज्या स्त्रियांनीं कधीं ऊन पाहिलें नाहीं त्यांस हजार ठिगळ्यांचें बोंदर नेसून अन्नाकरितां दारोदार तोंड पागळावें लागलें! ज्या स्त्रियांस आपलीं तान्हीं स्तनपान



केल्याशिवाय एक क्षणही मोठ्या संकटानें लोटावा लागे, त्यांनीं अखेरी तान्हुल्यांस रस्त्यांतच शेवटचें स्तनपान देऊन व त्यांचें शेवटचें मुखावलोकन करून सोडून दिलें! ज्यांनीं आपल्या भर्त्यांस व त्या भर्त्यांनीं आपल्या चारुगात्रींस अवलोकन केल्याशिवाय क्षण घालविला नाहीं, त्यांनीं ह्या पोटाकरितां त्यांस सोडून देशांतराची वाट धरली. शेतकऱ्यांचे पंचप्राण म्हटले म्हणजे गुरांढोरांवर; तीं गुरेंढोरें त्यांनीं बंधमुक्त करून त्यांचें शेवटचें दर्शन घेतलें. जें शेत आपल्या कुवतींत आलें म्हणजे कणसांनीं डोलूं लागे त्या शेताच्या मेरेवर जाऊन शेतकऱ्यांनीं खळ खळ रडावें! मोलमजुरी करणारे कंगाल, ज्यांचें हातावर पोट ते तर दुष्काळाच्या पहिल्याच वर्षीं यमसदनास हजिरी देण्यास गेले. ऐन उन्हाळ्यांत क्षुद्र प्राणी जसे मरून जिकडे तिकडे पडतात त्याप्रमाणें त्या श्रेष्ठ मानव प्राण्यांची स्थिति झाली! शहरोंशहरीं, खेडोंखेडीं, रस्तोंरस्तीं व गल्लोगल्लीं ह्या हतभाग्य मानव प्राण्यांचीं कलेवरें शुष्क लांकडांसारखीं पडलीं! ह्या दुष्काळांत इकडील सुमारें ४०००० लोक मृत्युमुखीं पडले असा अजमास आहे. पूर्वीं लढाईंत लोक मरत होते, हल्लीं तो 'वेंडगळ' प्रकार नाहीं; परंतु त्याऐवजीं दुष्काळ मनुष्यास घशांत ओढून घेण्यास तोंड पसरून बकध्यानाप्रमाणें बसला आहे!!!

समाप्त.

## भाग १ला.

### ( बादशाहा. )

**सुलतान युसफ आदिलशाहा.**

इस्मायल.

मलु. अबदुल्ला. इब्राहिम. ( १ )

अली. (१) तमासाहेब. इस्मायल. अहंमद.

इब्राहिम. ( २ ) इस्माइल.

महंमद. सुलेमान.

अली. ( २ )

शिकंदुर.

## ताजबावडी.

राजाश्रयस्तस्करताश्वपण्यम् ।
आथर्वणं चापि समुद्रयानम् ।
एतानि सिद्धयंति महाफलानि ।
विपर्यये प्राणहराणि पंच । *

ही प्रसिद्ध विहीर शहराच्या नैर्ऋत्य कोनास आहे. हिच्या विषयीं पुरातन माहिती येणेंप्रमाणें आहे:—

सुलतान महंमद आदिलशाह गादीवर असतां त्याजवळ कोणी एका सौदागरानें सिंहलद्वीपांतील रंभावती नामक एका अतिलावण्यवती स्त्रीविषयीं फारच तारीफ केली. त्याचे सांगण्यांतील सारांश कीं,-पंधरा सोळा वर्षांचें जिचें वय, पिकलेल्या लिंबाप्रमाणें जिची कांति, ठेंगणी असून शरीराचा बांधा गोंडस, जिची कटी इतकी बारीक कीं ती पाहून सिंहिणीनें देखील खालीं मान घालावी, नेत्र भ्यालेल्या मृगाप्रमाणें चंचल, भोंवया काळ्या भोर असून इतक्या कमानदार दिसतात कीं हीं प्रत्यक्ष धनुष्येंच आहेत कीं काय असा भास व्हावा. मग त्यांपासून नेत्रकटाक्षरूप जे तीव्र बाण ते तरुणाचें हृदय भेदल्याशिवाय तरी कसे राहतील ? जिचें कपाळ ह्मणजे शुभ्र आकाशच विस्तारलें आहे कीं काय व जिचा केशकलाप ह्मणजे कोणी कृष्ण सर्प तिचे मस्तकास चिकटला आहे कीं काय असें वाटतें. सूर्याच्या प्रकाशानें जशा कमलिनी प्रफुल्लित होतात त्याप्रमाणें तिचें मुखकमल हें सदा प्रफुल्लित ! अहाहा ! त्या मुखास तिचें चांफेकळीसारखें सरळ नाक तरी कसें साजतें ! आणि नाकास पोपटाचे चंचूपुढें ठेविलेल्या पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें तिचा तो आरक्त अधरोष्ठ तरी कसा शोभतो ! ती विडा खाऊन, रत्नालंकार लेवून जरतरीचें पातळ नेसून शुभ्र रुमाल हातीं घेऊन जेव्हां आपले अंगावरील पदर वारंवार सांवरीत झमकत् झमकत् इकडून तिकडे फिरते तेव्हां जशी विद्युल्लताच चमकते आहे कीं काय असा भास व्हावा ! हे पृथ्वीपते, अशी सौन्दर्यसरिता आपणासच साजे ! तेव्हां हें सौदागराचें बोलणें ऐकून बादशहाचें मन फार चंचल झालें व ती स्त्री आपणास कशी प्राप्त होईल असा त्याला ध्यास लागून गेला; आणि कांहीं दिवस पर्यंत ही गोष्ट कोणाजवळ प्रगट केली नाहीं. परंतु शेवटीं ह्मण आहेना, कीं 'दुःख आहे तें वेशीला बांधिलें पाहिजे.' याप्रमाणें त्याचा विचार होऊन त्यानें हा मजकूर आपला विश्वासू वजीर ताजखान यास सांगून पुष्कळ द्रव्य व लोक त्याच्या बरोबर देऊन या नाजूक पण महत्वाच्या कामगिरीवर त्यास पाठविलें.

* राजाश्रय, चोरी करणें, घोडयांचा व्यापार करणें, तसेंच अथर्वण वेद ( धनुर्वेद ), समुद्रावरून देशांतराचा व्यापार करणें, ह्या गोष्टी जर चांगल्या प्रकारें सिद्धीस गेल्या तर उत्तम फलप्रद होतात आणि तीच जर का उलट सिद्धी झाली तर त्या पंचप्राण हरण करणाऱ्या असतात.

१ प्रथम भागांत व बोल घुमजाचे वर्णनांत जिचा उल्लेख केला आहे तीच ही होय.



१ वरील स्थिति वाचून आमच्या वाचकांस नलोपाख्यानांतील नल राजाच्या खालील प्रमाणें स्थितीची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं.

असें बोलति ते चार समाचारा ॥
करी दमयंती नळ मनीं विहारा ॥
नोवरी ते मज होय कशी दारा ॥
करूं लागे नळ भूप या विचारा ॥

हा वजीर फार धूर्त व राजनिष्ठ होता ह्यामुळें त्यास जातेवेळीं असा विचार पडला कीं, कदाचित् माझी कामगिरी सफल झाल्यास बादशाहाची मर्जी सुप्रसन्न होईल व तसें झालें असतां अर्थात् दरबारांतील कित्येक परोत्कर्षासहिष्णु मुत्सद्यांस सहन होणार नाहीं, व ते मजवर ह्या नाजूक कामाची आळ घालण्यासही मागें पुढें पहाणार नाहींत, ह्याकरितां त्यानें एका डब्यांत कांहीं गुप्त जिन्नस ह्मणून ठेवून व त्यावर आपली मोहोर करून तो बादशाहाचे हवालीं केला आणि मी येईपर्यंत हा डबा फार जपून ठेवावा असें सांगितलें. त्यावरून बादशाहानें तो डबा आपल्या खाजगी खजिन्यांत नेऊन ठेवून ताजखानास निरोप दिला.

नंतर कांहीं दिवसांनीं हा वजीर सिंव्हलद्वीपास येऊन पोंचला व लवकरच आपल्या चातुर्याच्या बळानें त्या रंभावती पद्मिनीस घेऊन सुरक्षितपणें विजापुरास बादशाहाच्या कदमापाशीं येऊन दाखल झाला. तेव्हां सौदागरानें वर्णन केलें होतें त्यापेक्षांही शतपटीनें तिचें सौंदर्य पाहून बादशाह अगदीं मोहून गेला. कां बरें मोहून जाणार नाहीं? अगोदरच ती स्त्रीजात त्यांत तिचें मूळचेंच अनुपम सौंदर्य असून तशांत 'प्राप्ते षोडश वर्षेतु × × × अप्सरा भवेत्' अशा स्थितींत ती! शिवाय तिचें कंठमाधुर्य, तिचें गायनकलेमध्यें प्राविण्य, तिचें रसाळ व चतुर भाषण व त्यांत तिची मन आकर्षण करण्याची उत्तम शैली! तेव्हां अर्थात् इतके मोहक गुण ज्या स्त्रीचे ठायीं एकसमयावच्छेदेंकरून वास करीत होते तिला पाहून प्रति शुक्राचार्यांची देखील गाळण होऊन जावयाची! मग हा तर रंगेल बादशाहाच! बादशाहानें तिजप्रीत्यर्थ आनंदातिशयांत अतोनात संपत्ति उडविली व तिच्या नांवानें रंभापुर ह्मणून एक गांव देखील वसविला. मुसलमान लोकांत एक ह्मण आहे 'दर्याकू



आग लगी तो बुजाना मुष्कील है, और तीरकू तीर लगे तो छुडाना मुष्कील है.' तद्वत् त्याचे कामरूपी शर त्या शुभांगीच्या ठिकाणीं अगदीं खिळून गेले. ताजखानासही त्यानें अपार द्रव्य दिलें व त्यास केवळ नाकांतला बाल बनवून ठेविला.

इकडे ताजखानानें पूर्वी भविष्य करून ठेविल्याप्रमाणें त्याचा उत्कर्ष पाहून इतर मानकऱ्यांच्या पोटांत दुखूं लागलें व त्यांनीं मोठ्या खुबीनें बादशाहाच्या मनांत भरवून दिलें कीं,–खुदावंत पहा कीं रंभावती आपल्या घरांत आल्या दिवसापासून आपण राज्याचा सर्व भार ताजखानावर टाकून नेहमीं अंतःपुरांत गर्क असतां परंतु आह्मांस असें वाटतें कीं, आपणासारख्या पृथ्वीपतींनीं निर्माल्यास इतकें लुब्ध होऊं नये! हें ऐकतांच बादशाह चकित होऊन ह्मणाला, काय? निर्माल्य? निर्माल्य याचा अर्थ तरी काय? तेव्हां मानकरी ह्मणाले, महाराज, ज्या वस्तूचा एकवार उपयोग झाला तीच पुनः कितीवेळांही उपयोगांत आणली तरी ती निर्माल्यवत्च!! आणि अशा निर्माल्यास ज्याअर्थी आपण भुलून राहिलां आहां त्याअर्थी नगरांतले लोक आपली फार निंदा करितात व वस्तुतः हें त्यांचें ह्मणणेंही निर्विवाद आहे. कारण ती स्त्री जर एकादे नपुंसकानें पाहिली तर त्यास देखील पुरुषत्व येऊन तो कामातुर होईल, मग इतरांची काय कथा? हीं मर्मभेदक वाक्यें कानीं पडतांच बादशाह अगदीं संतप्त होऊन गेला, व त्यानें कांहीं विचार न करितां ताजखानास फांशी देण्याविषयीं एकदम हुकूम फर्माविला. उघडच आहे, तेथें कांहीं हायकोर्टाच्या मंजुरीची वाट पहावयास नको, किंवा पिनलकोडचें कलम लावण्याकरितां व्हाल्यूमचे व्हाल्यूम चाळावयास नकोत! प्रत्यक्ष मोंगलाईच ती! हम करे सो कायदा! मग काय बादशाहाच्या हुकुमाप्रमाणें लागलींच ताजखानाच्या हातींपायीं बिडी पडून

शिपाई लोक त्यास फांसावर नेऊं लागले, व आतां लवकरच फांसावरही चढविणार, इतक्यांत ताजखानानें त्या शिपाई लोकांची विनवणी करून बादशाहास निरोप पाठविला कीं, 'आपण मला फांशी देत आहां तर मी नाखुषी नाहीं; परंतु आपले 'आदिलशाही' या नांवास हा केवळ कलंक आहे. तरी याचा शांतवृत्तीनें विचार करून मी आपणास पूर्वी जतन करून दिलेला डबा आणून पाहिला असतां आपली बालंबाल खात्री होणार आहे.'

याप्रमाणें निरोप पोहोंचतांच बादशाहानें फांशीची कांहीं वेळ तहकुबी करवून तो डबा आणवून पाहिला तों त्यांत वजिराचें जननेंद्रिय! तें पहातांक्षणींच सुलतान महंमद यास फारच आश्चर्य वाटलें व पराकाष्ठेचा खेद झाला; व आज आपण त्या बिचाऱ्याचा नाहक बळी घेत होतों असें वाटून त्यास गहिंवर आला. मग ते क्षणींच ताजखानाची फांशीची शिक्षा फिरवून त्यास त्याच्या स्वामिभक्तिपरायणतेबद्दल बहुमूल्य नजराणे देऊन त्यास बहुमानानें 'मलिक संदल' हा नवीन किताब दिला; आणि ताजखानाची क्षमा मागून तुला काय पाहिजे तें माग असें बादशाहानें सांगितलें. तेव्हां या दासाचें नांव जेणेंकरून जगांत राहील व ज्यांपासून लोकांस नेहमीं उपयोग घडेल अशा तीन विहिरी विजापुरांत असाव्या अशी ताजखानानें प्रार्थना केली. त्यावरून ही वर्णनयोग्य ताजबावडी व दुसरी संदलबावडी अशा दोन विहिरी विजापुरांत बांधिल्या गेल्या आहेत. ह्यांशिवाय ताजखानानें तिकोटेयास सराई (धर्मशाळा) व महाल बांधिला आहे तोही प्रसिद्ध आहे.

---

१. ही विहीर साधारणांत असल्यामुळें आह्मी तिचें निराळें वर्णन दिलें नाहीं.

२. हा गांव विजापुरापासून पश्चिमेस १२ मैलांवर आहे.



कित्येक लोक असें सांगतात कीं, ही विहीर "बडाअली आदिलशाह" ह्यानें आपल्या कारकीर्दींत इ. स. १५५७ ह्या वर्षी आपल्या 'ताजबिबी' नामक राणीचें नांव रहावें या हेतूनें बांधिली असून त्यावरून हिला ताजबावडी हें नांव प्राप्त झालें आहे. दुसरे कित्येक जे शब्दव्युत्पत्तींतच निष्णात आणि कल्पनापटु लोक आहेत त्यांची व्युत्पत्ति व कल्पना अशी आहे कीं, ही विहीर बांधीत असतां मातीचें टोपलें खालून वर येण्यास तास लागत होता! इतकी ही खोल आहे ह्मणून हिला 'तास' बावडी व त्यावरून अपभ्रष्ट 'ताज' बावडी असें नांव पडलें आहे. परंतु ह्या दोहों ह्मणण्यांपैकीं एकावर भरंसा ठेवण्यास आधार मिळत नाहीं.

असो. ह्याप्रमाणें ह्या विहिरीच्या नामाभिधानासंबंधानें हकीकत झाली. आतां हिच्या सद्यःस्थितीच्या वर्णनाकडे वळूं.

ही विहीर ह्मणजे एक विहिरीश्वर अथवा तलावच ह्मटला पाहिजे! कारण हिचें नांव बारीक पण आकृति मोठी आहे! हिची लांबी मोजण्यास आमच्या बरोबर टेप होती ह्मणूनच बरें झालें, नाहीं तर हिची २२२ फूट लांबी व २२२ फूट रुंदी एकाद्यानें फुटाची काडी घेऊन मोजूं लागल्यास त्याला हे सक्त श्रमच आहेत! आह्मांस असें वाटतें कीं, साधारण पोहणारा असल्यास त्याला या कडेहून त्या कडेस जाण्यास खचीत दम लागेल व एकाद्यानें या कांठावर उभें राहून त्या कांठावरील मनुष्यास हांक मारिली असतां बहुधा ऐकूं जाणार नाहीं! अशा प्रचंड विहिरीस सभोंवार तासलेल्या दगडांची जंगी भिंत आहे ह्मणून एक ठीक आहे! ह्या भिंतीवरच उत्तर बाजूशिवाय इतर तीन दिशांस मोटा काढण्याच्या जागा आहेत. उत्तर बाजूकडे अशी जागा नसण्याचें कारण त्या बाजूच्या विहिरींत शिरण्याकरितां मध्यावर एक ३६ फूट रुंदीची अफाट कमान आणि तिचे दोहों

बाजूस लागून दोन सुंदर मनोरे आणि त्या प्रत्येकाचे पलीकडे एकएक साधारण इमारत इतक्यांचा समावेश त्या एका २२२ फूट रेषेच्या जागेत झाला आहे. सांप्रत यांपैकीं एका इमारतीचे माडींत सरकारी मराठी नंबर एकची शाळा व दुसरींत म्युनिसिपाल कमेटीचें छोटें आफिस हीं आहेत; आणि कमानीसमोरील पटांगणांत रविवारचा बाजार भरत असतो व त्यावेळीं भोंवतालच्या खेड्यापाड्यांतील पुष्कळ लोक येतात.

असो. वर सांगितलेल्या कमानींतून थोडें आंत गेल्यावर एक साधारण उंचवटासा लागतो; त्याचे दोहों बाजूंनीं विहिरींत उतरण्यास पायऱ्या केल्या आहेत ह्या पायऱ्या पाण्याच्या तळापर्यंत गेल्या असाव्या व अर्थातच हा उंचवटाही पाण्याच्या तळापासून बांधून काढलेला असावा. यावरून एवढें पाहिल्यानेंच विहिरीच्या आंतील मौज पाहणें संपली असें कित्येकांस वाटेल; कारण आह्मी वाचकांस पायऱ्यांवरून पाण्यापर्यंत नेलें तेव्हां आतां काय राहिलें ह्मणून ते निराशही होतील. पण पूर्वीचे मुसलमान बादशाह महा शौकी होते; त्यांनीं विहिरीच्या आंतल्या बाजूनें सभोंवार फिरण्याची व मध्यें मध्यें तेवढ्यांतच विश्रांती घेण्याची हौस केली आहे. सदरच्या उंचवट्यावरून थोडें परत यावें ह्मणजे उजवे बाजूस व एक डावे बाजूस असे दोहींकडे दोन मार्ग दिसतात. ह्या मार्गांतून आंत गेलें ह्मणजे विहिरीच्या आंतल्या बाजूनें (सुमारें विहिरीभोंवतालच्या जमिनीच्या पातळीबरोबर) कंगोऱ्याप्रमाणें परंतु बऱ्याच रुंदीचे खासे सज्जे विहिरींत पुढें आलेले आहेत; त्यांवरून विहिरीं भोंवतालीं पण विहिरीच्या पाण्यावर हवातस धुमाकुळ घालावा. शिवाय ह्या सज्जांतुन मध्यें मध्यें वर ज्या पूर्व, पश्चिम व दक्षिण या दिशांस मोटांच्या जागा सांगितल्या त्यांच्या बरोबर खालीं (लंबरेषेंत) अशीं तीन सुंदर विश्रांतिस्थळें (विहीरींतले



बंगले) केलीं आहेत. कदाचित् कोणास मध्येंच भूकबिक लागल्यास ह्या बंगल्यांत बसून यथेच्छ फळाहार करावा आणि नंतर ह्या बंगल्यास विहीरीच्या मुख्य भिंतींतून ठिकठिकाणीं पाण्यापर्यंत जाण्याकरितां ज्या पायऱ्या केल्या आहेत त्यांनीं जाऊन प्राशन करावें व हुश्शहुश्श करीत वर यावें. ह्या पायऱ्या देखील पाण्याच्या तळापर्यंत असतील! कारण आह्मी खोलच खोल कितीं गेलों तरी पत्ता लागला नाहीं. एकंदरींत ही विहीर ह्मणजे एक रमणीय स्थलच आहे.

[stamp]

---

## चंदाबावडी.

ही विहीर शापूर पेठेंत जाणाऱ्या रस्त्यावर आहे. ही बांधण्यास अली आदिलशाह पहिला यानें इ० स० १५५७ सालीं सुरुवात केली होती. पुढें हिचें काम पुरें होतें न होतें तों इ० स० १५६५ या वर्षीं अहंमदनगरच्या बादशाहाची कन्या इतिहासप्रसिद्ध जी चांदबिबी हिच्याशीं त्याचें लग्न लागल्यामुळें तिचें नांव जगांत राहाण्याकरितां अनायासें त्यानें सदरच्या विहिरीस चांदबावडी असें नांव दिलें. पुढें उत्तरोत्तर ह्या नांवाचा अपभ्रंश होऊन तिला लोक 'चंदाबावडी' असें ह्मणूं लागले.

ही विहीर ताजबावडीपेक्षां बरीच लहान तथापि १४६ फूट लांब व १३६ फूट रुंद एवढी आहेच. ह्या विहिरीची बहुतेक बांधणी ताजबावडीप्रमाणेंच आहे असें ह्मटलें असतां चालेल. ताजबावडी भोंवती जशी तासलेल्या दगडांची भिंत आहे, तशीच हिच्या भोंवतीही आहे. मात्र ती विहीर उत्तराभिमुख असल्यामुळें तिला उत्तर बाजूचा मार्ग आणि इतर बाजूंवर मोटांचीं स्थानें आहेत व ही पूर्वाभिमुख असल्यामुळें हिला पूर्वेकडचा मार्ग आणि इतर बाजूंवर मोटांचीं स्थानें